
इंदिरा गांधी / काल, आज, उद्या / पु. सं. पटके

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.



REFBK-0018452

८८५९८०
सेवक

निबंध.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
क्रमांक ८८५९८० वि: निबंध
दि. २१६६ नों. दि. ३१-३-८२



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८८५९० वि: निबंध
दाता 2/6/8 दि. 30.3.2

इंदिरा गांधी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
7049 2
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

काल आज उद्या

REFBK-0018452

पु. रा. परांजपे

प्रपंच प्रकाशन, पुणे ३०.

प्रपंच प्रकाशन : ५२

प्रकाशक :

माधव रा. कानिटकर,
१९४५ सदाशिव,
पुणे ३०.

☆

मुद्रक :

म. शं. परमाणे,
सुभाष प्रिंटिंग प्रेस,
३९० शनवार,
पुणे ३०.

☆

© पु. शं. पतके

मुखपृष्ठ : ईश्वर दिघे

आवृत्ती पहिली : १ जानेवारी १९७२

☆

किंमत चार रुपये

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळसं.
अनुक्रम ६८९९ दिः निबंध
दाब २९८८ बोः दिः 39/3/02

ज्या थोर महिलेपासून मी
अनेक गुण शिकलो व त्यांचा
मला आयुष्यात नंदादीपा-
सारखा उपयोग झाला त्या
भारतरत्न इंदिरा गांधींना
माझे हे पुस्तक अर्पण
करण्यास मला आनंद व
अभिमान वाटत आहे.

लेखक

नवी प्रपंच प्रकाशने

शकुन	: माधव कानिटकर
एका संध्याकाळी	: माधव कानिटकर
निवडक श्री. ज.	: श्री. ज. जोशी
हिंदोळ्यावर	: मंदाकिनी भारद्वाज
दागिना	: अरविंद गोखले

इंदिरा गांधी : काल



इंदिरा गांधी
काल आज उद्या

सर्वसाधारणरीत्या आपला असा समज असतोकी कर्तबगार वडिलांची मुले कर्तबगार निपजत नाहीत. वडिलांना आपल्या कर्तृत्वाच्या कार्यक्षेत्रातून आपल्या कुटुंबियाकडे व मुलाबाळांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देण्यास फुरसत होत नाही. राजघराण्यात राजेपद जसे वंशपरंपरागत चालत रहाते तसे राजकीय नेतेपदी घडत नाही. उलट बरेच वेळा वडिलांच्या कीर्तीला मुले आपल्या दुराचरणाने काळिमा लावतात, परंतु प्रत्येक नियमाला अपवाद हा असतोच व त्यादृष्टीने पंडित मोतीलाल नेहरू, त्यांचे सुपुत्र पंडित जवाहरलाल नेहरू व त्यांच्या तिसऱ्या पिढीतील एकमेव कन्या श्रीमती इंदिरा गांधी. हा अपवादच म्हणावा लागेल. या तीन पिढ्यांनी क्रिकेटमधील नुसती हॅट्रिकच साधली नाही तर प्रत्येक पिढीने पुढचे पाऊल टाकून आपल्या

वडिलांच्या कितिला मागे टाकले. पंडित मोतीलाल नेहरू यांचा राजकारणातील प्रवेश नाट्यमय परिस्थितीतून झाला. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली त्यांनी आपल्या राजशाही राहणीला मर्यादित आवर घालून यथाशक्ति देशसेवा केली. गांधीजींच्या राजकारणाशी त्यांचे अनेक मतभेद असतानाही त्यांनी त्यांचा आधार सोडला नाही. जवाहरलालजींचा राजकारण प्रवेश सर्वांना स्तिमित करून सोडणारा होता. ते आले, त्यांनी पाहिले व त्यांनी सर्व जिंकले, अशा थाटात नेहरूंनी आपला त्याग, धडाडी, निर्भिडपणा, सरळ विचारसरणी व साहसी नेतृत्वाने तरुण मनाला अशी गवसणी घातली की त्यांच्या हयातीपर्यंत त्यांना नुसत्या युवकांचीच नव्हे तर साऱ्या देशाची साथ मिळाली. आपल्या वडिलांचा कित्ता गिरवून त्यांनी महात्माजींच्या छत्राखाली पण आपली स्वतंत्र विचारसरणी कायम ठेवून सतत ४५ वर्षे जनमानसावरील आपली पक्कड ढिली होऊ दिली नाही. देशाला आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्ततावाद, स्वदेशी राजकारणात समाजवाद व बुद्धिवाद तसेच धर्मनिरपेक्ष वृत्ती व लोकशाहीवरील श्रद्धा, काँग्रेस राजकारणात प्रामाणिकपणा व त्यागभावना, सरकारी शासनव्यवस्थेत तत्परता व जनहिताची कळकळ, कुटुंबियात प्रसन्न मुद्रा व व्यवस्थितपणा तसेच वैयक्तिक जीवनात मनाचा निर्मळपणा, विचाराची शुद्धता व चारित्र्यसंपन्नतेची त्यांची छाप यावच्चंद्रदिवाकरौ जिवंत राहील. ते जरी महात्माजींच्या छायेत वाढले तरी त्यांनी आपले व्यक्तिगत गुण स्वतंत्र व अबाधित राखले. याच्या उलट त्यांच्या सुकन्या श्रीमति इंदिरा गांधी यांची गोष्ट अगदीच वेगळी. आपले वडिलांचे हयातीत त्यांनी आपले जीवनसर्वस्व वडिलांचे ठायी अर्पिल्यामुळे त्यांच्या व्यक्तिगतं गुणांचे अचूक 'मोजमाप' फक्त निकटवर्तीयांनाच होऊ शकले. प्रत्येकजण त्यांना जे मोठेपण देई ते त्या त्यांच्या थोर वडिलांच्या कन्या व निरलसतेने त्यांची देखभाल करीत म्हणून त्यांना मान मिळे. त्यांनी त्या काळात स्वयंसेवकदल, सांस्कृतिक कार्य किंवा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून केलेल्या कामावरून त्यांच्या वैयक्तिक गुणांची छाप बहुजनसमाजावर फारशी पडू शकली नाही. त्यामुळे त्यांच्यावर एक थोर व्यक्ति या नात्याने एकप्रकारचा सदैव अन्याय होत आला आहे. त्यांनी कोठलेही वाखाणण्यासारखे काम केले तरी 'हें यात काय आहे, बडे बापकी बडी बेटी' म्हणून त्या कामाचे

श्रेय त्यांना मिळताना ते डागळलेले असे. 'आमचे वडिल इतके मोठे असते तर आम्हीही असेच नाव कमावले असते,' असेही बरेच लोक म्हणत. या पार्श्वभूमीमुळे भारत–पाक युद्धात त्यांनी जी दैदीप्यमान कामगिरी केली आहे त्यामुळे सारे जग चक्रावून गेले आहे. पंडितजींच्या विशाल छायेत त्यांच्या लाडाने मोठेपण प्राप्त झालेली ही 'गुंगी गुडिया' ती काय पराक्रम करणार अशा थाटात काँग्रेस श्रेष्ठीनी तिला कै. लालबहादूर शास्त्री यांच्या शोचनीय निधनानंतर महामंत्रीपद बहाल केले. राजाचे फक्त नाव व कारभार सगळा सूत्रधारांच्याकडे अशी त्यावेळी श्री. कामराज यांची कल्पना होती. पंडितजींचे हयातीत श्री. मोरारजी देसाई यांनी अमेरिकेचा दौरा काढून तेथे भारताचे भावी पंतप्रधान म्हणून स्वतःभोवती आरती ओवाळून घेतली व तीही शेट बिर्ला व शेठ शांतीप्रसाद जैन यांच्यासारख्या भांडवलशहांचे मदतीने. या कृतीतील गर्भितार्थ ओळखून डावे म्हणून ओळखले जाणारे श्री. कामराज यांनी प्रथम महामंत्रीपदी कै. लालबहादूर शास्त्री व नंतर श्री. मोरारजींचा पराभव करून इंदिरा गांधींना त्याठिकाणी प्रस्थापित केले. असे करताना त्यांना इंदिराजींच्या अनेक अलौकिक व्यक्तिगत गुणांची सुतराम कल्पना नसावी. त्या जेव्हा स्वतंत्र बुद्धिने वागू लागल्या व स्वत: निर्णय घेऊ लागल्या तेव्हा त्यांना विरोध सुरू झाला. प्रथम श्री. मोरारजी देसाई व कामराज यांनी सरळ सरळ विरोध सुरू केला तर श्री. स. का पाटलांसारखे वक्रगति नेते पोटात शिरून धोबी पछाड करू पहात होते तर श्री. यशवंतराव चव्हाणांच्यासारखे धूर्त नेते कुंपणावर बसून वारा कोठे व कसा वहातो हे पहात होते. इकडे श्री. जगजीवनराम इंदिराजीनंतर आपला नंबर कोठे व कसा या फिकिरीत होते. पण अशा सर्व राजधुरंधर नेत्यांना 'याल तर माझ्यासह नाही आलात तर तुमच्या शिवाय' या थाटात गुंडाळून ठेवून इंदिराजींनी जेव्हा पहिल्या प्रथम श्री. मोरारजींची दांडी उडवली तेव्हा वेस्टइंडीज हिरो सुनील गावसकर खेळायला येताच परकीय संघात जशी घबराट पसरते ती अवस्था इंदिराविरोधी गोटात झाली. त्यांचा श्री. गिरी यांच्या राष्ट्रपति निवडणुकीतील पहिला पदन्यास जरी अहंकारी व बेशिस्त वाटला तरी नंतर ज्या धडाडीने त्यांनी बँक राष्ट्रीयी-

करण केले, मोरारजींचा घुव्वा उडविला व सिंडिकेटच्या वारभाईला पाणी पाजले त्यामुळे देशातील त्यांचे चित्र संपूर्णतया पालटले, व देशवासियांची-मने जिंकून निवडणुकीतील न भूतो न भविष्यति। यशाने आपल्या कर्तृत्वाची साक्ष जगाला पटवून दिली. आपल्या देशातील राजकारणावर अशा रीतीने त्यांनी पक्कड बसविल्यानंतर बंगला देशाचे ग्रहण या तेजस्वी सूर्याला झांकळणार की काय अशी चिंता वाटत होती व डावीकडे कल असलेली ही बाई भांडवलशाही देशांना महामंत्रीपदी नको होती म्हणून अमेरिकेनें त्या संधीचा फायदा घेऊन भारताला काळिमा फासण्यासाठी चीन-सारख्या त्यांच्या हाडवैऱ्याशी सख्य साधले. इतिहासात यापूर्वी इतकी निर्घृण मनुष्यहत्या कधीही झाली नसेल अशा याह्याखानची कास धरली तरीसुद्धा न बावरता न घाबरता बाईनी विद्युतगतीनें रशियाशी संधान बांधून निक्सन–माऊ युतीला गळफास लावला. त्याचबरोबर त्यांनी योजिलेली रशिया–ब्रिटन–अमेरिका भेट व चीनला स्नेहाचे आवाहन करून आणि युद्ध जिंकून या बाईच्या मनांत आहे तरी काय असा अचंबा व दरारा साऱ्या जगात निर्माण केला आहे.

जगातील अशा हचा एकमेव कर्तबगार महिलेचा साऱ्या देशाने जवळून परिचय करून घेणे इष्ट आहे. त्यांच्या स्वभावाचे हे अनाकलनीय कोडे आपल्या त्यांच्या सहवासातील प्रदीर्घ अनुभवाचे आधारे सोडवावे या इच्छेने मी हे पुस्तक लिहिण्याचे योजिले आहे. त्यांचे राजकीय जीवनाचा मोजमाप करण्याचा माझा अधिकार नसला तरी ज्या वातावरणात त्यांच्या अंगच्या विविध गुणांची जोपासना झाली ते वातावरण मला जवळून पहावयास मिळाल्यामुळे त्यांच्या गुणांचे मूल्यमापन मी माझ्या व्यक्तिगत चष्म्यातून करणार आहे. या थोर महिलेची महत्ता समजण्यासाठी त्यांच्या बालपणा-पासूनच्या विकासाकडे लक्ष देणे अगत्याचे असल्यामुळे या पुस्तकास 'इंदिरा गांधी–काल, आज व उद्या' असे नामाभिधान दिले आहे.

माझा मनोदय सांगताच प्रपंच प्रकाशनचे संचालक श्री. माधवराव कानिटकर यांनी हे पुस्तक प्रसिद्ध करण्याची तत्परता दाखविल्यामुळे माझे काम अधिक सोपे झाले आहे. त्यांच्या या प्रेरणेबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

• • •

पं मोतिलाल नेहरू

पंडित मोतिलाल नेहरू यांचा भारताच्या राजकीय क्षितिजावर उदय होईपर्यंत या कौल (नेहरू) घराण्याची देशाला फारशी माहिती नव्हती. मोतीलालजी हे एक निष्णात वकील व धनवान असल्यामुळे प्रथम जनतेचे लक्ष त्यांचे वकिलीतील कौशल्य व श्रीमंतीच्या सुरस कथांवर केंद्रिभूत झाले या समजूतीस मोतीलालजींनी आपल्या नबाबी पद्धतीच्या व हुकूमशाही अरेरावीमुळे दुजोरा दिला. कोणाशीही आपणहून बोलावयाचे नाही, दुसरा बोलण्यास जवळ आल्यास त्याचे सामाजिक स्थान व श्रीमंती पाहून त्यानुसार त्याला वागविणे, गरीब कार्यकर्त्यांची दखल न घेणे, वेळ अगोदर ठरविल्या-शिवाय कोणाच्या भेटी न घेणे इत्यादी वागणुकीचे प्रकार काँग्रेस कार्य-कर्त्यांना अपरिचित होते. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांचा दरबार प्रसिद्ध होता. कोणीही केव्हाही जावे व त्या महापुरुषांचा अमूल्य वेळ घ्यावा अशा थाटात वाढलेल्या काँग्रेसजनांमध्ये मोतीलालजींचेविषयी दुरून रामराम ही भावना दृढ झाली. पुढे ते जसजसे महात्मा गांधींच्या समीप येऊ लागले, त्यांनी स्वराज्य पक्षाची स्थापना केली व त्यांचे सुपुत्र जवाहरलालजी यांच्या झंझावती नेतृत्वामुळे मोतीलालजींच्या वागण्यात थोडाफार फरक पडला. तरीसुद्धा बहुजनसमाजाचे नेतृत्व त्यांना कधीच लाभू शकले नाही. किंबहुना श्रीमंतांच्या श्रीमंती रहाणीबद्दल बहुजनसमाजाच्या मनामध्ये असलेला आकस त्यांना सदैव नडला त्यामुळे एक उत्कृष्ट पहिल्या दर्जाचा वकील व त्यामुळे पार्लमेंटचा यशस्वी नेता यापलिकडे त्यांचा दबदबा पडू शकला नाही. स्वराज्यपार्टीचे ते जरी प्रमुख होते तरी कै. तात्यासाहेब केळकर किंवा बॅरिस्टर मुकुंदराव जयकर यांच्याइतका सुद्धा जनसंपर्क मोतीलालजी साधू शकले नाहीत. पुढेपुढे तर त्यांचे सर्व महत्त्व ते गांधीजींच्या विश्वासातील व्यक्तित मोडत

असत व जवाहरलालजींचे वडील एवढ्यावरच राहिले. नेहरू घराण्याचे धोब्याचे कपडे पॅरिसहून धुवून येतात ही एक त्यावेळची मनोरंजक आठवण लोक एकमेकाला मोठ्या चवीने सांगत असत. या एका समजुतीवरून नेहरू घराण्याची श्रीमंती ऐषारामी वृत्ती व अहंमन्यता समजून येईल. राजकारण हा त्यांचा पिंडच नव्हता. व त्यादृष्टीने त्यांनी आपल्या एकुलत्या एक मुलाला इंग्लंडमध्ये शिक्षणास पाठविले. पण तेथील वाघीणींच्या दुधाने हा सुपुत्र संपन्न होऊन जेव्हा भारतात परतला व सर्वसंग परित्याग करून त्याने महात्माजींच्या निरनिराळ्या लढ्यात उडी घेतली तेव्हा नाईलाजाने मोतीलालजींनाहि आपली रहाणी बदलावी लागली. जवाहरलाल जमिनीवर झोपत तेव्हा त्यांना किती कष्ट होत असतील याची स्वतःला जाणीव व्हावी म्हणून प्रथम ते जेव्हा जमिनीवर झोपले तेव्हा त्यांच्या डोळ्यात अश्रू आले अशी आठवण त्यांचे कुटुंबिय सांगतात. म. गांधीच्या प्रेरणेने त्यांनी जेव्हा वकिली सोडण्याचा निर्धार केला व आपले दरमहाचे लाखो रुपयाचे उत्पन्नावर पाणी सोडले तेव्हा राजशाही विलास बंद करून त्यांनी आपली रहाणी बदलली. श्रीमंती रहाणी सोडल्यानंतर जरूर नसलेल्या सर्व वस्तू घोडे, गाड्या, नोकरचाकर यांना कमी करण्यात आले. घरातील बायकांना रेशमाऐवजी साध्या सुताच्या हातविणीच्या साड्या व पुरुषांना खादीचे जाडेभरडे कपडे वापरावे लागले. त्यांच्या एखादा राजवाडा शोभेल अशा आनंदभवनाचे सर्व ऐश्वर्य डोळ्याचे पाते लवते न लवते तोच नष्ट होऊन ती भूमी म्हणजे काँग्रेसच्या सर्व ध्येयधोरणांची मीमांसा करणारी एक रण-भूमी ठरली महात्माजींच्या मोहिनीमुळे हा कायापालट जरी झाला असला तरी मोतीलालजींना व्यक्तिशः तो मानवला नाही. त्यांची ही मनोव्यथा ओळखून ब्रिटिश सरकारने त्यांना आपल्या बाजूला वळविण्यासाठी अनेक गोऱ्या मध्यस्थांमार्फत खटपट केली. त्यामुळे मोतीलालजींचे ब्रिटिश आधि-काऱ्यावर शेवटपर्यंत वजन होते. त्यांचे जीवनात धार्मिकपणा आणण्याचा प्रयत्न त्यांच्या पत्नी स्वरुपाराणी यांनी केला. परंतु जवाहरलालजींच्याप्रमाणे ते बुद्धिवादी असल्यामुळे ते घरात व देवादिकात कधीच रमले नाहीत उलट देवभोळेपणाबद्दल ते आपल्या पत्नीची कुचेष्टा करीत. पतीपत्नींच्या राह-णीत व विचारात बरेच अंतर असल्यामुळे मोतीलालजींची रहाणी विलास-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ... वि: ...
Date ... 29-6-... बो: वि: ... : १३
39-3.

मय झाल्याच्या अनेक कथा कर्णोपकर्णी नंतर माझ्या कानावर आल्या. नेहरू घराण्यातील शरीरसौष्ठव व सौंदर्याचा वारसा मोतीलालजींच्या सौंदर्यात सापडतो. त्यांच्या पत्नीच्या मानाने ते फारच सुंदर होते व तो वारसा त्यांनी आपले पुत्र व पर्यायाने नातीला दिला. आपल्या चरित्र नायिका श्रीमती इंदिरा गांधी यांच्या १४ व्या वर्षी मोतीलालजी वारले. त्यामुळे मोतीलालजींच्या शिकवणुकीचा त्यांच्या नातीवर काही परिणाम झाला असे म्हणणे योग्य होणार नाही. त्या आपल्या आजोबांच्या अत्यंत लाडक्या होत्या व त्यांच्या घराण्याच्या श्रीमंती व लौकिकास साजेल अशा थाटात इंदिराजींचे बालपण जाण्यास मोतीलालजींचे परिश्रम कारणीभूत झाले. कारण ते हयात होते तोपर्यंत घरगुतीबाबतीत त्यांच्यापुढे कोणाचीही बोलण्याची हिंमत होत नसे. 'मी जगात कोणालाही घाबरत नाही शत्रूच्या जाळ्यात जाऊन सिंहाच्या छाव्याला हात घालण्याची मांझी हिंमत आहे व होती' असे छाती फुगवून सांगणारे जवाहरलाल आपल्या वडिलांनी नुसते बोलवले असे म्हणताच त्यांचा थरकाप उडत असे व मोतीलालजींच्या पुढे ते ततपप करीत असत. आपल्या नातवांना स्वतःच्या वडिलांविषयी त्यांना धाकाच्या अनेक सुरसकथा सांगताना मी ऐकल्या आहेत. त्यांना कोठलीही स्वतःविषयीची परवानगी आपले वडिलांजवळ मागितली नाही. साधे सिनेमा नाटकाला जावयाचे असले, दौरा असला किंवा रात्री घरी येण्यास उशिर होणार असला तरी ती खबर वडिलांना पोचवताना ते आपल्या धाकट्या बहिणीचा उपयोग माध्यम म्हणून करीत. कित्येकवेळा आईच्या आड दडत. बऱ्याच लहान-मोठ्या चुका आईच्या नावावर दडपून मी वडिलांचा मार कसा चुकविला हे ते राजीव-संजीवला सांगून इंदिराजींना चिडवित असत. नेहरूंच्या स्वभावातील रागीटपणा, अहंकार व इतर दोष त्यांनी वडिलांपासून घेतले. मोतिलालजींच्याजवळ मोकळेपणे फक्त महात्मा गांधी बोलू शकत पण तेही आडवळणाने. त्यांचा अमाप राग आपल्यावर ओढवू नये म्हणून साध्या नोकराचाकरापासून ते नेहरू-गांधींपर्यंत सर्व खबरदारी घेत. मोतीलालजींच्या या स्वभाव वैशिष्ट्यांचा उल्लेख मुद्दाम करण्यात आला आहे कारण त्यांच्यातील काही सद्गुण व तसेच दुर्गुणांचा वारसा कालपासून उद्यापर्यंत सातत्याने चालू आहे. पुढे इंदिराजींच्या

वभावाची मीमांसा करताना ही सर्व पूर्वपीठिका आपणास विचारांत घ्यावी लागेल.

• • •

जवाहरलाल नेहरू

पहिल्या प्रकरणात इंदिराजींचे आजोबा कै. मोतीलाल नेहरू यांच्या स्वभाववैशिष्ट्यांचा आपल्या चरित्र्यनायिकेच्या जीवनावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचे दिग्दर्शन केले. इंदिराजींना आपल्या वयाची सुरुवातीची फक्त १४ वर्षे त्यांचा सहवास लाभल्यामुळे त्यांच्या आजच्या स्वभाव जडणघडणीवर त्यांच्या आजोबांचा काही परिणाम झाला असेल हे संभवनीय नाही. तरी पण आपल्या आजोबांचा राग, दरारा, करारीपणा, करीन ती पूर्व इ. वृत्तींचा परिणाम त्यांचे स्वभावावर वंशपरंपरागत नात्याने झाला असणे शक्य आहे. त्यांचे वडिल भारताचे एक थोर सुपुत्र व सव्यसाची नेते जवाहरलालजी यांचा त्यांना सर्वात अधिक सहवास लाभल्यामुळे यांच्यातील बरे–वाईट गुणदोषांचे परिशीलन करणे त्यांना सहज सुलभ झाले. किंबहुना आपल्या आवडत्या एकुलत्या एक प्रियदर्शिनीचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून खुद्द नेहरूंनी अपरंपार कष्ट घेतले. हजारो कामे मागे असली तरी तेवढ्यात वेळ काढून ते आपल्या कन्येला उपदेशाचे डोस पाजण्यास कधीहि विसरत नसत. याबाबतीत त्यांनी इंदिरेला लिहीलेली पत्रे बोलकी आहेत. प्रत्येक पित्याला आपल्या मुलामुलींच्या स्वभाव व जीवनाची काळजी असते व जो तो आपल्यापरीने त्यांना शिकविण्याचा प्रयत्न करीत असतो. पण नेहरूंची गत तशी नव्हती. ते श्री शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक किंवा महात्मा गांधी यांच्या परंपरेतील थोर पुरुष होते. किंबहुना त्यांच्याही पेक्षा थोर समजल्या जाणाऱ्या वरील तिघा नेत्यांना आपल्या मुलांच्या

संगोपनाकडे त्यांच्या कार्यव्यापामुळे लक्ष देता आले नाही. पण नेहरुंचा कामाचा उरक जगावेगळा. त्यातून इंदिरेला त्यांचा ३० वर्षांहून अधिक असा निकट सहवास लाभला. नेहरु हे एक थोर आंतरराष्ट्रीय ख्यातीचे राजनीतीज्ञ असले तरी त्यांचा पिंड शिक्षकाचा होता. ते सदैव त्यांच्या समोरील माणसास त्यांच्या दृष्टीने योग्य दिसेल त्या गोष्टी शिकवित असत. मग त्यांनी अक्षर कसे काढावे, बेअररने जेवणाचे टेबल कसे सजवावे, स्वयंपाक्याने प्रत्येक पदार्थात मीठ तिखट किंवा साखर किती घालावी, दाढी कशी करावी अशा बारीक-सारीक गोष्टीपासून ते थेट मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना राजनीतीचे धडे देण्यापर्यंत त्यांची मजल दररोज जात असे. ही शिकविण्याची पद्धत त्यांच्या प्रत्येक वेळच्या मूडवर अवलंबून असे. त्यामुळे कधी ते पाठीवर हात ठेवून आपुलकी दाखवतील तर दुसऱ्या क्षणाला त्याच हाताने पाठीत धक्का-धपाटा बसल्याशिवाय रहाणार नाही. या सर्व स्वभावलहरी इंदिराजी चोवीस तास जवळून पहात असत. नेहरुंच्या या छटा त्यांना नेहमीच आवडत असे म्हणणे धाष्टर्याचे होईल. खुद्द त्यांचाही स्वभाव तितकाच रागीट व अहंकारी असला तरी नेहरु ज्या ज्या वेळी अनावर होत त्या त्या वेळी त्या त्यांच्यावर रागावीत असत, व वेळ मिळाला तर कडक टीकाही करीत असत. you are incorrigible असे इंदिराजींनी त्यांच्या तोंडावर त्यांच्या रागाच्या सार्वजनिक अविष्काराला उद्देशून बोललेले मी स्वतः अनेक वेळा ऐकले आहे. स्वतःचा चष्मा, पेन, पाईप किंवा वाचायची पुस्तके स्वतःच कोठेतरी अव्यवस्थित ठेवायची व पुन्हा थोड्या वेळाने सापडली नाहीत की हातमुठी वळवून जवळच्या लोकांना शिवीगाळ किंवा मारायला उठणे अशा वेळी त्यांना शब्दाने आवरणे शक्य नसल्यामुळे इंदिराजी तेथे असल्या तर त्यांचा राग स्वतःवर ओढवून घेत. " अहो, मी ती वस्तू ठेवली आहे. त्यांना का उगीच बोलता. कुठे ठेवली ते मला आता आठवत नाही. तुम्ही जरा जागेवरून वाजूला होता कां, मला वाटतं, मीच ती वस्तू इथेच कुंठेतरी ठेवली आहे." असे म्हणून नेहरू उठल्याबरोबर शेकडा ९० वेळा ती वस्तू त्यांच्या बसल्या जागेजवळ तेथेच जवळपास सापडत असे. विमानाने परदेश प्रवासास निघताना लहान मुलाला जसे आपण एरवी बजावतो की " बाळा आता रडायचे नाही हं, हट्ट करायचा

नाही लोक हसतात तुला " अशा थाटात ही मुकन्या आपल्या वडिलांना बजावताना कचरत नसे व असे देखावे मुळात निर्माणच होणार नाहीत म्हणून आपल्या वडिलांना लागणारी प्रत्येक वस्तू त्यांना लागेल तेव्हा चटदिशी सापडेल अशा हिशेबाने लावून ठेवण्याचा त्यांचा छंदच झाला होता. नेहरुंनी आपल्या कन्येला राजकीय व सार्वजनिक क्षेत्रात कसे वागावे किंवा बोलावे हे शिक्षण देण्याचा ज्या कसोशीने प्रयत्न केला. त्याच कसोशीने त्यांच्या कन्येने त्यांचे व्यक्तिगत जीवन सुखी ठेवण्याचा प्रयत्न केला. पुढेपुढे तर आपल्या मुलीला विचारल्याशिवाय किंवा तिचा सल्ला घेतल्याशिवाय वडिलांचे पान हलत नसे. रात्री जेवताना बाप–लेकीला थोडा निवांतपणा मिळे व त्यावेळी दिवसभरात घडलेल्या विशेष गोष्टींचा वडिल आपल्या कन्येला अहवाल देत. अशा प्रत्येक वेळी वडिलांचा आपल्या कन्येवरील विश्वास व्यक्त होई. पण त्याचवेळी ही कन्या त्यांना जे शिकवी किंवा तुमचे अमुक चुकले म्हणून ठणकावी. तेव्हा या दोघात जास्त शहाणा समंजस व धोरणी कोण याबद्दल माझ्यासारख्या तिऱ्हाइताला संभ्रम निर्माण होई. अनेक वेळा भावनेच्या आहारी जाऊन व आपल्या नैसर्गिक जोशात नेहरुंना ' तुम्ही अमुक गोष्ट करू नका ' असे बजावले असताही ते नेमकी ती चूक करत व मग जेवणाचे वेळी ' बेटी हमने आज एक बडी भूल की है, गुस्ताकी माफ करो हुजुर.' असे म्हणून कन्येजवळ लाडात येत तेव्हा सर्वच जण हसत व कन्येचाही राग हास्यात विलीन होत असे. नेहरुंच्याकडे येणाऱ्या प्रत्येक माणसाच्या स्वभाव चालीबद्दल पितापुत्रीत निरपवाद मतभेद असे. अशावेळी ही धूर्त कन्या त्यांना अगोदरच सावध करी मग त्यासाठी कधी कधी वडिलांच्याकडून ' बदतमीज, मुझे सिखाता है, राजनीतीमें किसकी उमर या अनुभव जादा है, तेरा या मेरा, ' mind your business ' येथपर्यंत मजल जाई मग अशावेळी त्यांची कन्या तितकीच तापट व स्वाभिमानी असल्यामुळे ' गेलात उडत ' अशा थाटाने दूर निघून जाई. नंतर वेळ मिळाला तर हा प्रेमळ पिता तिची समजूत घाली नाहीतर बहुधा चुका या ठरलेल्याच. मला जे काही या विषयातील ज्ञान व अनुभव आहे त्याचे जोरावर मनुष्यस्वभावाची पारख करण्यात मी वडिलांपेक्षा कन्येला बरेच जास्त गुण देईन. दोघांचेही पूर्वदूषित ग्रह असले तरी कन्येमध्ये भावना

विवशतेपेक्षा व्यवहार व सत्यसृष्टीची पारख जास्त. तिला प्रत्येक उदाहरणानंतर त्या त्या कृतीमधून मनुष्यस्वभावाची मीमांसा सहज सुलभरित्या करता येत असे. वडिलांना असा विचार करण्यास मुळी वेळच मिळत नसे. एकदा दिवस उजाडला की यांत्रिक हालचालीप्रमाणे त्यांना गति लाभे व एकापाठोपाठ एक अशा गुंतागुंतीच्या घटना घडत की मागील गोष्टी काळाच्या पडद्याआड विस्मृतीत जात. फक्त एका बाबतीत मी वडिलांना मानतो व ती म्हणजे परदेशी मुत्सद्यांचे बाबतीतील त्यांचे अचूक निदान. एक चौ एन लायचा अपवाद सोडल्यास त्यांना कोणीही बनवू शकले नाही. नासरच्या बाबतीत त्यांच्या अपेक्षा जरूर चुकल्या, पण निधर्मवादाचे प्रतीक यादृष्टीने त्यांनी नासरला जवळ केले होते, व आपल्या दबावाखाली या मोक्याच्या ठिकाणी असलेल्या देशांना मुसलमान राष्ट्राच्या एकजुटीपासून दूर ठेवण्यात यश मिळविले. हा जरी आपल्या उपयोगी पडला नाही तरी निदान वाकडा जाणार नाही एवढी दक्षता घेतली तरी काय वाईट असे ते म्हणत. अमेरिकन व ब्रिटिश मुत्सद्यांचे बाबतीत त्यांची परीक्षा तंतोतंत बरोबर असे. परदेश दौऱ्यात बरीच फुरसत मिळत असल्यामुळे ते आम्हाला उद्याच्या भेटीत काय बोलणी होणार आहेत, प्रतिपक्ष कोणता पेच घालणार आहे इ. गोष्टी ते आम्हाला आधी सांगत व प्रत्येकवेळी त्यांचे ज्योतिष्य खरे ठरे. टिटो–नासर–नेहरु या युतीच्या सामर्थ्यावर जगामधे तटस्थ राष्ट्रांचा एक समर्थ गट उभा करण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला असता तर आज जे जगाचे चित्र दिसत आहे ते दिसले नसते. धूर्त अमेरिकन व ब्रिटिश नेत्यांनी मुसलमान राष्ट्रांच्या धर्मांधतेचा फायदा घेऊन पाकिस्तान व अन्य मुसलमान राष्ट्रांना या युतीविरुद्ध चिथावले. त्यात सुकार्नोसारखे भंपक व स्त्रीलंपट नेते तसेच चीनच्या साम्राज्यवादाची प्रचंड भूक यांची भर पडल्यामुळे नेहरुंचें हे सुखस्वप्न सफल होऊ शकले नाही. पराभव झाल्यावर पराभूत नेत्याचे दोषावर सर्वांचे लक्ष केन्द्रिभूत होते असे इतिहास आपणाला सांगतो. मनुष्यस्वभावही तसाच आहे असे असले तरी नेहरुंनी आंतरराष्ट्रीय राजकारणात जी झेप घेतली व तीही आपले स्वराज्य अगदी बाल्यावस्थेत असताना. यामधे त्यांची दूरदृष्टी, साहस व आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सम्यक ज्ञान दिसून येते. या विषयाकडे इंदिराजी एक शिकाऊ

विद्यार्थी या दृष्टीने पहात व त्यांचा बराच वेळ अशा भेटीनिमित्त करावी लागणारी भोजने, चहापान सभासंमेलने इत्यादीच्या व्यवस्थेत जाई. अशा चर्चांतून त्यांना उपस्थित रहाण्याचा योग क्वचित येई. तरीपण नंतरच्या चर्चेत त्या आपल्या वडिलांचेकडून सर्व धागेदोरे समजावून घेत. आपल्या देशात प्रचाराच्या आधुनिक तंत्राच्या सहाय्याने असा एक समज करून देण्यात आला आहे की श्री. कृष्ण मेनन यांच्या तंत्राने सर्व आंतरराष्ट्रीय राजकारण चालत असे. या बाबतीतील कृष्ण मेनन यांचे कार्य हा एक स्वतंत्र लेखाचा विषय होईल. प्रस्तुत निवेदनात त्याला महत्व नसल्यामुळे मी फक्त त्यांचे या पिता–पुत्रीशी असलेले संबंधावर याठिकाणी प्रकाश टाकणार आहे. मेनन यांना कम्युनिस्ट राष्ट्रांची नाडी समजली आहे असे नेहरुंचे प्रामाणिक मत होते. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांचे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, त्यांच्या ओळखी व त्या मिळविण्याचे तंत्र, त्यांची पोच, हे गुण लक्षात घेऊन या माणसाला कम्युनिस्ट देशाइतकेच भांडवलशाही देशांची राजनीती समजली तर परदेशनीतीत हा आपला वारस ठरू शकेल या भावनेने नेहरुंनी त्यांना ब्रिटनमधे भारतीय हाय–कमिशनर म्हणून नेमले. अमेरिकेतही वारंवार पाठविले. पण त्या देशातून मेननच्या लहरी व छंदिष्ट स्वभावामुळे त्यांचे तेथे जमेना तरीही नेहरुंच्यावरील आपली छाप चीनचा बुडबुडा फुटेपर्यंत त्यांनी कायम ठेवली. इंदिराजींचे कानावर ज्या ज्या वेळी मेनन यांचे कामाचे अहवाल येत त्या त्या वेळी कृती करण्यापूर्वी ते दुसऱ्या एखाद्या मार्गाने पडताळून पहावे असे इंदिराजी वारंवार सुचवित. यात मेननवरील गैरविश्वासापेक्षा दक्षतेचा भाग अधिक असे. चीन प्रकरणानंतर मेनन साऱ्या राष्ट्राच्या नजरेतून जसे उतरले तसेच ते या पितापुत्रीच्या नजरेतून घसरले. नेहरुंनी त्यानंतर जरी मेननबद्दल थोडे–फार प्रेम दाखविले असले तरी ते पूर्वीच्या कृतज्ञताभावाचे व त्यांच्या सौजन्यशील संस्कृतीचे गमक होते. नेहरुंच्या नंतर इंदिराजी आपली परदेशनीती मेननना विचारून ठरवितात हा तर शुद्ध भ्रामक प्रचार आहे. लोकांच्या डोळ्यात धूळ फेकण्याच्या प्रसिद्धीचे जे एक तंत्र आहे त्याचा हा अविष्कार होय. इंदिराजी कोणाच्याही ओंजळीने पाणी पिणाऱ्या कधीही नव्हत्या व नाहीत हेही पुढे सोदाहरण मी दाखवून देणार आहे.

तात्पर्य जवाहरलालांचे व्यक्तिगत व सार्वजनिक आयुष्य अत्यंत जवळून पहाण्याचे सद्‌भाग्य त्यांच्या कन्येला त्यांच्या संपूर्ण हयातीत लाभले, तरी याचा अर्थ त्या आपल्या वडिलांची हुबेहुब प्रतिमा आहेत असे समजणे चुकीचे ठरेल. अशा सहवासात बऱ्याच विश्वसनीय व कधीकधी अविश्वसनीय गोष्टी पहाव्या व ऐकाव्या लागतात. आपण पुढाऱ्यांचे बाहेर जे चित्र पहातो त्यापेक्षा अत्यंत वेगळे व आगळे स्वरुप बरेच वेळा दृगोच्चर होते. अशा प्रत्येक वेळी तेथे हजर असलेल्या व्यक्तिच्या मनुष्यस्वभाव व सामान्यज्ञानात जरूर भर पडते व त्यामुळेच बरोबर कोणाचे व चुक कोणाचे हे समजू शकते. घरातील वडिलमाणसानी चुका केल्यास व त्या आपल्याला समजल्यास एका विशिष्ट मर्यादेपर्यंत आपण त्या वडिलांच्या नजरेस आणून देऊ शकतो. परंतु ती मर्यादा संपल्याबरोबर आपण 'तो विषय जाऊ द्या जे व्हायचे असेल ते होईल.' या भावनेने तेथेच सोडून देतो. इंदिराजींनी आपल्या वडिलांच्या बाबतीत हीच नीती अवलंबिली होती. अनेक बाबतीत त्यांना स्वतःची बुद्धि लहानपणापासून होती. आपल्या वडिलांशी त्यांचे तीव्र मतभेद होते, तू विशिष्ट मर्यादेपर्यंत त्या त्यांच्याशी हुज्जत घालीत. पण नेहरुंच्या तापट स्वभावामुळे त्या त्यांच्या तोंडी जपून लागत. चार–माणसात आपल्या हाताने आपला मान राखून घेण्यात त्या निष्णात होत्या. पिता-पुत्रींचे बरेचसे वाद पुरुषस्वभावाची पारख यावरून होत. नेहरू नेहमीच भावनावश होऊन त्यांना त्यांच्या आवडत्या सिद्धांतांच्या द्वारे चतुराईने जे लोक आपले म्हणणे त्यांच्या गळी उतरवत त्यांच्या आहारी ते चटकन जात. ते स्तुतीप्रियहि होते. कोणी तोंडावर प्रशंसा केल्यास ते वरवर निषेध करीत पण मनातून संतुष्ट होत. काही धूर्त लोक त्यांच्या कन्येची अवास्तव स्तुती करून त्यांचा मूड स्वतःला अनुकूल करुन घेत. त्यांच्याउलट कन्येचा खाक्या होता. प्रत्येक गाडी रूळावरून चाललीच पाहिजे. यावरच त्याचा कटाक्ष असे. मूळ मुद्दा सोडून कुणी बोलू लागला की त्या 'आंतरिकः कोपी हेतुं' हे चाणाक्षपणे ओळखत व वडिलांना सावध करीत. अशा परिस्थितीत आपल्या वडिलांपासून त्या जर काही शिकल्या असतील तर सचोटी, स्पष्टवक्तेपणा, राष्ट्रप्रेम, व नेहरूंचे समाजवाद, आंतरराष्ट्रीय राजकारणांत

अलिप्तता, निधर्मीपणा वगैरे गुण होत. यातही डावी–उजवी करता येईल पण एवढी चिकित्सा या प्रकरणात अप्रस्तुत ठरेल. भारतीय राजकारणात मात्र पिता व कन्येत नेहमीच मतभेद होत. त्यांचा उल्लेख पुढे येणार असल्यामुळे मी हे प्रकरण येथेंच थांबवतो.

● ● ●

कुटुंबीय मंडळी

इंदिराजींचा त्यांच्या कुटुंबातील ज्या अन्य व्यक्तींशी विशेष निकट संबंध आला, त्यात त्यांच्या आजी स्वरुपाराणी, मातोश्री कमलादेवी, आत्या विजयालक्ष्मी व कृष्णा हाथिसिंग याचा उल्लेख करावा लागेल. त्यापैकी आजीच्या सहवासात त्यांनी आपल्या आयुष्याची पहिली अठरा वर्षे घालविली. स्वरुपाराणींचा बहुतेक सर्व वेळ देवधर्मात व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यात जात असे. त्यामुळे आजीच्या वाटचाला ही लाडकी नात फार थोडा वेळ येई. त्याकाळी माझा त्यांचा कौटुंबिक परिचय नसल्यामुळे मला त्यासंबंधी विशेष माहिती नसली तरी नंतरच्या परिचयामधून जे काही दिसले त्यावरून जीवनातील धार्मिक बाजू स्वरूपाराणींनी पक्की केली. त्यातील पूजाअर्चा, व्रतवैकल्ये, धूपदीप इत्यादि बाह्यस्वरूप जरी इंदिराजींच्या बौद्धिक मनाला पटला नसला तरी त्यामागील सात्त्विक परोपकारी वृत्ती व श्रद्धा यांची जोपासना जरूर झाली. याकामी त्यांच्या मातोश्री याही बऱ्याच धार्मिक असल्यामुळे त्या दोघींच्या हयातीत नेहरु कुटुंबात देवपूजा नित्यनियमीत होत असे. जन्माष्टमीसारखे सोहाळे थाटात पार पडत. इंदिराजींचे शिक्षण निरनिराळ्या प्रागतिक शाळातून व घराबाहेर झाल्यामुळे आजीचे संस्कार त्यांच्यावर फारसे होऊ शकले नाहीत.

आईच्या बाबतीतसुद्धा तसे म्हणणे धाष्टर्याचे ठरेल. मी त्यांना त्यांच्या आईच्या शेवटच्या आजारात जवळून पाहिले, तेव्हाहि त्यांची वृत्ती आईच्या श्रद्धा त्याच माझ्या श्रद्धा अशी नव्हती. प्रत्येक गोष्टीत त्या स्वतःला जे पटेल तेच करीत. ही अठरा वर्षांची मुलगी मोठमोठ्या डॉक्टरांशी वाद घाली, शंकाकुशंकांनी त्यांना भंडावून सोडी. एखादे औषध त्यांना जर निरर्थक वाटले तर डॉक्टरच्या तोंडावर हो म्हणूनसुद्धा ते त्या नंतर देत नसत. कित्येक वेळा डॉक्टर लोक आम्हाला आमचा धंदा नीट समजतो म्हणून त्यांना खडसावीत. तरी त्या गप्प बसत नसत. त्यांच्या मर्जीनुसार आपल्या आईला वाकवीत 'आता झोप जास्त बोलू नकोस. अमुक वस्तू द्यायची नसली तर मिळणार नाही' म्हणून खडसावीत पण या स्वतंत्र बाण्याच्या वर्तनातून त्यांची आपल्या आईवरील श्रद्धा व निष्ठा जाज्वल्य-रीतीने प्रकट होई. त्यांच्या सेवेसाठी त्यांनी अनेक रात्री हूँ का चूं न करता दिवसाप्रमाणे घालवल्या. पण आग्रह एवढाच असे की 'मी करीन ती पूर्व' दुसरा एक स्वभावविशेष त्यावेळी दिसून आला म्हणजे त्यांची अंतर्मुखता. आपले विचार त्या स्पष्ट कधीही बोलत नसत. दुसरा बोलू लागला तर त्याचे विचार त्यांना पटत असले तरच ऐकून घेत व पटले नाही तर त्याला लीलया कटवीत. स्वतःच्या तोंडाने त्या स्वतःला एखादी गोष्ट पटली असे कधीच दाखवीत नसत व या त्यांच्या घुम्या स्वभावामुळे त्यांना घरातील सर्व वडिलमंडळी छांदिष्ट व एककल्ली म्हणून खडसवीत. वडिलमाणसांना उलट उत्तर द्यायचे नाही पण आपल्याला जे पटले नाही ते करायचे नाही हा करारीपणा प्रत्येक लहानसहान बाबतीत त्या वेळेपासून दिसून येई. माझा त्यांच्या कुटुंबातील महिलांशी अत्यल्प परिचय असल्याने दुरूनदुरून जे मला दिसून आले त्यावरून त्या आपल्या कुटुंबियात कधीच फारशा प्रिय नव्हत्या. त्यांच्या आत्या तर त्यांच्याजवळ क्वचितच जात. त्यांचे आईवडिल किंवा भाऊ जवळ असला तर कुटुंबातील लहान छोकरी म्हणून जेवढे कौतुक होईल तेवढेच. परंतु त्या कौतुकालाही प्रतिसाद बेतास बात मिळाल्यामुळे इंदिराजींचे प्रश्नांत कोणीही लक्ष घालीत नसत. त्यांचे आई-वडिल त्यांच्या

तुसड्या स्वभावावद्दल 'तुझे पुढे कसे होणार' म्हणून काळजी व्यक्त करीत. अशावेळी सुद्धा ही बाई ढम्म बसे. या त्यांच्या कौटुंबिक वातावरणातील स्वभावाचे पडसाद राजकीय जीवनातही दिसून येतात, म्हणून वरील माहिती महत्वाची आहे.

गांधी कुटुंबिय

इंदिराजींचा फिरोज गांधी यांच्याशी विवाह झाला तो कसा झाला, त्यांचे प्रेम केव्हा बसले वगैरे गोष्टींची मला प्रत्यक्ष माहिती नाही. परंतु १९४६ नंतर त्या जे वैवाहिक जीवन जवळून पाहिले आहे. त्यावरून ती एक शोकांतिका समजावी लागेल. पती–पत्नीमधील नेहमीचा कौटुंबिक जिव्हाळा कधीच दिसत नसे. यजमान त्यांना टोले, प्रतिटोले, कुत्सित टीका, भेदक विरोध, नशेत असले तर माराची धमकी वगैरे देत व या बाईने अशा निरोपांना कधीहि तोंडातून ब्र काढला नाही. या कानाने ऐकायचे व त्या कानाने सोडून द्यायचे हा त्यांचा बाणा त्याही बाबतीत दिसून येई. अगदी मुलांनी जरी काही निरोप सांगितले तरी त्या त्यांना दाद देत नसत. फारच रागावल्या तर Shut up, mind your business म्हणून त्यांना गप्प करीत. आपले विनसले कोठे ह्या विषयावर त्यांनी नेहरूंच्याजवळ सुद्धा आपले मन कधीही मोकळे नाही. या मुग्धतेमुळे त्यांचे यजमान अधिकच चिडत. आतली घुसफूस इतकी प्रचंड असली तरी चार–माणसात त्या नवऱ्याचा मान ठेवीत. घरी असला तर जेवणाखाण्याची देखभाल आत्मीयतेने करीत. 'दारू कमी प्या, जाग्रणे करू नका' वगैरे बजावीत. नवऱ्याच्या आजारीपणात त्यांची सर्व दक्षता घेत. किंबहुना पुढे पुढे तर आजारी पडल्याशिवाय नवऱ्याला आपल्या पत्नीचा सहवास लाभेना व त्यामुळे आजारीपणे वाढू लागली. इंदिराजींनी आपल्या कामाचा व्याप इतका वाढवला की त्यामधून कौटुंबिक प्रश्नाचा विचार करण्यास किंवा त्यावर उपाय योजिण्यास त्यांना क्वचित फुरसत लाभे. नेहरूंनी हे सांधे जोडण्याचा प्रयत्न केला. पण आपले कौटुंबिक सुख नेहरूंच्यामुळेच हरवले या भावनेने फिरोज गांधींनी नेहरूंना याबाबतीत कधीच योग्य साथ दिली नाही. त्यामुळे फिरोज गांधी '१८ क्वीन व्हिक्टोरिया रोड'ला रहात व

'त्रिमूर्ति भवनात आलात तर या, नाही आलात तर आपल्या घरी खुशाल रहा' ही भावना दृढमूल झाली होती. काँग्रेस व पार्लमेंटच्या कामासाठी जावई आपल्या सासऱ्याला आवर्जून भेटत त्यावेळी थट्टामस्करी विनोद चाले. पण हा सार्वजनिक जीवनातील एक देखावा असे. जाणत्यांना या विनोदामागील खिन्नताही जाणवे. व्यक्तिशः फिरोज गांधी बुद्धिमान होते. पण त्यांचे वागणे तऱ्हेवाईक व आत्यंतिक स्वरूपाचे होते. वायकोशी पटत नव्हते म्हणून ते तसे झाले किंवा ते तसे होते म्हणून त्यांचे बायकोशी पटले नाही हा मुद्दा शेवटपर्यंत वादग्रस्त राहिला. या वेबनावाचा मुलांचे मनावर परिणाम होणे अपरिहार्य होते. लहानपणी आजोबांच्या लाडामुळे ते जरी खूप होते तरी समजू लागल्यावर त्यांची मने विचलित झाली त्याचा परिणाम त्यांचे शिक्षण व वाढीवर झाला. आई एक सांगे तर वडील दुसरेच. यामुळे राजीव व संजय हे दोघेही शैक्षणिक बाबतीत आपल्या वडील माणसांची मनीषा पार पाडू शकले नाहीत. त्यांची रस्सीखेच वडिलांचे निधनानंतर थांबली. त्यांचे मनावर घरच्या वातावरणाचा विपरीत परिणाम होऊ नये म्हणून त्यांना परदेशात शिक्षणासाठी पाठविण्यात आले. तरीही योग्य देखरेखीचे अभावी ते आपला उत्कर्ष साधू शकले नाहीत. इंदिराजींच्या जीवनातील हा एक कटु किस्सा आहे. त्यास त्यांचा घुम्या व एककल्ली स्वभाव जबाबदार असला तरी बराच भाग दुर्दैवाचा आहे. अशाही परिस्थितीत त्यांची मुले सध्या आहेत त्यापेक्षा जास्त कार्यक्षम व बुद्धिमान निपजण्यास हरकत नव्हती. प्राप्त परिस्थिती गोड करून त्या आपल्या मुलांचा भविष्यकाळ उज्वल व्हावा म्हणून सदैव प्रयत्नशील असतात. माझ्या अल्पमतीला राजीव हा एक शांत व धीम्मा वाटतो तर संजय बराच लटपट्या व खटपट्या आहे. दोघा भावांचे स्वभावात बराच फरक आहे. तरी त्यांची परस्पराबद्दलची समज चांगली आहे. ते एकमेकांच्या मर्यादा ओळखतात. संजयचा साहसी स्वभाव एका दृष्टीने चांगला असला तरी भारतातील धूर्त उद्योगपतींनी त्याच्या वडिलांना जसे खिशात घातले होते तसे त्याला घालून त्याच्या आईवर शितोडे उडविण्यास कमी करणार नाहीत. छोट्या मोटारींचे उत्पादन, नगरवाला प्रेरित स्टेट बँकेतील ६० लाखांची अफरातफर, निवडणुकींच्या भाऊगर्दीत अनेकांना

केलेली दमदाटी ही भावी वादळाची चिन्हे आहेत. मुळात काही नसले तरी आपल्या आईचे राजकीय विरोधक आपल्या असल्या प्रत्येक हालचालीला राजकीय वळण देऊन तिला बदनाम करतील याची दक्षता या मुलाने ध्यावयास पाहिजे. त्याची कल्पकता, साहसी वृत्ती, गडबडचा स्वभाव मी लहानपणी जवळून पाहिला आहे व त्यावेळी त्याचे कौतुक होणे स्वाभाविक होते. पण वयाच्या २५ व्या वर्षी अशा गोष्टींनी ठराविक मर्यादा सोडली तर या गोष्टी त्याच्या आईस तापदायक ठरल्याशिवाय रहाणार नाहीत.

● ● ●

स्वतंत्र व्यक्तिमत्व

पहिल्या तीन प्रकरणामधून इंदिराजींची कौटुंबिक पार्श्वभूमी स्पष्ट करताना मी प्रसंगोपात त्यांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वावर भर दिला आहे. त्यांच्या कुटुंबातील वडीलमंडळींनी त्यांच्यावर जरूर संस्कार केले आहेत परंतु आलेल्या अनुभवातून त्यांनी स्वतःचे व्यक्तिमत्व घडविले आहे. नेहरूंनी आपल्या ह्या थोर कन्येला जी इतिहासप्रसिद्ध पत्रे पाठविली आहेत ती सूक्ष्म दृष्टीने वाचताना आपल्या कन्येचा स्वभाव आपणाला हवा त्यापेक्षा वेगळ्या रीतीने बनत चालल्याचे स्पष्ट दिसते. स्वभावाप्रमाणेच त्यांची कार्यपद्धती स्वतंत्र होती. आपणाकडे आलेल्या पत्रांना वेळच्यावेळी उत्तरे पाठविणे, रोजच्या कामाचा–काल, आज व उद्या असा आढावा घेणे, पुढे करावयाची कामे, त्यांचा तपशील डायरीत नोंदवून त्यांची उजळणी करणे, महत्त्वाच्या व्यक्तिची नावे पत्ते, टेलिफोन नंबर्स तसेच वाढदिवस, लग्नसोहळे इत्यादींच्या आठवणी नोंद करून ठेवणे इ. बारीक–सारीक कामे त्या जातीने पहात त्यांच्या वडिलांची अशा पद्धतीची कामे त्यांचे सेक्रेटरी

करीत असत व अशा गोष्टींचे नेहरुंना पुसटसुद्धा ज्ञान नव्हते. हा प्रकार इंदिराजी रोज पहात असूनही व हा सर्व नोकरवर्ग त्यांना उपलब्ध असूनहि वरील कामे त्या स्वत: आग्रहपूर्वक करीत यावरून त्यांचा स्वत:च्या मताविषयीचा आग्रह दिसून येतो.

जी गोष्ट व्यक्तिगत दैनंदिन व्यवहाराची तीच गोष्ट त्यांना भेटावयास येणाऱ्या व्यक्ती, त्यांच्याकडे असलेल्या समित्यांचे कामासंबंधी म्हणता येईल. मी नेहरू व इंदिराजी यांच्या अनेक भेटी व समित्यांचे कार्य जवळून पाहिले आहे. अशा वेळी नेहरूंचे तारू कोठे भरकटेल याचा परमेश्वरालाहि थांगपत्ता लागत नसे. क्षणात प्रेमाने बोलणारे नेहरू समोरच्या माणसाच्या बोलण्यात त्यांच्या दृष्टीने थोडी जरी चूक आढळली तर एकदम तडकून जात. अशावेळी प्रसंगविशेषी ते अपशब्दहि बोलत. परंतु इंदिराजींचा खाक्या अगदीच वेगळा त्यांच्यापुढे तुम्हास मुद्यास धरून बोलावे लागते. उगाच फापटपसारा किंवा भावनावेग त्यांच्यापुढे चालत नाही. तुमच्या बोलण्याचा त्यांच्यावर काय परिणाम होतो हेही तुम्हाला दिसून येणार नाही. तुमच्या निवेदनावर त्यांनी जर काही चौकशा केल्या नाहीत तर हे सर्व पालथ्या घागरीवर पाणी समजावे. तुमचे बोलणे त्यांना पसंत नसेल तर त्या तसे स्पष्ट सांगून तो विषय बंद करतात. याच्या उलट त्या जर चौकशा करू लागल्या तर समजावे की आपली गोळी लागली. त्यांना एखादी योजना आवडली की त्यासंबंधी सर्व तपशील गोळा करून त्याची गणना चालू कामाच्या यादीत होई व त्यानंतर त्या कामाचा त्यांना कधीहि विसर पडत नसे. त्यांचा राग हा त्यांच्या चेहऱ्यातून व डोळ्यातून व्यक्त होतो. त्यासाठी अपशब्द उच्चारण्याची त्यांना गरज भासत नाही. त्यांचे बाबतीत सर्वात मोठी पंचाईत म्हणजे त्यांचे मनातील खळबळ बाहेर समजत नाही.

एकच मुद्दा दोन व्यक्तिंनी हाताळणे त्यांना पसंत नसे. बरेच प्रश्न त्या व त्यांचे वडील या दोघांना हाताळावे लागत तेव्हां त्या आपले म्हणणे वडिलांना एकवेळ समजावून सांगत त्यानंतर तो प्रश्न त्या वडिलांच्यावर सोपवत कारण वडिलांचे निर्णय व प्रश्न हाताळण्याची पद्धत यांचे

भाकित करणे दुरापास्त होते. संयुक्त जबाबदारी त्यांना कधीच पसंत नसे. एखादी गोष्ट तुम्ही त्यांच्याशी बोललात व मी त्यात लक्ष घालेन असे आश्वासन त्यांनी दिल्यानंतर पुन्हा जर ती गोष्ट संधी मिळाली म्हणून तुम्ही पंडितजींच्याजवळ बोलाल तर त्यांना ते पटत नसे. अशा माणसाला त्या स्पष्ट बजावीत की 'हा मामला तुम्ही आता सुप्रीम कोर्टाकडे नेला आहे तेव्हा तेथेच त्याचा निर्णय घ्या.'

सामाजिक कार्यातहि हीच कार्यपद्धति त्या अवलंबित. आपल्या वडिलांच्याप्रमाणे त्यांच्याहि मनात आवडत्या व नावडत्या व्यक्तिची नोंद असे. आवडत्या व्यक्ति बहुधा आज्ञाधारक व आत बाहेर त्यांना मान देत असत. नावडत्या व्यक्ति याच्या उलट असत. ढोंगी, अहंकारी, बढाईखोर, त्यांना तुच्छ लेखणाऱ्या व्यक्तिच्या त्या वाटे जात नसत. विजयालक्ष्मी पंडित, कमलादेवी चट्टोपाध्याय यांच्यासंबंधी काहीहि कामे असली तर त्या ती अंगावर घेत नसत. किंबहुना त्यांनी सुरू केलेल्या कामात वरील महिलांनी लक्ष घातले तर त्या ते काम अर्धवट सोडून देत. या पाठीमागे त्यांच्याशी संबंध नको ही भावना असे. बऱ्याच वर्षे कुमारी पद्मजा नायडू या त्यांच्या निकट स्नेही समजल्या जात असत. याशिवाय सुमित्रा चरतराम, शीला भरतराम, त्रिवेणीच्या संचालिका इत्यादि महिलांनी त्यांचा विश्वास संपादन केला होता. पंडितजींनी जर त्यांना काही काम सांगितले तर त्या बजावीत असत की, 'हे काम तुम्ही फक्त मजवर सोपवीत असाल तरच मी करीन मला कोणाची दादागिरी–अगदी तुमचीसुद्धा चालणार नाही' व पंडितजी हे पूर्णतया ओळखून असत. त्यांना त्यानंतर त्याबाबतीत काही फेरविचार सुचला तर ते आपल्या कन्येशी अगदी अदबीने बोलत व तिची आर्जवे करीत.

लोकनृत्याच्या कार्यक्रमाची मूळ कल्पना पंडितजींची. भारताच्या आसमंतात दूरदूर पसरलेल्या समूह–नृत्यांची निवड त्यांनी अनेक वेळा केली पण या कल्पनेला साकार रूप त्यांच्या कन्येने दिले. या समितीच्या कामातील त्यांचे नेतृत्व मी अनेक वर्षे जवळून पाहिले आहे. याहि कामात पंडितजी साधे सभासद नसतानाहि दखल घेत. त्यांचा विचार शुद्ध, सरळ व

सोज्वळ असेल तर आमचे अध्यक्ष जरूर विचार करीत पण कुणाच्यातरी चुगलखोरीने जर पंडितजी प्रवृत्त झाले तर त्यांना तितकाच टोला देण्यास इंदिराजी कचरत नसत. यासंबंधी माझे काही अनुभव मी माझ्या 'नेहरूंच्या सहवासात' या पुस्तकात सांगितले आहेत. ही नृत्यसंचातील चारपाचशे मंडळी दरवर्षी तालकटोरा उद्यानात उतरत असत. पंडितजी त्यांना तेथे जावून त्यांच्या समवेत तीन-चार तास घालवीत. कधीककधी इंदिराजीहि त्यांच्यावरोबर असत. पंडितजींना त्यावेळी हे अडाणी लोक बऱ्याच तक्रारी सुनावीत. पंडितजी तावडतोब त्यांची दखल घेऊन आपले निर्णय तडकाफडकी घेत. अशावेळी आम्ही काय करायचे हे आमच्या अध्यक्षांच्या डोळ्याकडे पाहून ठरवीत असे. हुकूम वडीलांचा व अंमलबजावणी मात्र कन्येच्या इशाऱ्याने चाले. असे हे परस्परविरोधी तंत्र संभाळणे म्हणजे तारेवरची कसरत होती पण ती पार पाडण्यातच आमचे यश समाविष्ट होते.

महाराष्ट्रातील लोकनृत्ये दिल्लीला महाराष्ट्र सरकारच्या त्यावेळच्या पक्षपाती धोरणामुळे सादर केली जात नाहीत. या माझ्या अनुभवावर आधारीत मताची एका सभेत पंडितजी येथे अनाहूतपणे आले असताना त्यांनी माझी निर्भत्सना केली. मजवर अन्याय झाला हे त्यांना नंतर पटताच त्यांनी त्यावर्षी दिलदारपणे दिल्लीतर्फे मराठी लग्नाचा एक देखावा त्या उत्सवात सामील करून माझ्यावरील अन्यायाचे तडफेने व तत्परतेने परिमार्जन केले. या सभेच्या इंदिराजी अध्यक्ष होत्या. माझे विधान राजकीय स्वरूपाचे आहे असा गैरसमज करून घेऊन पंडितजींनी मला सभागृह सोडण्यास सांगितले व मी लगेच बाहेर गेलो. असे असून सुद्धा अध्यक्षांनी माझ्या विचाराची दखल घेऊन त्यासंबंधी महाराष्ट्र सरकारजवळ लिहून योग्य ती शासकीय कारवाई घडवून आणली व हा अन्याय कायमचा दूर केला. या मागे त्यांची अभ्यासू वृत्ती व कामाची पद्धत स्पष्ट दिसून येते. हे कार्यक्रम मिनीट-टू मिनिट पार पाडावे लागत ते पहाण्यास पंतप्रधानांचे बरोबर निरनिराळ्या देशातील मान्यवर व्यक्ति येत असत. या कार्यक्रमाचे सूत्रधार कर्नल हेमचंद्र गुप्ते ह्यांना इंदिराजी सर्व आखणी करून देत असत व मग ब्रह्मदेवाची

सुद्धा ती बदलण्याची हिंमत होत नसे, व त्यांचे इतके कडक नियंत्रण असल्यामुळेच कर्नल गुप्ते २५ वर्षे हे काम अविरत इतक्या व्यवस्थितपणे करू शकले.

इंदिराजींच्या कडवपणाचे आणखी एक उदाहरण मला या ठिकाणी सांगावेसे वाटते. भारतातील निरनिराळ्या भाषातील वेचक नाटके दिल्लीत करावीत ही कल्पना त्यांनी मला मी संगीत नाटक अॅकॅडमीच्या गव्हर्निंग कौन्सिलचा सदस्य असल्यामुळे, मला अनेक वेळा सांगितली. पण प्रत्यक्षात जेव्हा या कल्पनेने मूळ धरले व दिल्ली नाटचसंघाने अॅकॅडमीच्या पुरस्काराने पाऊल पुढे टाकले तेव्हा या उत्सवात श्रीमती कमलादेवी चट्टोपाध्याय यांचा पुढाकार असल्यामुळे इंदिराजी तिकडे फिरकल्या नाहीत. आमचे अध्यक्ष त्यावेळचे माहिती व रेडिओ मंत्री डॉ बा. वा. केसकर, स्वागताध्यक्ष हल्लीचे मध्यप्रदेशचे गव्हर्नर श्री. सत्यनारायणसिंह व या उत्सवात जातीने लक्ष घालणारे खुद्द पंडितजी यांनी अनेक वेळा आग्रह करून सुद्धा त्या एकही नाटकास आल्या नाहीत. त्यांच्या घरी दररोज सकाळी पावणे नऊ ते नऊपर्यंत पंडितजी प्रत्येक नटसंचास भेटत पण त्यावेळी सुद्धा इंदिराजी अनुपस्थित रहात.

उषा किरण या सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्रीच्या युरोपमधील नृत्यांच्या कार्यक्रमाची त्यांनी साद्यन्त आखणी करून दिली होती. पण त्यांचा हा खटाटोप कमलादेवींना 'अव्यापारेषु व्यापार' वाटताच पुन्हा त्या या वाटेस गेल्या नाहीत. अशी त्यांच्या तडफेची अनेक उदाहरणे सांगता येतील. या बाणेदारपणामुळे मतभेद व गैरसमज न वाढता इष्ट कार्य एकाच व्यक्तिच्या हाती राहून त्यांच्या मार्गदर्शनाखाली चाले. श्रीमती कमलादेवी यांचाहि कलाक्षेत्रातील अनुभव व आधिकार तितकाच भोठा आहे. पण या दोघींनी स्वभावभिन्नतेमुळे आपापले कार्यक्षेत्र वॉटर टाइट कम्पार्टमेंटप्रमाणे विभागल्यामुळे आमच्यासारखे छोटे शिलेदार काही काम करू शकले.

या सर्व प्रतिपादनात मला पुन्हा पुन्हा हेच सांगावयाचे आहे की इंदिराजींचे व्यक्तिमत्व अगदी स्वतंत्र व वेगळे होते. त्यांच्यावर दुसऱ्या कोणाचाही शिक्का पडलेला नाही. या प्रकरणात सांस्कृतिक क्षेत्रातील काही

उदाहरणे घेऊन मी माझे म्हणणे मांडले आहे. या पुढील प्रकरणात त्यांनी युवकसंघटना, स्वयंसेवकदले, समाजवादी विचारांच्या तरुणाची संघटना बांधणे वगैरे क्षेत्रात किती काम केले आहे ते विशद करणार आहे. काँग्रेस संघटनेत आज जें त्यांचे स्थान आहे ते मिळविण्याची पूर्वी त्यांना कधीहि हौस नव्हती. फक्त स्वतःला आवडलेले काम निष्ठेने व निरलसतेने करावे हीच त्यांची जिद्द असे व या त्यांच्या वृत्तीत त्यांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा गाभा आढळतो.

• • •

सार्वजनिक कार्याचा ओनामा

आपल्या विश्वविख्यात वडिलांची देखभाल करीत असताना इंदिराजींनी स्वतःचे असे वेगळे समाजकार्य त्या राजकारणात पडल्यापासून चालू ठेवले होते. आपल्या कामाचा गाजावाजा न करण्याच्या त्यांच्या धोरणामुळे असे कार्य प्रसिद्धीच्या वलयापासून सदैव दूर राहिले व त्यामुळे ते बहुअंशी अज्ञात होते. त्यांच्या वडिलांच्या कारकीर्दित त्यांचे हाती जरी अनियंत्रित सत्ता होती व त्यांचा शब्द झेलण्याकरिता देशी व विदेशी राजकीय व्यक्ति सदैव तत्पर असत तरी त्याचा गैरफायदा त्यांनी कधीही घेतला नाही. उलट वेळांत वेळ काढून स्वतःचे असे स्वतंत्र कार्यक्षेत्र आखून घेऊन त्यासाठी त्या तनमनाने झटत असत. बरेच वेळा पंडितजी मोठमोठाले विचार आग्रहाने प्रतिपादन करून पुढे ते इतर कामाच्या व्यापामुळे वाऱ्यावर सोडले जात. परंतु त्यांच्या कन्येची प्रथा वेगळी होती. उक्तीपेक्षा कृतीवर त्यांचा भर जास्त असे. आपल्या वडिलांची समाजवादी विचारसरणी त्यांना तत्वशः पटली होती तरी भारतामध्ये तिचा उपयोग सारासार विवेक, तरतमभाव व देशनिष्ठ भूमिकेतून केला पाहिजे, अशी त्यांची श्रद्धा होती. साम्यवादा-

मुळे जर आपली जीवनरहाणी सुधारणार नसेल तर तो साम्यवाद आपल्याला निरुपयोगी आहे असे त्यांनी यामुळेच वारंवार प्रतिपादन गेले आहे. कोठल्याही तत्त्व व मतप्रणालीचे यश त्याच्या परिणामावरून ठरविले जावे असा त्यांचा आग्रह असे.

आपल्या आईच्या मृत्युनंतर इंदिराजी ऑक्सफर्ड येथे शिक्षणासाठी दाखल झाल्या. इंग्लंड मधील काळे–गोरे, राज्यकर्तेविरुद्ध गुलाम इत्यादि विषमतेमुळे त्यांचे चित्त विचल झाले व त्या इंडिया लीगच्या कामात जास्त लक्ष घालू लागल्या. या कालावधीत आंतरराष्ट्रीय प्रश्नावरील राजकीय विचारांची त्यांची बैठक पक्की झाली. त्याकाळी आपल्या स्वातंत्र्याच्या कल्पनांची इंग्लंडमध्ये सर्वत्र हेटाळणी होत असे. आपणाला सर्व दृष्टीने नालायक समजले जात असे. इंडिया लीग त्यावेळी आपल्याला स्वातंत्र्य मिळावे म्हणून ब्रिटनमधील लोकमत जागृत करणे, तेथील विद्यार्थी व कामगारांना आपले प्रश्न मानवी दृष्टीकोनातून समजावून देणे, स्वातंत्र्य व स्वयंनिर्णय हे प्रत्येक मानवाचे मूलभूत हक्क असताना ते भारतालाच का नाकारले जावेत, यासंबंधी लोकजागृति करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. त्यावेळी भारतात परतण्यापूर्वी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी ज्या ब्रिटिशांशी आपल्याला सामना द्यावयाचा आहे. त्यांची मनोरचना समजावून घेण्यासाठी त्यांनी त्यावेळची वृत्तपत्रे, राजकीय विषयावरील पुस्तके वाचली व सवड मिळेल तेव्हा दौरे काढले. याकामी त्यांना कृष्णमेनन यांचे बरेच सहाय्य लाभले. तरीपण मेनन यांच्या कार्यपद्धती इंदिराजींना नेहमीच पसंत नसत. मेनन यांचा नाटकीपणा व हुल्लडबाजी त्यांना पसंत नसे. त्यांचा भर तर्कशुद्ध विचारसरणी व मानवी दृष्टिकोनावर आधारित असे १९४२ मधील भारत छोडो मोहिमपर्यंत भारतातील घटनांबद्दल इंग्लंडमधील जनता संपूर्णतया अंधारात होती. या अंधारात तेथील समजदार जनतेला ज्या व्यक्तिनी दिव्याचा झोत दाखविला त्यात इंदिराजींचा वाटा मोठा होता. याच काळात त्यांनी ब्रिटिश मजूर पक्षाचे सदस्यत्व पत्करले. आपल्या स्वातंत्र्याकडे तत्वशः वसाहतवादाला विरोध असल्यामुळे या पक्षाची सहानुभूती होती. व विद्यार्थी आणि कामगार वर्ग या पक्षाकडे आकृष्ट झालेला असल्यामुळे त्यांच्यात

प्रचार करणे त्यांना सोपे गेले. आपल्या अंगीकृत कार्यात आपणास मनापासून मदत करतील अशी प्रामाणिक माणसे शोधून त्यांनी विद्यार्थी, कामगार, पांढरपेशा अभ्यासू वर्ग, पार्लमेंटचे आस्थावेत सभासद यांच्या साप्ताहिक सभा योजून आपल्या प्रश्नांना चालना दिली. याचवेळी लोक बोलतात एक व करतात दुसरेच हे त्यांना दिसून आले. बरेच ब्रिटिश मजूर सदस्य सभासंमेलनातून वसाहतवादाला तीव्र विरोध करीत तर पडद्याआड त्यांची कृती दुसऱ्या टोकाला साजेल अशी असे. अशा ढोंगी सदस्यांपेक्षा चर्चिल सारखा 'ब्रिटिश साम्राज्याचे दिवाळे वाजविण्यासाठी मी पंतप्रधान झालो नाही, असे स्पष्ट सांगणारे चर्चिल त्यांना बरे वाटत. मजूरपक्षातील बऱ्याच सदस्यांमध्ये भारतीयांपेक्षा आम्ही श्रेष्ठ आहोत हा superiority complex जेव्हा जेव्हा दिसून येई तेव्हा तेव्हा या तेजस्वी युवतीचे रक्त खवळून उठे.

या कालमानात इंदिराजींची मतप्रणाली निश्चित करण्यात मेनन यांचा सिंहाचा वाटा होता, असा समज बऱ्याच ठिकाणी हेतुपुरस्सर करून देण्यात आला होता. यावेळी मी जवळपास नव्हतो तरीपण पुढील राजकारणात मेनन यांचे प्रसिद्धीतंत्र अवगत झाल्यानंतर इंदिराजींच्या मनावर व विचारांवर या गृहस्थाने कितपत परिणाम केला हे जाणून घेण्यासाठी मी जास्त खोलात शिरलो व नंतरच्या काळात मला जी माहिती मिळाली ती माझ्या अंदाजाबरहुकूम होती. मेनन हे स्वतःची प्रसिद्धी करून घेण्यात मोठे निष्णात होते व त्याबाबतीतील त्यांची तंत्रे स्टंट पद्धतीची सुरुवातीपासूनच असत. त्यांच्या विकृत मनोवृत्ती व वागणुकीप्रमाणे त्यांचे प्रचारतंत्र असे. असे असले तरी त्यांच्या ओळखी बऱ्याच विस्तृत व खोलवर असल्यामुळे पंडितजींनी त्यांना आपल्या कन्येला लागेल ती मदत व योग्य मार्गदर्शन करण्यासंबंधी वारंवार लिहिले. इंदिराजी आपल्या वडिलांचे एक आदरणीय स्नेही या दृष्टीने त्यांचा मान राखीत. या परिस्थितीचा फायदा घेऊन या विकृत गृहस्थाने तेथील वृत्तपत्रात आपला इंदिराबरोबर विवाह होणार असल्याची बातमी सोडून दिली. यामुळे इंदिराजींना काही मदत होण्याऐवजी अडचणच निर्माण झाली व यानंतर त्यांनी मेनन यांना हाताचे अंतरावर ठेवून दुरून रामराम केला. असे असले तरी मेनन पंडितजींचा

विश्वास यानंतरही जतन करू शकलें. कारण इंदिराजींनी वडिलांचेकडे त्याबद्दल कधीही तक्रार केली नाही. व त्यामुळे भारतीय राजकारणात त्यांचे महत्त्व कायम राहिले. स्वत:ला पटेल तेच बोलणे व आचरणे यावर इंदिराजींचा लहानपणापासून कटाक्ष आहे व याच्या उलट मेनन यांचे व्यक्तिमत्त्व आहे. कोठलीही गोष्ट सरळ करणे त्यांना कधीच पटत नाही. सदैव बुद्धिबळातील उंटांप्रमाणे तेढी चाल व शत्रूपक्षाविषयी स्वत:चे मनात काहीतरी गणित मांडून त्या आधारावर त्याला कोंडीत आणण्याचा ते प्रयत्न करीत. यापेक्षा शत्रूशी सरळ सरळ मुकाबला करणे इंदिराजी पसंत करीत. तेव्हा मेनन यांना इंदिराजी पूर्णपणें ओळखून होत्या. पण त्यांनी त्यांच्याशी उघड वैर कधीच केले नाही. पण यातही मेननचा मोठेपणा नसून इंदिराजींचें वडिलांचा विषयीचा आदर व्यक्त होतो.

राजकारणात ढोंगी लोकांचा इंदिराजींना सुरवातीपासून तिटकारा आहे व त्यामुळे बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले या न्यायाने त्यांना जी माणसे प्रामाणिक वाटली त्यांचा त्यांनी एक स्वतंत्र गट तयार केला. भारतात परतल्यानंतर या त्यांच्या राजकीय विचारातील सचोटीमुळेच त्या महाराष्ट्राकडे आकृष्ट झाल्या. उत्तर हिंदुस्तानातील ढोंगी राजकारण, पूर्वेकडील भावनावश किंवा दक्षिणेकडील बुद्धिवाद अथवा गुजराथ्यांची व्यापारी बुद्धी यापेक्षा मराठी बाण्यातील सचोटी व तत्त्वनिष्ठा त्यांना जास्त आवडे. व याच कारणासाठी रावसाहेब व अच्युतराव पटवर्धन, ना. ग. गोरे, एस. एम. जोशी इत्यादि पुढाऱ्यांबद्दल त्यांना खास आकर्षण असे. गोरे किंवा जोशी यांचे पुढे काँग्रेसशी कितीही मतभेद झाले तरी हा आदरभाव टिकून होता. कोणी त्यांच्यावर जर टीका केली तर त्या सरळ म्हणत की, 'गोरे व जोशींच्या दहा टक्के प्रामाणिकपणा तुम्ही ज्यांची प्रशंसा करता त्या पुढाऱ्यात असेल तर मी त्यांना मानते.' पटवर्धन बंधूंचा राजकारणसंन्यास ही एक राष्ट्रीय आपत्ती त्या समजत. ज्या विनाशकारी प्रवृत्तींना विटून त्यांनी संन्यास घेतला किंवा साने गुरुजींनी आत्मनाश केला. त्यापेक्षा अशा प्रवृत्तीशी झगडण्यात खरा पुरुषार्थ आहे असे इंदिराजी प्रसंगविशेषी बोलतात. अडचणी, विरोध व टीका यांच्याशी सामना करण्यातच जीवनातील खरा आनंद असतो हे त्यांना तंतोतंत पटले आहे.

देशकार्य करीत असताना स्त्रीने आपले स्त्रीत्व विसरले पाहिजे व पुरुषात विनादिक्कत मिसळले पाहिजे अशी पंडितजींची श्रद्धा होती. या त्यांच्या शिकवणुकीचा परिणाम त्यांच्या कुटुंबातील सर्व स्त्रियांवर होणे स्वाभाविक होते असे असूनहि इंदिराजींच्या विश्वासू कार्यकर्त्यात अनेक स्त्रियांचा भरणा असे. संमिश्र समाजापेक्षा निव्वळ स्त्रीसमाजात असूया. हेवादेवा, मत्सर, नडणेमुरडणे, दुसऱ्याच्या खाजगी विषयांची चर्चा ह्या गोष्टी फार म्हणून महिला मडळाने त्यांना कधीच आकर्षित केले नाही किंवा महिलांना त्या महिला म्हणून वेटेज द्यावे असाहि आग्रह त्यांनी धरला नाही. पात्रता हीच एकमेव कसोटी त्या समजतात.

ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्यांनी भारतीय राजकारणात जेव्हा हिरीरीने भाग घेण्यास सुरुवात केली तेव्हा निष्ठावान स्वयंसेवक संघटनांवर भर दिला. या संघटनेद्वारा त्यांना तरुण मंडळीतून योग्य कार्यकर्ते निवडता आले. अशा अनेक होतकरू कार्यकर्त्यांची त्यांनी जंत्री तयार करून ठेवली. पण पुढे त्यांचा कार्यविस्तार इतका वाढला की त्यामुळे त्या कार्यकर्त्यांचा संपर्क त्या साधू शकल्या नाहीत. जे कार्यकर्ते या वस्तुस्थितीच्या अज्ञानाने दूर राहिले ते विस्मरणात गेले जे समोर दिसले त्यातील काही परिस्थितीने इतस्ततः विखुरले गेले किंवा मर्जीतून उतरले. त्यामुळे काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारण्यापूर्वीची त्यांनी केलेली पूर्वतयारी जवळजवळ वाया गेली. असे असले तरी काँग्रेसची अध्यक्षपदाची कारकीर्द त्यांनी गाजवली व त्यांच्या मनात असलेले व पुढे आलेले प्रश्न त्यांनी करारीपणाने कसे सोडविले यांचा इतिहास अद्याप ताजा आहे. पुढील प्रकरणात मी त्यांचे माझ्या दृष्टिकोनातून विश्लेषण करणार आहे.

● ● ●

काँग्रेस अध्यक्षपद

आपल्या कन्येचे राजकीय भवितव्य उज्वल आहे याची मनोमन खात्री असल्यामुळे जवाहरलालजींच्या पुढे त्यांच्या कन्येने काँग्रेस अध्यक्ष-पदाची धुरा संभाळावी असा प्रस्ताव मांडला गेला तेव्हा पंडितजी मनापासून खूष झाले पण आपल्या कन्येपुढे ती सूचना करण्यास ते तयार होईनात. कारण पंडितजींची अनेक धोरणे इंदिराजींना पसंत नव्हती व त्याबद्दल त्या प्रसंगोपात आपल्या वडिलांना खडसावित असत. कांही स्तुतिपाठकांनी प्रथम ही सूचना पंडितजींना खूष करण्यासाठी केली पण जेव्हा प्रत्यक्ष हा प्रस्ताव इंदिराजींच्या पुढे तीन–चार शिष्टमंडळानी ठेवला तेव्हा त्या विचारमग्न झाल्या. काँग्रेसमधील अनेक जुनी धेंडे स्वार्थी, अहंकारी, चुगलखोर व नको तेथे लुडबुड करणारी होती. खऱ्या शिस्तीचा कोणालाहि संपर्क नव्हता. व ही सर्व वस्तुस्थिती इंदिराजींच्या घोपट स्वभावाला मानवणारी नव्हती. आपण अध्यक्षपद स्वीकरले तर या सर्व धेंडांशी सामना करावा लागणार शिवाय सरकारी राज्ययंत्रणेत पंडितजींचा प्रभाव दुसऱ्या कोणालाहि चमकू देत नव्हता एका निवांत वेळी इंदिराजींनी आपल्या ह्या सर्व अडचणी वडिलांना निवेदन केल्या व मला या पेचप्रसंगातून सोडवा अशी विनंती केली. बऱ्याच चर्चेनंतर जेव्हा त्यांना काँग्रेस अध्यक्ष म्हणून आचार, विचार व उच्चारांचे अबाधित स्वातंत्र्य राहील असे आश्वासन पंडितजी व काँग्रेसमधील सर्व जेष्ठ व श्रेष्ठ नेत्यांनी दिले तेव्हांच त्यांनी ही जबाबदारी पत्करली.

काँग्रेसच्या पहिल्याच आमसभेत व कार्यकारिणीत त्यांनी आपली भूमिका विशद केली. " मी तुम्हा सर्वात वयाने व अनुभवाने लहान असले तरी माझी म्हणून काही विचारसरणी आहे जिद्द आहे. व ती पुरी करण्या-साठी तुम्ही मला नुसते शुभाशीर्वाद देऊन भागणार नाही तर तुमचे सह-

कार्यहि पाहिजे. काँग्रेसच्या छत्राखाली आजपर्यंत सर्वतन्हेच्या विचारसरणी एकत्र नांदल्या आहेत व एकमेकांच्या सोशिकपणामुळे जोपासल्या गेल्या आहेत. हीच परंपरा माझ्या कारकीर्दीत चालू राहील. परंतु आपण जे एकदा एक विचारने ठरवू त्यात फेरवदल होता कामा नये; किंवा त्याला नंतर कोणी फाटे फोडता कामा नयेत. " हे सर्व बजावीत असताना त्यांनी आपल्या रागीट स्वभावाची सर्वांना कल्पना दिली. मी माझ्या रागावर जरूर संयम ठेवीन पण तो आमचा अनुवंशिक गुण असल्यामुळे त्याचा सर्वस्वी त्याग करणे मला अशक्य आहे. असाही त्यांनी विनोद केला. वडील व आजोबांची विद्वत्ता नसली तरी निदान हा गुण मला त्यांची सतत आठवण देत असतो. या उद्‌गारानंतर झालेल्या हंशा व टाळ्यांचे निनाद संपताच त्यांनी हेही सांगितले की आमच्या रागात कसलेही धागेदोरे नसतात. तो निर्भेळ असतो. तेव्हा तो तुम्ही समजून घ्यावा माझे काही चुकत असेल तर ते सांगण्याचा तुम्हाला हक्क आहे. या प्रास्तविकावर सर्व काँग्रेसश्रेष्ठी खूष झाले व वाहवा वाहवा करीत आगेकूच सुरू झाले. अर्थात ही वाहवा करताना आपण या गुडियाला कसे खेळवतो ते पहाच असा इशारा प्रत्येक श्रेष्ठी आपली गांधी टोपी सावरीत एकामेकाकडे कुत्सित-पणाने पहात, देत होते.

आपले स्वतःचे बेत त्या प्रथम पंडितजींना बोलून दाखवत. केरळ-मधील कम्युनिस्टांचा वाढता प्रभाव व संयुक्त महाराष्ट्र निर्मिती हे दोन प्रश्न अखिल भारतीय स्तरावर हाताळण्याचे त्यांनी ठरविले. त्याचबरोबर काँग्रेस पक्षामधील ढोंगी व निरुपयोगी बांडगुळे बाजूला काढून त्याजागी तरुण निरलस व प्रामाणिक कार्यकर्त्यांची योजना त्यांनी आखली. या सर्व कामांत त्यांना छुपा विरोध झाला. ज्या गोष्टींची त्यांचे वडिलांना जाणीव होती त्याबद्दल वडील त्यांना आस्थापूर्वक पूर्वसूचना देत. कधी कधी दोघांची गरम वादावादी, विशेषतः संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सोडविताना पंडितजींना ज्या अडचणी आल्या त्या ते विशद करीत असताना, पिता व कन्येचे झगडे नेहमी होत. या अडचणी नसून 'तुमची हँम्लेटी वृत्ती याला कारणीभूत आहे' असे इंदिराजी वडिलांना ठणकावीत.

कम्युनिस्टांनी या देशात आपले हातपाय पसरविण्यास दक्षिणेकडून सुरुवात केली. केरळमध्ये या कामासाठी त्यांना सुपीक जमीन लाभली. थोडचा जागेत प्रचंड लोकसंख्या, हिंदु विरुद्ध ख्रिश्चन मतभेद, शेजारच्या मद्रास प्रांताची भरभराट व इतर अनेक कारणे पुढे करून कम्युनिस्टांनी त्या भागातील लोकशाहीला मुळासकट उपटून काढून तेथे मार्क्सवादाचे बीजारोपण सुरू केले. या झंझावाती लाटेला मामुली अडसर निरुपयोगी ठरला असता. पंडितजीचा पिंड लोकशाही स्वरूपाचा असल्यामुळे केरळमध्ये आपल्या बाजूला वळवून घेऊन काय ते करावे असा त्यांचा आग्रह होता. परंतु काँग्रेसच्या तडफदार अध्यक्षांना हा सबुरीचा सल्ला मानवणारा नव्हता. त्यांनी राष्ट्रपतींना आपले म्हणणे पटवून देऊन केरळमध्ये राष्ट्रपती राजवट लागू केली त्यामुळे कम्युनिस्टांची सत्तेवरील पकड ढिली होऊन ते त्या गैरकामामासाठी जी राजसत्ता वापरीत होते ती थांबली. नुसते कम्युनिस्टांना खच्ची करून इंदिराजी थांबल्या नाहीत तर त्यांनी तेथील सर्व समाजवादी शक्ति व धारणा एका धाग्यात गोवून त्यांना काँग्रेस पक्षाच्या दावणीस बांधले.

संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न फारच विकट होऊन बसलेला होता. पंडितजींचे मत एका बाजूला महाराष्ट्रीय नेत्यांचा परस्परविरोधी लंगडा प्रचार तर त्यांच्या विरुद्ध टोकाला, श्री. मोरारजी देसाई, श्री. स. का. पाटील इ. नेत्यांनी टाकलेली धूर्त पावले यामुळे कलुषित झाले होते. पंडितजींच्या मनावर मोराजींची त्यावेळी इतकी छाप पडली होती की ही कोंडी फुटणे अशक्यप्राय झाले होते. महाराष्ट्रीय लोक हिंसाचारी व अत्याचारी आहेत याचे पुरावे म्हणून त्यांनी केलेल्या गुजराथी स्त्रियांवरील अत्याचारांची भडक कल्पित वर्णने, तसेच महात्मा गांधी, खुद्द नेहरू यांच्या फोटोच्या केलेल्या विटंबनेचे फोटो व स्लाईडस् नेहरूंना दाखविण्यात आल्या. या गोष्टीचे जाब जेव्हा सर्वश्री. देव, गाडगीळ, हिरे प्रभृती पुढाऱ्यांना विचारण्यात आले तेव्हा त्यांचा ठणकावून इन्कार करण्याऐवजी त्यांचे न्यायी मन जागृत होऊन हे पुढारी रामशास्त्री थाटात, 'चौकशी करतो, असे का,' म्हणून सखेदाश्चर्य व्यक्त करीत. ठकास प्रतिठक होण्याऐवजी हे जे सबुरीचे धोरण

स्वीकारण्यात आले त्यानेच आमचा घात केला. पंडितजीना त्यांच्या तोंडावर आपले म्हणणे खरे असले तरी, त्यांना ते आवडणार नाही म्हणून आमचे नेते बोलत नसत. व मग गनिमी काव्याचा अवलंब म्हणून इंदिराजींच्या पुढे आपली कैफियत सुनावण्याचा प्रयत्न करीत. त्यांना या गोष्टीची कींव येई. 'इतके खोटे आरोप तुमच्या जमातीवर केले जात असतानाही तुमचे रक्त उसळत नाही हे कसले भ्याड लोक. स्वतःला शिवाजीमहाराजांचे अनुयायी म्हणवतात ! पंडितजी काही वाघसिंह नाहीत किंवा ते तुम्हाला एकदम उचलून तोंडात टाकणार नाहीत ' असे म्हणून त्या आपल्या पुढाऱ्यांना धीर देत. पण इंग्रजी व हिंदीमध्ये प्रभुत्वाचा अभाव आणि कसे बोलावे व कोणी बोलावे यावरील आमच्यातील बौद्धिक, प्रामाणिक (?) मतभेद यामुळे आमच्या नेत्यांची उडी पंडिजींच्या आसपाससुद्धा पडली नाही. ही आमची दुर्दशा पाहून इंदिराजींना वाईट वाटले. मराठ्यातील कैं. अत्रे यांचा आवेशपूर्ण इन्कार व सत्यस्थितीची कात्रणे जेव्हा मी इंदिराजीना दाखवित असे तेव्हा त्या कष्टी होत व म्हणत की तुमच्यावरील अन्याय दूर करण्यास मी दुबळी ठरत आहे याचे मला दुःख होते. पंडितजींना कधी प्रसंग पाहून ती कात्रणे दाखवावीत तर ते कधी म्हणत ' हा प्रचारकी थाट आहे ' तर कधी म्हणत ' महाराष्ट्र सरकारकडून याचा खुलासा मागवला पाहिजे ' अशा पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष म्हणून इंदिराजींनी जेव्हा या प्रश्नास हात घातला तेव्हा महाराष्ट्रीयांपासून मुंबईतील अल्पसंख्यांकाना वाटणारी भीती हा जो बागुलबोवा तेथील उद्योगपति व शासनकर्ते यांनी उभा केला होता त्याचा बुरखा फाडण्याचे त्यांनी ठरविले. याकामी त्यांना श्री. यशवंतराव चव्हाण यानी योग्य साथ दिल्यामुळे हा प्रश्न सोडविणे सोपे झाले. हा सर्व इतिहास ताजा असल्यामुळे मी त्याचे खोलात शिरत नाही. परंतु इंदिरांजींचे चरित्र लिहित असताना या प्रश्नावर त्यांनी केलेली ऐतिहासिक कामगिरी व मला विदित असलेली माहिती देणे मी माझे कर्तव्य समजतो. या प्रश्नावर त्यांना मोरारजी देसाई, स. का. पाटील प्रभृती पुढाऱ्यांचा त्या काळात एवढा राग येई की ते पंडितजींच्या घरी आले तर ही स्त्री त्यांची साधी दखल सुध्दा घेत नसे. एकदोनदा तर

पंडितजी काय करतात म्हणून त्यांना आप्तांनी विचारले असता ते कळलाव्या नारदाच्या संगतीत आहेत असे म्हणाल्या. त्यांचा हा सात्विक संताप पाहून मला एकीकडे हसू येई तर दुसरीकडे अभिमान वाटे. पंडितजींनी कधीकाळी लाडात येऊन अग प्रिये × × × असे म्हणत होते म्हणून मराठी माणसाबद्दल शिकायत केली तर त्या ताडकन म्हणत की, "मला काही सांगू नका, हे सारे लुच्चे बदमाश आहेत. कुठे गेला तुमचा मराठ्यांचा सत्शील व सत्यप्रिय स्वभावाविषयीचा अभिमान. तुम्ही पंतप्रधान होता आणि अशा भाकड कथावर विश्वास ठेवता याबद्दल भावी इतिहास तुम्हाला कधीहि क्षमा करणार नाही" इतक्या कडक शब्दात त्या राष्ट्रनिर्मात्याला सुनावणारी ही आमची तेजस्वी महिला कुठे तर दुसरीकडे आमचे मी मी म्हणणारे नेते शुक् शुक् करून चपराशाशी सुद्धा हितगुज करून पंडितजींची दैनंदिनी जाणून घेऊन व त्या तालमापात आपल्या बोबड्या इंग्रजीतून बोलणारे छत्रपति !

याच सुमारास हिंदी–चिनी भाईभाईचा सर्वत्र उदोउदो चालू होता. तिबेटचे नमन चौ. एन लाय पंडितजींपुढे जेव्हा आळवले तेव्हा त्याच्या तोंडावर इंदिराजी तरी गप्प बसल्या तरी एखादी गृहिणी आपल्या नव-याला कधीकधी बाजूला बोलावून सावध करते तसे इंदिराजींनी पलिकडच्या खोलीत पंडितजींना एक मिनिटासाठी बोलावून 'तुम्ही यावेळी कांहीही कबूल करू नका' असे बजावून तिबेटचा प्रश्न दिसतो तितका सोपा नाही आज जरी चौ तिबेटला no mans land सारखा दोघात समाईक ठेवण्याची भाषा बोलत असला तरी पुढे मागे तो भूभाग चीन गिळंकृत करणार हे भाकीत या दूरदर्शी काँग्रेस अध्यक्षांनी त्याचवेळी केले होते. परंतु हा प्रश्न भारत सरकारच्या आधीन असल्यामुळे त्यावेळी त्यांचे काही चालले नाही.

आपल्या अध्यक्षीय कारकीर्दीत काँग्रेस कचेरीतील सर्व गलथानपणा त्यांनी दूर केला. पत्रव्यवहाराला शिस्त लावली. झोपाळू व आळशी लोक दूर केले, तोंडपुजे लोकांचे कान पकडून त्यांना शुद्धीवर आणले व प्रत्येकाला जे तो करू शकेल तेवढेच बोलण्याचा प्राथमिक धडा दिला. त्यांच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर
अनुक्रम ८८५९० दि: निवड
दिनांक 29.6.88 दि: ३१.३.९५

काळात काँग्रेस दरबारात प्रत्येकजण ताठ असे. गाद्यागिरद्यावर लोळणे किंवा महिला स्वयंसेविकेशी हास्यविनोद यांना अतिरिक्त बंदी असे. एखाद्या सैन्यातील शिस्तबद्ध व तडफदार अशी ही कचेरी या कर्तबगार नेत्यांनी बनविली होती. पूर्वीच्या ऐषारामी कार्यपद्धतीत झालेली ही आमूलाग्र क्रांती म्हणजेच इंदिराजींच्या अध्यक्षीय कारकीर्दीच्या यशाचे गमक समजण्यास हरकत नाही.

● ● ●

गेल्या दशकातील राजकीय स्थान

गेल्या दशकात श्रीमती इंदिरा गांधी यांच्या राजकीय जीवनाचे मूल्यमापन करावयाचे ठरविल्यास त्याचे सर्वसाधारणरीत्या तीन भाग करावे लागतील. पहिल्या भागात २७ मे १९६४ रोजी झालेल्या पंडितजींच्या शोचनीय निधनापर्यंतचे त्यांचे कार्य, दुसऱ्या भागात कै. लालबहादूर शास्त्री यांच्या मंत्रीमंडळातील माहिती व नभोवाणी मंत्री म्हणून त्यांनी केलेले कार्य व तिसऱ्या भागात भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांनी आपल्या झंझावाती नेतृत्वाने जागतिक राजकारणाला घातलेल्या गवसणींचा विचार करावा लागेल.

पहिल्या भागांतील त्यांचे कार्य बरेचसे अज्ञात व कौटुंबिक आपत्तीने ग्रासलेले होते. १९६० मध्ये त्यांचे पति फिरोज गांधी यांच्या निधनाने त्यांचा बराचसा वेळ त्यानंतरच्या योजना व विशेषत: आपल्या मुलांचे भावी शिक्षण व कार्यक्षेत्र निश्चित करण्यात गेला. याकामी अद्यापहि त्यांना यश आलेले नाही हा त्यांच्या दृष्टीने एक चिंतेचा विषय आहे. १९६२ मध्ये चिनी आक्रमणाने त्यांच्या कर्तबगार वडिलांची प्रकृती ढासळली, हा तिसरा आघात. पंडितजींच्या ध्यानीमनी नसताना त्यांच्या राज-

कारणाचा हा फारच मोठा पराभव होता. याकामी त्यांनी चौ एन लाय-पासून कृष्णमेननपर्यंत ज्या ज्या लोकांवर विश्वास टाकला त्या सर्वांनी त्यांना भुईसपाट केले. या मानसिक धक्क्यामुळे पंडितजींची वज्रासारखी प्रकृती एकदम ढासळली. यावेळी " बघा मी तुम्हाला सांगत होते, हा चौ मोठा कावेबाज आहे आहे. " असे म्हणून पंडितजींच्या दुःखात भर घालण्या-ऐवजी त्यांनी एकीकडे त्यांच्या प्रकृतिची काळजी घेण्यास सुरुवात केली. तर दुसरीकडे या आपत्तीतील सर्वात मोठा गुन्हेगार अशा कृष्णमेनन यांना पदच्युत करण्याचे कामी स्वतःचे वजन खर्च केले. डॉक्टर लोक पंडितजींना विश्रांती घेण्याचा सल्ला देत होते. पण तो त्यांना कधीच मानवला नाही. उलट कामाचा वेग व तडफ वाढवून तसेच अधिक मनःसंताप करून त्यांनी अर्धांगवायूचा झटका ओढवून घेतला. पंडितजींच्यासारख्या चळवळ्या माणसाला स्वस्थ बसणे शक्य नाही हे ओळखून, 'कामात बदल म्हणजेच विश्रांती' या न्यायाने त्यांच्या दैनंदिनीस त्यांच्या कन्येने नवे वळण दिले. भुवनेश्वर येथील अर्धांगवायूच्या जबरदस्त झटक्यामुळे पंडितजींची प्रकृति एकदम कोसळली. तरी शेवटपर्यंत त्यांनी सतत कामाचा निदिध्यास सोडला नाही. मृत्युपूर्वी ८ दिवस आधी त्यांना मुंबईत भेटण्याचा मला योग आला होता. त्यांच्या डॉक्टरांच्या आदेशानुसार ही भेटीची परवानगी मला नाकारण्यात आली. पण इंदिराजींच्या वशिल्याने मी माझी इच्छा फलद्रूप केली. त्यावेळी या चाणाक्ष कन्येने मला 'त्यांना जुन्या स्मृतीत गुंगवून ठेव' असा आदेश दिला. राजकारण संपूर्णतया टाळून मेनन, चीन युद्धातील अपयश इत्यादि अप्रिय गोष्टी स्वतः तर टाळतच पण त्यांनी विषय काढला तरी बदल' इतपत इंदिराजींनी मला सूचना दिल्या. अर्थात प्रत्यक्षात मी जेव्हा भेटावयास गेलो तेव्हा माझ्यावेळचा हा सिंह शरीरप्रकृतीने संपूर्णतया खलास झाल्याचे पाहून माझे तोंडून एकहि शब्द उमटेना. उलट पंडितजीच मला म्हणू लागले, 'बघ तुला तरी माझी प्रकृति ढासळल्याचे दिसते का ? मी कसा अजून तगडा आहे. हे डॉक्टर लोक आणि तुमची इंदिरा यांनी मला कैद करून ठेवले आहे.' पंडितजींचा हा त्याही अवस्थेतील जोश पाहून मला रडू कोसळले व एकहि शब्द न बोलता मी परत फिरलो. प्रत्यक्षात

२६ मे १९६४ रोजी मध्यरात्रीपर्यंत काम करून हा थोर योद्धा २७ मे ला पहाटे ५।। पासून दुपारी २।। वाजेपर्यंत ९ तास यमाशी झुंज देऊन अखेर धारातीर्थी पतन पावला. वयाच्या ४७ वर्षापर्यंत ज्या वडिलांनी इंदिराजींचे लालनपोषण केले व उत्तर आयुष्यात त्यांची २४ तास सोबत केली असा हा महान बोधीवृक्ष कोसळून पडताच इंदिराजींचे भान हरपणे स्वाभाविक होते. त्यांच्यावरील ही सर्वात मोठी आपत्ती होती. म. गांधी व मौलाना आझाद यांच्या मृत्युनंतर इंदिराजींना आपला निकट स्नेही समजून त्यांच्याशी प्रत्येक लहान-मोठ्या बिकट प्रश्नांची चर्चा करून त्यांचा सल्ला पंडितजी घेत. अशा दारूण विपन्नावस्थेतहि त्यांनी आपले मनोधैर्य कायम ठेवून त्यांचा थोरला मुलगा राजीव याला इंग्लंडहून बोलावण्याची आवश्यकता नाही, पंडितजींची उत्तरक्रिया संपूर्णतया हिंदु धार्मिक पद्धतीने करावी. त्यांचे वुईल वाचन वगैरे निर्णय त्यांनी तडफेने घेतले व त्यांचे बारीक-सारीक तपशीलातसुद्धा लक्ष घातले. त्यांचे दुसरे पुत्र संजय यांना सर्व अंत्यवेळी उपचार शास्त्रानुसार करण्याची ताकीद देण्यास त्या विसरल्या नाहीत. त्यांच्या अंतर्मुख प्रवृत्तीमुळे त्यांचे मन समजावून घेणे त्या दिवसात इतरांना शक्य झाले नाही. कौटुंबिक दृष्ट्या राजकीय नेत्यात कै. शास्त्रीजी हे त्यावेळी त्यांना अधिक जवळचे होते. राजकीय प्रश्नावर शास्त्रीजींनी कोठलाही सल्ला देण्याच्या मनःस्थितीत त्या नव्हत्या. पण त्यांनी या गोष्टींचा घोळ न घालता एक घाव दोन तुकडे या त्यांच्या वृत्तीस साजेल अशा रीतीने 'मला पुन्हा राजकारणात जेव्हा पडावेसे वाटेल तेव्हा मी आपणहून तुम्हास सांगेन तोवर या प्रश्नावर माझ्याशी कोणीहि बोलू नये किंवा मला भीड घालू नये अशी दक्षता तुम्ही कृपया घेतल्यास मी तुमची ऋणी होईन, म्हणून उलट शास्त्रीजींना सांकडे घातले.

याच पहिल्या भागात त्यांनी न्यूयॉर्क येथे झालेल्या जागतिक जत्रेत भारताचे प्रतिनिधी म्हणून चांगलाच प्रभाव पाडला. त्यावेळचे अमेरिकेचे अध्यक्ष लिंडन जॉन्सन यांनी या जत्रेचे उद्घाटन करताना जागतिक शांततेचे गोडवे गायले. युद्धावाचूनचे जग ही घोषणा जॉन्सन यांनी केली. मुत्सद्देगिरीच्या या ढोंगी वलगना इंदिराजींच्या तडफदार मनाला परवड-

णाऱ्या नव्हत्या, त्यांनी त्याच सभेत 'जॉन्सन यांच्या म्हणण्यानुसार सर्वच देशांना व लोकांना शांतता प्रिय आहे. परंतु ती स्मशान शांतता नसावी. त्यात विकसनशील देशांची प्रगति, विकास व क्रियाशीलता जागृत करण्याची शक्ती असावी असे त्यांनी स्पष्ट बजावले. दुसऱ्या एका अमेरिकन नेत्याने अमेरिका मागासलेल्या देशांना किती विविध प्रकाराने मदत करतो याची आकडेवारी देताच पुन्हा इंदिराजींचे पित्त खवळले. " परस्परातील देवाणघेवाण हा तर अर्थशास्त्राचा पायाच आहे. ज्याच्याजवळ विपुल आहे ते त्याने दुसऱ्यास देऊन त्याचा भांडवल म्हणून उपयोग करावा असे अर्थशास्त्र सांगते. हा सरळ व्यवहार असताना तुम्ही त्याचे नुसते भांडवल करून स्वतःभोवती आरती का ओवाळता " म्हणून त्या प्रतिनिधीस त्यांनी जागेवर ठणकावले. या जत्रेतील भारतीय विभागाची मांडणी अत्यंत आकर्षक व नेत्रदीपक होती. या कल्पकतेमुळे भारताला अमेरिकन डॉलर्स फार मोठ्या प्रमाणावर मिळाले.

नेहरूंच्या मृत्युनंतर जेव्हा इंदिराजी हळूहळू आपले मन रिझविण्यासाठी चार माणसात हिंडू फिरू व बोलू लागल्या तेव्हा शास्त्रीजींनी मोठ्या युक्तीने त्यावेळी एक हायकमांड 'इमर्जन्सी समिति' नेमून त्यात इंदिराजींचा समावेश केला. या समितीचे अन्य सदस्य शास्त्रींच्या मंत्रिमंडळातील होते. पण इंदिराजींना जवळ आणून त्यांना राजकारणात भाग घेण्यास या समितीचा त्यांनी उपयोग केला. यानंतर त्यांनी दुःख विसरावे म्हणून लडनमधील राष्ट्रकुल संघाच्या बैठकीस त्यांना बरोबर नेले. तेथेहि पाकिस्तानने काश्मीर प्रश्न काढताच इंदिराजींनी सर्व लहान मोठ्या राष्ट्रांना असा जमालगोटा दिला की देखते रहो. यानंतर क्रुश्चेव यांचा रशियन राजकारणात अस्त होताच यापुढे नव्या राजवटीत भारत–रशिया संबंध कसे रहाणार हे जाणून घेण्यासाठी इंदिराजींना रशियास पाठविण्यात आले. त्यावेळी रशियाचे नवे पंतप्रधान कोसिजीन यांनी भारत–रशिया मैत्री पूर्वीपेक्षाही जास्त घनिष्ट करण्याची तयारी दाखविली. या सर्व घटनांमुळे इंदिराजींनी मंत्रिमंडळात येण्याची तयारी दर्शविली व आपला प्रचार सर्वत्र कमी पडत आहे ही उणीव लक्षात घेऊन त्यांनी स्वतःसाठी

माहिती व नभोवाणी खाते मागून घेतले. अर्थात शास्त्रीजींना 'आपण मागतो एक डोळा व देवाने दिले दोन डोळे' या न्यायाने हे महत्त्वाचे खाते त्यांनी इंदिराजींच्यावर सोपविले. ही जबाबदारी घेताच त्यांनी नभोवाणीचा स्वदेशी व स्वदेशाबाहेर कायापालट केला. पंडितजींच्या दही खाऊ मही खाऊ वृत्तीने झिजत पडलेले व्हाईस ऑफ अमेरिका हे प्रकरण इंदिराजींनी चुटकीसारखे निकालात काढले व त्यामुळे चिनी व पाकिस्तानी प्रचार थंडा केला. शॉर्टवेव्ह केन्द्रावरून त्यांनी तिबेट, सिक्कीम, नेपाळ, भूतान, ब्रह्मदेश, थायलंड, मलेशिया व इंडोचायना हे भारताच्या उत्तर व पूर्वेकडील देश त्यांनी आपल्या परिसरात आणले. मध्यम लहरींचा उपयोग पाकिस्तान, अफगाणिस्तान, सौदी अरेबिया व आफ्रिकेसाठी केला. या केन्द्राचा उपयोग विरोधी प्रचाराचा बेंडबाजा किती पोकळ आहे. एवढ्यावरच न थांबता तेथील प्रचाराला त्यांनी विधायक स्वरूप दिले. या सर्व दूरदर्शीपणाचा १९६५ मधील भारत–पाकिस्तान युद्धात फारच उपयोग झाला. जागतिक लोकमत हे एक प्रभावी अस्त्र आहे याची जाण इंदिराजींना तेव्हापासून होती. युद्धापूर्वी बांगला देश प्रश्नावर याच प्रचाराचे बळावरजे जागतिक लोकमत ढवळून काढले या प्रभावाची बीजे या १९६४–६५ च्या त्यांच्या कामगिरीत दिसून येतात.

तिसऱ्या भागामध्ये पंतप्रधान झाल्यापासून त्यांनी केलेल्या कामाचे मूल्यमापन आपण करणार आहोत, म्हणजेच 'काल' संपवून आपण 'आज'च्या काळांत पदार्पण करणार आहोत. या काळात शिरताना कोणत्या अवघड परिस्थितीत त्यांनी ही जबाबदारी हे लक्षात घेणे जरूरीचे आहे. संबंध देशामध्ये प्रचंड लोकसंख्येचा प्रश्न व त्यातून निर्माण होणारी गरीबी निरक्षरता व बेकारीसारखे प्रश्न, त्याचबरोबर काँग्रेस पक्षात असलेली फूट व घरभेदपणा व आंतरराष्ट्रीय राजकारणातील विविध तणाव यांचा विचार होणे रास्त आहे. आपल्या देशात विविध भाषा, धर्म, पंथ, विचारप्रणाली इ. सर्वांची सांगड घालून लोकशाही पद्धतीने सर्व प्रश्न सोडवावयाचे म्हटले की अनेकांचे हितसंबंध त्यात गुंतले जातात, व मग ज्याला ठेच लागते तो किंचाळू लागतो. तर जो स्वार्थी व लोभी असेल तो सदैव माझ्यावर अन्याय होत आहे अशी ओरड करून फायद्याचे माप जेवढे आपल्या बाजूला पडेल

तेवढे पहात असतो. एखादी गोष्ट साधावयाचे म्हटले की नुसता साम, दाम, दंड, भेद चालत नाही तर प्रतिपक्षाला खच्ची करण्यासाठी खोट्या प्रचाराची व कपोलकल्पित अरेबियन नाईटस् पद्धतीच्या सुरस कथाही निर्माण कराव्या लागतात. ज्या पिढीजात चालत आलेल्या आपत्तींना पंतप्रधान जबाबदार नाहीत त्यांचेही खापर त्यांच्या माथी फोडून चारित्र्यहनन करण्यात तुम्ही जी कुशलता दाखवाल त्यावर तुमचे पुढारीपण निर्भर असते. या सर्व पार्श्वभूमीवर आपणाला आपल्या पंतप्रधानांच्या कामाचे मूल्यमापन करावे लागणार आहे. किंबहुना त्यांच्या विधायक बाजूपेक्षा त्यांची आज सर्व क्षेत्रात जी अडवणूक होत आहे त्याचा साकल्ये करून विचार करून मगच आपणाला त्यांच्या यशापयशाची खरी कल्पना येईल. नुसत्या चांगल्या गोष्टी करीत रहाणे हे एखाद्या धनिकाने आपल्या जवळचा पैसा योग्य दानधर्मात देणगी रूपाने देऊन सर्वंग लोकप्रियता मिळविण्यासारखे आहे. खऱ्या समाजधुरिणाचा कस तो स्वतःच्या समोरील अडचणी कसा सोडवितो यावर लागला पाहिजे व त्याचदृष्टीने पुढील प्रकरणात मी आजच्या काळात प्रवेश करून या चरित्र्य नायिकेचे मूल्यमापन करणार आहे.

• • •

इंदिरा गांधी : आज

राजकीय इतिहासातील क्रांती

निरनिराळ्या विचारांच्या नेत्यांना काँग्रेस प्रेमाने एकत्र गुंफून प्रत्येकाच्या गुणांचा जास्तीत-जास्त लाभ घेण्याची प्रथा आपल्या राजकीय इतिहासात म. गांधींनी सुरू केली होती. एकेवेळी मालवीयांच्यासारखे कट्टर हिंदुत्वनिष्ठ, मौलाना शौकत अल्ली व महमद अलींसारखे धर्मवेडे मुसलमान, मोतीलाल नेहरु, केळकर, अणे इत्यादि कायदेमंडळावर विश्वास ठेवणारे नेते जयप्रकाश नारायण, मेहेरअली, पटवर्धन बंधू यांच्यासारखे डाव्या विचाराचे पुरोगामीवादी नेते बिर्लादि उद्योगपति या सर्वांना म. गांधींनी काँग्रेसच्या तंबूत कोंबून आपली सर्कस सतत २८ वर्षे यशस्वी रीतीने चालवली होती. या दावणीत जवाहरलाल नेहरु व सुभाषचंद्र बोस यांच्यासारख्या बुद्धिप्रधान व क्रांतीवादी विचारांचे नेते बांधले गेले होते. पुढच्या पिढीत त्यांनी नेहरु व सरदार पटेल हे दोन विचारांनी विरुद्ध टोकाला असलेले नेते एकत्र आणून आपले स्वराज्य, विभाजनासारख्या न भूतो न भविष्यति अशा आपत्तींनंतरही, सुस्थिर केले. गांधीजींच्या नंतर नेहरुंनी हीच परंपरा पुढे चालविली. सर्वसाधारणरित्या भांडवलवादी, समाजवादी, जातीय प्रवृत्तीचे व होयबा असे चार गट या नेत्यांमधे होते. भांडवलवादी प्रवृत्तीचे प्रतिनिधीत्व सरदार पटेलांच्यानंतर सर्वश्री मोरारजी देसाई, स. का. पाटील, संजीव रेड्डी इत्यादि नेत्यांनी केले. समाजवादी विचारांचे नेते खुद्द नेहरु होते. त्यांना प्रामाणिकपणे साथ देणारे सर्व नेते काँग्रेसबाहेर पडलेले होते. त्यामुळे किडवाई, शास्त्रीजी, यासारख्या त्यावेळच्या दुसऱ्या फळीतील नेत्यांवर नेहरुंना अवलंबून रहावे लागे. भांडवलदारांचा लुच्चेगिरीचा वारसा त्यांचे नेतेही चालवित होते. ते नेहरुंच्या तोंडावर त्यांच्या समाजवादी विचारात 'आपसे भी जादा' थाटात होकार भरीत पण कृती अगदी उलट. जात्यंध नेत्यात मौलाना आझाद, यांचा समावेश होतो. मंत्रीमंडळातील आपले स्थान कायम टिकवून त्याचा जास्तीत-जास्त लाभ

त्यांच्या जमातीला दिला म्हणजे ते खूष असत व कोठल्याही बाजूला मते देत. होयबा वर्गात बहुतेक स्वार्थी नेते होते. स्वतःचे स्थान व महत्व टिकवावयाचे व मिळेल त्या मार्गाने पैसा गाठीला बांधायचा एवढेच यांचे ध्येय असे. यातून सरदार बलदेवसिगांच्यासारख्यांचे खजिने उघडे पडल्यावर त्यांची हकालपट्टी झाली. नेहरु हे अभिजात सभ्य गृहस्थ असल्यामुळे या चारी लोकांना ओळखत असूनही पायबंद घालू शकले नाहीत. तो त्यांनी घालावा म्हणून कामराज, इंदिरा गांधी त्यांना सारखा आग्रह करीत पण या लोकांना उघड उघड दुखवून त्यांचे शत्रूत्व पत्करण्यापेक्षा नेहरुंना गोविंद वल्लभपंतांचा 'थंडा करके खाव' हा सल्ला श्रेयस्कर वाटला. विरोधकांच्या कारवाया जेव्हा पराकोटीस पोचल्या तेव्हा कामराज योजनद्वारा या सर्व घूर्त लोकांना बाहेरचा दरवाजा दाखविण्यात आला ! प्रांतीय राजकारणात पंजाबचे प्रतापसिंग कैरो, काश्मीरमधील शेख अब्दुल्ला व बक्षी गुलाम अहमद, बिहारमधील श्रीकृष्णसिंह, अनुग्रह नारायणसिंह, कृष्णवल्लभसहाय, बंगालमधील अतुल बाबूंचे साम्राज्य, गुजराथमध्ये मोरारजींनी पेरलेले सुरुंग, मुंबईतील पाटलांचे साम्राज्य, हे सर्व बालेकिल्ले नेहरुंचे सदैव पाय ओढीत असत. तरी एवढे समर्थ नेहरु त्यांना तोंडावर बोलण्यास सुसंस्कृतपणामुळे असमर्थ होते. या पार्श्वभूमीवर जेव्हा इंदिराजी पंतप्रधान झाल्या तेव्हा ही परंपरागत मिरासदारी तोडून काढणे किती कठीण कार्य होते हे लक्षात येईल. जे नेहरुंच्यासारख्या सर्वसत्ताधीश व 'हम करोसे कायदा' वृत्तीच्या माणसाला करता आले नाही ते या अननुभवी महिलेने निमिषार्धात घडवून आणले. एकाच डावपेचात हे सर्व धुरंधर नेते तर तिने गुंडाळलेच पण त्याचबरोबर 'ओल्याबरोबर सुके जाळावे' तसे कामराज, चव्हाण, इ. ची त्यांनी पर्वा केली नाही. हे सर्व करण्यात त्यांचा स्वार्थ व सत्ताप्रेम होते असे वरवर बऱ्याच लोकांना वाटत होते. त्यातच प्रचाराचा रंग भरून या विचाराला उजाळा देण्यात आला. पण हे काळाचे आव्हान या शूर महिलेने स्वीकारून नुसत्या राजकीय डावपेचाच्या बळावर सर्व सिंडिकेटवाद्यांना त्यांनी खडे चारले. वास्तविक या सर्वांची पापांची लक्तरे जर चव्हाट्यावर त्यांनी धुतली असती तरी ते क्षम्य ठरले असते. परंतु तसे काही न करता

निवडणुकीत खेळाडू वृत्तीने त्यांनी त्यांच्याशी सामना दिला. या झगड्यात जे लोक इंदिराजींना दोष देतात ते हे विसरतात की त्यांना या सर्व स्वार्थी पुढाऱ्यांची नेहरुंच्या वेळेपासून चीड होती व स्वतः नेतृत्वपद स्वीकारल्यानंतरही त्यांनी दहा कलमी योजनेद्वारा उक्ती व कृतीत समानता आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला तरीसुद्धा हे मुरब्बी लोक आपली चाल बदलेनात, उलट राष्ट्रपतीपदाच्या अत्युच्च जागी आपले बाहुले बसवून इंदिराजींची मुस्कटदाबी करण्याचा त्यांचा मनोदय होता. सरळ सरळ सामन्यात पराभव करता येत नाही म्हणून हा आडवळणाचा मुत्सद्दी डाव टाकण्यात आला होता. श्री. संजीव रेड्डी हे गृहस्थ दोन्ही डगरीवर हात ठेवून वाटचाल करू पहात होते. हे लक्षात येताच इंदिराजींनी त्यांना दिलेला पाठिंबा काढून घेतला. श्री. निजलिंगप्पा यांनी सर्व भांडवलशाही व जातीय संघटना एकत्र आणून इंदिराजींशी दोन हात करण्याचे ठरविले. हे सर्व मनसुबे लक्षात येताच 'एक घाव दोन तुकडे' करणाऱ्या इंदिराजींनी 'करेंगे या मरेंगे' या चालीवर पुढील पावले द्रुतगतीने टाकली. श्री. कामराज व यशवंतराव चव्हाण हे पहिल्यापासून डाव्या विचारांचे पण श्री. कामराज यांना आपण स्वतः सूत्रधार बनवून इंदिराजींचे बाहुले खेळवावयाचे होते. तर चव्हाणांनी पंतप्रधानकीची वस्त्रे आपल्याला मिळतील या भाबड्या आशेने इंदिराजींचा ऐनवेळी घात केला. या निकराच्या लढाईत जगजीवनरामांचे प्यादे सरकविण्यात आले. त्यात त्यांच्या लायकीचा कोठलाही प्रश्न नव्हता हे नुकतेच वर्तमानपत्र वाचू लागणारे लहान मुलेसुद्धा सांगतील. या गृहस्थाने गेल्या निवडणुकीपूर्वी इन्कमटॅक्सचा घोळ केला ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट असताना त्यांच्या लायकीचा विचार करून किंवा रेड्डींना दिलेल्या वचनाचा बाऊ करून चव्हाणांनी त्यावेळी मोठी चूक केली व त्यामुळे त्याचे परिणाम त्यांना व महाराष्ट्राला अजूनही भोवतात. वास्तविक श्री. यशवंतराव हे आजपर्यंत झालेल्या सर्व महाराष्ट्रीय नेत्यात अनेक दृष्टीने सरस आहेत. त्यांनी आपल्या कर्तबगारीवर व मुत्सद्देगिरीचे बळावर महाराष्ट्राचे तारू उत्तम रीतीने संभाळले आहे व त्याचबरोबर स्वतः ते मध्यवर्ती सरकारचे यशस्वी संरक्षण, गृह व अर्थमंत्री झाले. ही त्यांची कर्तबगारी, त्यांची पहिली

पार्श्वभूमी लक्षात घेता खचित कौतुकास्पद आहे. आपण मानलेल्या नेत्याशी १०० टक्के प्रामाणिक राहिलो तरीसुद्धा उच्च पदावर पोहोचू शकतो हे कै. लालबहादूर शास्त्री यांचे उदाहरण डोळ्यासमोर असताही चव्हाणां-सारख्या धूर्त मुत्सद्याने प्रधानमंत्रीपदासाठी स्वतःच्या ध्येयाशी असा सौदा करावा हा एक दैवदुर्विलास होय. इंदिराजींनी तरीही त्यावेळी मोरारजींना ज्या मापाने मोजले ते माप चव्हाणांना लावले नाही. यात त्यांच्या स्वामी निष्ठेला त्यांनी आणखी एक संधी दिली. जेव्हा अत्यंत कपटी शत्रूशी मुकाबला करावयाचा बसतो तेव्हा मनुष्य ताकही फुंकन पितो व काविळ झालेल्या माणसाप्रमाणे चव्हाणांच्या प्रत्येक हालचालीमधून अनेक वरेवाईट अर्थ आपोआप निघतात. त्यामुळे अद्यापही त्यांचे केन्द्रस्थानी आसन अस्थिर आहे. अर्थात त्यांचे स्थायी गुण बहुमोल असल्यामुळे श्री. बाळासाहेब देसाई यांची जी गत झाली तीच गत खाडिलकर, धारिया इ. अध्यां हळकुंडाने पिवळे होणाऱ्या नेत्यांची ते करतील, यात शंका नाही. महाराष्ट्रापुरते बोलावयाच म्हटले तर इंदिराजींनी यशवंतरावांना विश्वासात घेऊन त्यांचे आसन स्थिर करावे फार तर त्यांना केन्द्रमंत्रीमंडळात दुसरे स्थान द्यावे व याच्या बदल्यात चव्हाणांनी कुंपण सोडून त्यांच्या अंगणात प्रवेश करावा यात सर्वांचे हित आहे.

आजच्या इंदिराजींच्या कार्याचे मूल्यमापन करताना या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. राजकारणातील सर्वच डावपेच कोर्ट दरबारी नेऊन शाबीत करणे शक्य नसते. कधीकधी तर तेवढा अवधीहि नसतो. अशावेळी कुस्तीतील डावपेचाप्रमाणे प्रत्येक डावाला प्रतिडाव त्या त्या वेळी सुचेल त्या मार्गाने करावा लागतो. तेव्हा अशा डावपेचात इंदिराजींनी सुरुवातीला दिलेला संजीव रेड्डींचा पाठिंबा काढून घेऊन श्री. गिरी यांच्या मागे आपली सर्व शक्ति उभी केली. या गोष्टीचा शिस्तीच्या नावाखाली बाऊ केला जातो. या गोष्टीचा विचार करताना त्यांच्या मागे एक विशिष्ट ध्येयप्रणाली होती. ते शिखर गाठण्यासाठी त्या जर सर्व-साधारण नितिनियमांचा अवलंब करीत बसल्या असत्या तर संजीव रेड्डींचे जू त्यांच्या मानेवर कायमचे बसले असते व जी भांडवलशाही चौकट त्यांना त्या जागी विराजमान करण्यासाठी एकत्रित झाली होती. त्यांच्या उपका-

७८५२

राखाली दबून पुढे रेड्डींनी इंदिराजी व त्यांचा ध्येयवाद मूळापासून उखडून टाकला असता व त्यामुळे समाजवादाचा शकट मोडून तोडून त्या जागी मांडवलशाहीचा राजवाडा उभारला गेला असता. हे दुर्दैवाचे दशावतार इंदिराजींच्या लक्षात आले म्हणूनच एखाद्या निष्णात सर्जनप्रमाणे त्यांनी मोरारजींची शस्त्रक्रिया सर्वप्रथम केली. त्यासाठी त्यांनी दाखविलेली धडाडी व साहस अतुलनीय होते. त्यावेळी मोरारजींचा सर्वत्र असा दबदबा होता की सर्व नेते त्यांना भिऊन असत. हे एक मोहोळ जाळल्यानंतर त्याच्या परिसरातील सर्व गांधील माशा आपणाला डसणार याची इंदिराजींना कल्पना होती. व त्या दृष्टीने त्यावेळी मिळालेल्या चव्हाणांचा दहीखाऊ महीखाऊ पाठिंबा तसेच जगजीवनरामांचे सशर्त व लोभी नेतृत्व त्यांनी चुचकारून घेऊन त्यांच्या पाठिंब्यात शासकीय मार्गाने सुद्धा त्यावेळेला बहुमत मिळविले व नंतर निवडणुकीत ते शिक्कामोर्तब केले. हा सर्व इतिहास काही काळानंतर मोठा रोमांचकारी व मनोरम्य वाटतो. पण त्यावेळी या घटना घडल्या तेव्हा इंदिराजींच्या हृदयाचे किती पाणी झाले असेल याची कल्पना केलेली बरी. जवळ कोणी सल्ला देण्यास नाही, कोणावर किती विश्वास ठेवावा हे समजत नव्हते. प्रत्येकजण मानापमानातील लक्ष्मीबरा-सारखा शौर्याचा आव आणीत होता. अशा या संशयग्रस्त वातावरणात प्रत्येकाचे भोग्य व बिनचूक मोल ठरून त्याला त्याच्या अडणीवर बरोबर बसवायचे हे काम अत्यंत बिकट होते. जरा कुठे चूक झाली असती तर पत्यांच्या किल्याप्रमाणे सर्वत्र डाव उधळला असता. आज ह्या एकाकी बाईने स्वत:च्या हिंमतीवर सर्व नामवंत पण स्वार्थलोलुप नेत्यांना ज्या साहस-पूर्ण रीतीने एकसमयावच्छेदेकरून धूळ चारली ते फक्त सिनेमासृष्टीतच शक्य झाले असते. इंदिराजींनी ही अननूभूत घटना शक्य सृष्टीत सिध्द करून दाखविली. त्याचा परिणाम आपल्या पुढच्या राजकारणावर दूरगामी ठरणार आहेत. ते का व कसे यांचे परिशीलन पुढील परिच्छेदात केले जाईल.

29/6/87 39.3.92

आंतरराष्ट्रीय राजकारणातील डावपेच

इंदिराजींच्या आजच्या राजकारणाचा विचार करताना आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा आढावा घेणे उचित ठरेल. पंडित नेहरूंनी आंतरराष्ट्रीय राजकारणात मांडवलशाही किंवा समाजवादी गटाशी एकरूप न होता स्वतःचा अलिप्ततावाद अनेक प्रलोभने टाळून शेवटपर्यंत टिकविला. याकामी त्यांनी इजिप्तचे अध्यक्ष नासर, युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो, इंडोनेशियाचे अध्यक्ष सुकार्णो यांच्याशी विशेष दोस्ती केली होती. याशिवाय सिलोन, नेपाळ, भूतान व आशियातील अन्य लहान राष्ट्रांना आपल्या अलिप्त गटात ओढण्याचा प्रयत्न केला होता परंतु हे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. फक्त नासर व टिटो यांनी पंडितजींना शेवटपर्यंत साथ दिली. परंतु भारतावर जेव्हां परचक्र आले तेव्हा हे दोघे जिगरदोस्त अलिप्त राहून त्यांनी नेहरूंच्या अलिप्ततावादाची परिसीमा गाठली. चीनने केलेला विश्वासघात तर नेहरूंच्या मर्मस्थानीच बसला. अशा रितीने जगात आपल्याला कोणीहि मित्र नाही. आपल्या संकटकाळी कोणीहि उभा रहात नाही ही कटु सत्ये चीन व पाकिस्तानच्या आक्रमणात सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट दिसली. प्रत्येक राष्ट्र स्वःचा स्वार्थ साधत असेल तरच तुमच्याकडे बघून स्मित करणार. एरवी ते तुमच्या तोंडाला पाने पुसणार हे जागतिक राजकारणातील विदारक सत्य आपणाला विसरून चालणार नाही. नेहरूंच्या काही महत्वाच्या परदेश दौऱ्यात मी त्यांच्या संन्निध होतो. त्यावेळी उपस्थित झालेल्या प्रश्नावर त्यांच्या व इंदिराजींच्या अनेक चर्चा मी ऐकल्या आहेत व त्यावरून हे दोघेही महापुरूष कोठलीहि आंतरराष्ट्रीय विचारसरणी तणाव किंवा मोहाच्या आहारी जाऊन करणार नाहीत याची मला मनोमन खात्री पटली आहे. हे दोघेही सर्व लहान–मोठ्या राष्ट्रांना संपूर्णतया ओळखून होते. त्यांचे स्वार्थ, परमार्थ, डाव प्रतिडाव त्यांना अवगत होते. परंतु जसे स्वदेशी राजकारणात माणसाच्या दोषांकडे कानाडोळा करून

आपण त्याच्या गुणांच्याकडे पहातो व त्याला कोठल्या ना कोठल्या हेतूने जवळ करतो. आपला माणूस म्हणून गोंजारतो तीच गत जागतिक राजकारणातील आहे. भारतासारख्या दरिद्री देशाला भांडवलवाद कधीहि परवडणार नाही व आपल्यापुढील सर्वात बिकट समस्या म्हणजे श्रीमंत व व गरीब यामधील अंतर कमी करणे ही असल्यामुळे इंदिराजींचा ओढा समाजवादाकडे आहे. त्याचा अर्थ तो कम्युनिझमकडे आहे असा सुतराम होत नाही. इंग्लंडचा साम्राज्यवाद किंवा अमेरिकेचा भांडवलवाद कितीही मोहक दिसले तरी ते आपल्या प्रकृतीला परवडणारे नाहीत ही गोष्ट आपले स्वातंत्र्य मिळाल्यापासून स्पष्ट होती व म्हणूनच प्रथम आपला ओढा चीनकडे होता. त्यावेळची रशियाची दोस्ती म्हणजे उंटावरून शेळ्या हाकण्याचा प्रकार होता. भारत व चीन जर एकरूप झाले तर ते साऱ्या जगाला भारी होऊन जागतिक शांतता, समता व उत्कर्ष साधू शकतील हेच सूत्र हिंदी–चिनी भाईभाई याच्यामागे होते. कम्युनिझमचा मूळ गाभा म्हणजे येन केन प्रकारेण दुसऱ्याला ओरबाडून स्वतःची तुंबडी भरणे हा असल्यामुळे चीनने आपल्या सरळ मनाच्या दोस्तालाच घोबीपछाड करून चारी मुंड्या चित केल्यानंतर साहजिकच भारताचा ओढा नंबर दोनचे दोस्तराष्ट्र म्हणून रशियाकडे वळला. भारताच्या या विमनस्क अवस्थेचा फायदा घेऊन त्यावेळचे रशियाचे धर्त पंतप्रधान बुल्गानिन व आतापर्यंत जगात झालेल्या महशूर मुत्सद्यांपैकी व सर्वश्रेष्ठ असे क्रुश्चेव्ह यांनी घेऊन भारत रशिया दोस्तीचा पाया घातला. याकामी आतापर्यंत नेहरूंच्या वेळेपासून जी खलबते झाली त्यात इंदिराजींचा प्रमुख भाग होता. बुल्गानिन–क्रुश्चेव्ह जोडगोळीपासून कोसिजीनपर्यंत सर्वांना त्या व्यक्तिशः ओळखून आहेत. प्राप्त परिस्थतीत दगडापेक्षा वीट मऊ या न्यायाने रशियाला जवळ करताच इंदिराजी लाल होत चालल्या हा शुद्ध राजकीय प्रचार आहे. समाजवाद हे आमचे ब्रीद वाक्य ठरल्यानंतर त्या ध्येयाकडे शक्य तितक्या लवकर जाण्यासाठी आम्हाला जो कोणी मदत करील ती स्वागतार्ह आहे. इंग्लंड किंवा अमेरिकेने आपली आर्थिक विपन्नता दूर करण्यासाठी ज्या ज्या वेळी मदत केली ती आपण आनंदाने स्वीकारली आहे. आज रशिया व भारत

यांचा प्रवासाचा रस्ता एकच असल्यामुळे आपण बरोबर चालल्याचे दिसत आहे. याचा अर्थ ही मैत्री आजन्म टिकणारी व अतूट समजण्याचे कारण नाही. जोवर आपला मार्ग एक आहे तोवर ही दोस्ती टिकणे स्वाभाविक आहे. आजपर्यंत केलेल्या अनेक शय्यासोबती आपण पटत नाही असे दिसताच सोडल्या आहेत. तेव्हा उद्या रशियाने आपला विश्वासघात केला तर ती दोस्ती सोडणे अवघड जाणार नाही. चीनच्या धडचापासून आपण निश्चितच सावध झालो असलो पाहिजे. भारताचे हित हा एकमेव निकष या कामी ठरलेला आहे. त्याची कसोटी १९६२ च्या चीन आक्रमणात व १९६५ च्या पाकिस्तान चढाईत लागलेली आहे. या अग्निदिव्यातून होरपळल्यानंतर सावध न होण्याइतक्या इंदिराजी भोळसट नाहीत. जागतिक राजकारणातील सर्वांचेच डावपेच इतके सुस्पष्ट आहेत की त्यामध्ये आपला स्वार्थ हा एकच निकष सर्वश्रेष्ठ ठरतो. ज्या इंदिराजींनी गेल्या २५ वर्षात जगातील सर्वश्रेष्ठ अशा मुत्सद्यांना जवळून समजावून घेतले आहे. त्यांच्यापेक्षा आपल्याला काहीतरी अधिक कळते म्हणून तालुका पातळीवरील राजकीय नेते किंवा जिल्हा पातळीवरील पत्रकार त्यांना सुनावतात तेव्हा हसू येते.

देशीय राजकारणात मी मी म्हणणाऱ्यांना जमालगोटा देणाऱ्या पंतप्रधान आंतरराष्ट्रीय राजकारणात फिक्या पडतील असे कां वाटावे ते समजत नाही. नेहरुंच्या कारकिर्दीत त्यांचे मुसलमान प्रेम, जागतिक सर्वश्रेष्ठ नेता होण्याचे सुखस्वप्न इ. गोष्टी आता मागे पडल्या आहेत. त्यांच्या त्या मनातील मांडयासाठी त्यांनी पाकिस्तानचे लाड केले, गोव्याविरूद्धची कृती लांबणीवर टाकली. नासरसारख्याला जवळ केले हा सर्व इतिहास आता शिळा झाला आहे. इंदिराजींना अशा तऱ्हेचे कुठलेहि सुखस्वप्न त्यांच्या डोळ्यासमोर नसल्यामुळे प्रत्येक आंतरराष्ट्रीय प्रश्नाचा निकाल त्या भारताच्या हिताच्या दृष्टीतून लावल्याशिवाय रहाणार नाहीत. एक बंगला देश समस्या घेतली तरीसुद्धा माझे म्हणणे स्पष्ट होईल. हा प्रश्न आपल्या पंतप्रधानांनी इतक्या कुशलतेने व धैर्याने हाताळला आहे की त्यामुळे कमीत कमी नुकसानी करून याह्याखानाचे सर्व व्यूह त्यांनी जगाच्या वेशीवर टांगले आहेत. मला अनेक वेळा वाटते की आजच्या परिस्थितीत नेहरू जर

आपले पंतप्रधान असते तर त्यांनी या सर्व प्रश्नाची तत्त्वज्ञानाशी व ध्येयवादाशी सांगड घालून अनेक कोलांट्या उड्या मारल्या असत्या. कदाचित याह्याखानाच्या क्रौर्याची कडक टीका करता करता त्यांनी त्यांला तत्त्व अमान्य तपशील अमान्य असा छुपा पाठिंबा दिला नसता. पण इंदिराजींचा सुरवातीपासूनचा सर्व सौदा व्यवहारवादी आहे. कोठेही गोंधळ नाही, गडबड नाही. तत्त्वज्ञानाची झालर नाही. भारतावर कोणाचेही आक्रमण होऊ न देता त्यानी आपल्या तिसऱ्या दर्जाच्या पाईकांच्या मदतीने जागतिक लोकमत भारताला अनुकूल करून घेतले आहे. युद्धाची घनघोर छाया दिसू लागताच विद्युतगतीने त्यांनी रशियाशी मैत्री करार करून जागतिक युद्ध टाळले व त्याचा परिणाम चीन व अमेरिका यांच्यासारख्या बलाढ्य राष्ट्रावरहि झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. आंतरराष्ट्रीय प्रश्नावर इतक्या व्यावहारिक दृष्टीकोनातून आपली नाव ज्या नावाडघाने कुशलतेने तीरापार चालविली आहे त्या नावाडघाची पाठ थोपटण्याऐवजी पाय ओढणे यासारखा मूर्खपणा नाही. आज अध्यक्ष निक्सन हे जरी पाकिस्तानचा पाठपुरावा करीत असले तरी अमेरिकन जनता मोठ्या संख्येने केनेडी यांच्या पाठीशी उभी आहे. चीनला पाकिस्तानपेक्षा आपला कम्युनिझम जास्त प्रिय असल्यामुळे पाकिस्तनाची संगत त्यांना फार दिवस परवडणार नाही. एकतर बंगला देशची समस्यार ाजकीय पातळीवर मान्यता देऊन चीनला पुढाकार घऊन सोडवावी लागेल नाहीतर पाकिस्तानची संगत सोडावी लागेल. भारताचे सामर्थ्य जागतिक पटावर फार महत्त्वाचे आहे. त्याचे भौगोलिक स्थान, मनुष्यबळ, सांस्कृतिक वारसा, भौतिक ठेवा, सुसंस्कृतपणा, इ. गुणांना तोड नाही. आजपर्यंत या गुणांचे चीज ब्रिटिशांच्या अधिपत्यामुळे व नंतर आपल्याच संभ्रमावस्थेमुळे झालेली नाही. दरवेळेला आम्ही कोणाचेतरी बोट धरून जागतिक राजकारणात हिंडत–फिरत असल्यामुळे जगाच्या दरबारात भारताला पहिल्या दर्जाचे स्थान कधीच मिळाले नाही. युनोच्या सुरक्षितता मंडळात भारताला अमेरिका, रशिया चीन, इंग्लंड व फ्रान्सच्या बरोबरीने कायमचे स्थान द्यावे अशी शिफारस युनोचे माजी सरचिटणीस ट्रिगवे ली यांनी केली होती. हल्लीचे सरचिटणीस ऊ थांट

यांनाहि तसेच वाटते. परंतु भारताला या मानासाठी करावी लागणारी सौदेबाजी नामंजूर असल्यामुळे याकामी अद्याप जरी यश लाभले नाही तरी त्याचा अर्थ आम्ही कोणच्याहि दृष्टीने मागे आहोत असा नाही. उलट जपान, अमेरिका, रशिया व चीन ही तीन राष्ट्रे सोडली तर चौथ्या क्रमांकासाठी ज्या २–३ राष्ट्रात आज स्पर्धा चालू आहे त्यात भारताचा चौथा क्रम गुणानुसार जगाला लावावाच लागेल. दुर्दैवाने आमचे दारिद्र्य याठिकाणी आड येत आहे. ते दूर करण्यासाठी उत्पादन वाढवावे तर त्याकामी आमचे मजूर नेते निष्प्रभ ठरले आहेत. हा जगन्नाथाचा रथ सर्वांनी मिळून एक दिलाने पुढे नेण्याऐवजी आमच्यातीलच काही देशद्रोही बांधव त्याला स्वार्थापायी खीळ घालीत आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनी व जपानसारखी राष्ट्रे औद्योगिक उन्नतीच्या जोरावर इतकी प्रगती करीत असताना भारताजवळ त्यांच्यापेक्षा कितीतरी पट अधिक सामुग्री असताना आम्ही मागे पडतो यासारखे दुसरे कर्मदारिद्र्य तरी कोणते ? या सर्व आपत्तींना धैर्याने तोंड देऊन आपला देश आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रगतीच्या मार्गावर आहे. अशा बाबतीत एकमुखी नेतृत्त्व असावे लागते ते आपल्याजवळ आहे. किंबहुना ही खूणगाठ लक्षात घेऊनच आपल्याला खच्ची करण्यासाठी अमेरिका, चीन पाकिस्तान इ. हितशत्रू आपला सदैव तेजोभंग करीत आहेत. अशा आणीबाणीच्या वेळी प्रत्येक भारतीय देश-भक्ताने आपल्या नेत्याच्या पाठीशी एकदिलाने उभे राहून त्याचे समर्थन केले पाहिजे. आजपर्यंत आमच्या परराष्ट्र नीतीत शेराला सव्वाशेर हा न्याय लावावा असे आम्ही म्हणत होतो व तो न लावल्याबद्दल गांधी व नेहरूंना दूषणे देत होतो. आज इंदिराजींनी तोच न्याय लागू करताच जर पुन्हा आम्ही तीच हाकाटी सुरू केली तर याचा अर्थ नुसते ओरडण्यापलीकडे आम्हाला या विषयात काहीच समजत नाही असा होईल. या क्षेत्रातील व्यवहारवादाचे हे नवे पर्व आम्ही समजावून घेतले पाहिजे व त्यांचे योग्य रसग्रहण करून त्याची पावती आपल्या नेत्यांना देवून त्यांचे मनोधैर्य अधिक खंबीर केले पाहिजे.

● ● ●

देशाला झालेला कर्करोग

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या देशाला झालेला महान कर्करोग म्हणजे– सर्व स्तरांवरील स्वार्थ, सत्ता, व सट्टाबाजी, आळस, श्रीमंत होण्याची छू–मंतर किमया इ. रोगांनी इतके पछाडले आहे की त्यामुळे यथावकाश आपण आणखी गरीब झालो तर कुणा विचारवंताला आचर्श्य वाटणार नाही. ब्रिटिशांनी आमच्यामध्ये निरनिराळे धर्म व जाती यांना प्राधान्य देऊन आमच्या सार्वजनिक जीवनात जे किडके बीज रोवले त्याला आलेली ही शापफळे व फुले आहेत. लायकीपेक्षा जात–पात, धर्म, भाषा, अल्पसंख्यांक इ. गुणांची पूजा करण्याचे ठरल्यावर साहजिकच त्याच एवं गुण विशिष्ट प्रकाराला प्राधान्य आले व पात्रता मागे पडली. नेहरू इतके बुद्धिमान होते व स्वतःला बुद्धीवादी समजत होते तरी त्यांनाहि या रोगाने ग्रासले होते. अल्पसंख्यांक म्हणून मुसलमानांचे लाड करण्याची जी स्पर्धा स्वातंत्र्य पूर्वकाळात ब्रिटिश राज्यकर्ते व म गांधीप्रणीत काँग्रेस यांच्यात चालली होती, तीच प्रथा स्वराज्य प्राप्तीनंतर नेहरूंनी पुढे चालविली. त्यांचे पहिलेच मंत्रीमंडळ बनविताना निरनिराळचा खात्याचा कारभार पहाण्याची पात्रता लक्षात घेण्याऐवजी हिंदू किती तर त्याप्रमाणात मुसलमान किती असावेत, शीख, ख्रिश्चन व हरीजन यांचे प्रतिनिधी किती असावेत, निरनिराळचा प्रांताना प्रातिनिधीकता दिले पाहिजे; काँग्रेसला जास्त पैसा कोण मिळवून देतो, राज्यकर्त्यांना त्रास देण्याची (Nuisance value) किती आहे. यांचा विचार प्रामुख्याने करून झाला व त्यामुळे जगजीवनराम, बलदेवसिंग वगैरे पूर्वी कधीहि न ऐकलेली अनेक नावे आपल्या डोळचासमोर चमकू लागली. या मंडळींची होयबा वृत्ती लक्षात घेऊन त्यांचे पाय केन्द्र मंत्रीमंडळात कायमचे रुजले. अशा लोकांना जाति वंशिष्ठच तर होतेच पण त्याचबरोबर मानाच्या जागेमुळे सभोवताली जमणारा स्तुतीपाठकांचा गोतावळा त्यांना वेडे करून सोडत होता. यातून

पुढेपुढे सत्तेच्या जागेच्या वाटपाबरोबर घुसखोरी थेट वरपासून खालपर्यंत सुरू झाली. याचे स्वरूप कधीकधी इतके प्रचंड होते की मंत्रिमंडळाची बैठक होताच त्याच रात्री गुप्त बातम्या संबंधितांना विकण्यासाठी लाखो रुपयांचे सौदे होत. धूर्त उद्योगपतींनी या मंत्र्यांची घरभरणी करून त्यांना आपल्या गोठ्यात बांधून ठेवले होते यामुळे वेट (Wait) वेट (Weight) व वेट (Wet) यातील फरक न समजणारे मंत्री अल्पावधीत करोडपती झाले तर ज्यांच्या तोंडावरची माशी उडत नसेल असे मंत्री आपल्या प्रांताचे अनभिषीक्त राजे होऊन स्वतःच्या प्रांताच्या व जातीच्या वतीने नेहरू व इंदिराजींशी सौदे करू लागले. हाच पापाचा घडा प्रांतोप्रांती शिरून महाराष्ट्रासारखे तुरळक अपवाद सोडल्यास सर्वत्र या घूसखोरीने शिरकाव करून आपले सार्वजनिक जीवन व राजकारण पोखरले आहे. या सूजीलाच आपण शारीरिक घष्टपुष्टता समजून तिचा जो गौरव करीत आहोत तो केव्हातरी आपल्या अंगाशी आल्याशिवाय रहाणार नाही. महाराष्ट्रात आत्तापर्यंत हा रोग नव्हता म्हणून आम्हाला अभिमान वाटत असे. पण अलीकडे शेती सुधारण्याचे नावाखाली पाण्याखालच्या जमिनी येन केन प्रकारेण घशात घालण्याची आमच्या मंत्रिमंडळात जी स्पर्धा सुरू झाली आहे त्यामुळे आजपर्यंत थिएटर्स व हॉटेल्सपुरती जी कीड मर्यादित होती ती आता ग्रामीण भागात पसरत जाऊन देशाची सर्व अंगोपांगे व्यापणार आहे.

ही हाव सत्ताधीशांपुरतीच मर्यादित नसून पुष्कळसे राजकीय विरोधक त्याला बळी पडले आहेत. अगदी समाजवादाचा झेंडा घेऊन कामगार व शेतकऱ्यांना रात्रंदिवस चिथावणारे मजूर नेते, लाल बावटचाखालील लाल सम्राट, धर्मनिष्ठ, पीठाचार्य किंवा दाढ्या वाढवून, लुंगी नेसून चेहेऱ्यावर बावळटपणा दाखविण्यात यशस्वी झालेली आजच्या पटावरील अनेक पुढारीमंडळी महिने बांधून खरेदी करता येतात, हा नित्य अनुभव आहे. तेव्हा अशा परिस्थितीत कोणी कोणाला नावे ठेवायची हाच बिकट प्रश्न आहे. एकवेळ उद्योगपती आपल्या हिशेब ठेवण्यातील चातुर्यामुळे व सट्टेबाजीच्या जोरावर आपले शोषण करीत होते. त्यांच्या नावाने खडे फोड-

णारे हे दे. म. आता तोच वारसा राजकारणाचा उद्योग करून चालवीत आहेत. संस्थानिकांना आळशी, बाई, बाटली व पैसा (Wine, Woman and Wearth) यांचे बटीक समजून आपल्या जीवनातून त्यांची हकालपट्टी केली. पण तीच जागा आता या राजकीय पेंढाऱ्यांनी घेतली आहे. लोकशाही-मधे जो जास्त मते मिळवील तो सत्तेला पात्र ठरणे स्वाभाविक आहे. त्यातून या दरिद्री देशात मतदानाच्या हक्कासाठी योग्य वयाशिवाय दुसरी कसलीहि पात्रता लागत नसल्याकारणाने या लोकांच्याकडे तोंड भरून आश्वासने फेकली की त्यांची मते मिळतात. त्यांच्यातील गुंड व टाऊट लोकांना हवा तो मलिदा चारला की तुम्हाला हवी ती मते मिळू शकतात अशा या बिकट पेचप्रसंगातून आम्ही सुटणार कसे ? नुसती चारित्र्यसंपन्नतेची व नीतिवर व्याख्याने देऊन हा प्रश्न सुटणार नाही. कारण अशी व्याख्याने देण्यात नेहेमी सांव सोडून गुंडच पुढे असतात. आपल्या धर्मातील मूलभूत मौलिक तत्त्वांचा पुनरुद्धार करू असे तुम्ही म्हणालात तर लगेच तुमच्यावर सनातनी, धर्ममार्तंड, चातुर्वण्याचे भोक्ते वगैरे शेलक्या शिव्यांचा आहेर केला जाऊन तुमचे सार्वजनिक जीवन संपुष्टात आणले जाईल. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' असे रामदासांनी आम्हाला शिकविले. पण असे वंदिण्यास योग्य पाऊलेच आढळत नसल्यामुळे आमची वाकण्याची सवय नष्ट झाली असून त्यामुळे आमच्यात जो ताठरपणा आला आहे त्यापुढे आम्ही सर्व जग तुच्छ लेखतो अशा या निराशाजनक परिस्थितीतून काहीच मार्ग निघणार नाही काय ?

नेहरूंना या लाचखाऊपणाची अतिशय चीड होती व अनेक कुलंगडी जेव्हा त्यांच्यासमोर पुराव्यानिशी सिद्ध होत तेव्हा 'जाऊ द्या, चालायचच ही संक्रमणावस्था आहे, संबंधित व्यक्तिला थोडी सुस्थिती प्राप्त झाल्यावर ही सवय मोडेल' असे त्यांच्या भोवतालचे सिद्धसाधक त्यांना सांगत. तेवढचा-वर काम भागले नाही तर ते गृहस्थ निवडणुकीत आपणास मदत करणार नाहीत किंवा पैसा देणार नाहीत असा दमहि दिला जात असे. काहीवेळा नेहरूंना असे वाटे की त्या माणसाजवळ लाख, दोन लाख रुपये जमले की त्याची भूक शमेल. गरीबी हटाओ याची सुरुवात या ठिकाणी झाली.

गरीबीची व्याख्या सर्वांना ज्ञात आहे. पण ती हटाओ हे केव्हा समजायचे याची मात्र व्याख्या अद्याप निश्चित झाली नाही. अनेक मंत्री व संत्री, उद्योगपति किंवा संस्थानिकांच्या बरोबरीने सधन झाले आहेत तरी त्यांची गरीबी अजून हटलेली नाही. स्वतःची गरज त्यांनी एक खादीचा कुर्ता, लुंगीवजा धोतर व तिरक्या गांधी टोपीपुरती मर्यादित ठेवली असली तरी त्यांच्या बायका (कधी यांची संख्या एकाहून अधिक असते) व मुले यात (पुतणे, भाचे, पित्ते व चमचे यांचाहि समावेश होतो.) यांची गरीबी हटविण्याचे पवित्र काम सातत्याने चालू आहे.

देशाला या रोगातून मुक्त व्हायचे असेल तर समर्थ नेतृत्वाची व ज्याचे हात या घाणीत बरबटलेले नाहीत अशा व्यवहारवादी व धाडसी नेत्याची गरज आहे. असा नेता शंभर टक्के प्रत्येकाच्या पसंतीला उतरेलच असे नाही. समजा तो शंभर टक्क्याजवळ येऊ शकतो असे दिसताच त्याचे चारित्र्यहनन करण्याचे अनेक सुलभ उपाय अलिकडच्या प्रचार तंत्रात सापडतात. नेहरुंच्यासारख्या अत्यंत प्रामाणिक व निरलस नेत्यावर सुद्धा हे प्रयोग कमी झाले नाहीत. तेव्हा शंभर टक्के गुण मिळविणारा नेता शोधीत न बसता सध्या आहेत त्याच नेत्यांना जर शंभरापैकी गुण देण्यावे ठरविले तर माझ्या अल्पबुद्धीनुसार सर्वात जास्त गुण आपल्या पंतप्रधानांना मिळतील. त्यांच्यात दोष जरूर आहेत कारण कित्तीही झाले तरी त्या मानव आहेत. कदाचित त्यांना सतेची हाव असेल पण ती सत्ता मिळाली असता त्याचा त्या राष्ट्राच्या दृष्टीने किती सदुपयोग करतात व स्वतःसाठी किती दुरूपयोग करीत नाहीत यावर त्यांची पात्रता अवलंबून आहे. याबाबतीत देशद्रोह, स्वार्थ, घुसखोरी या दुर्गुणांच्या मानाने अहंमन्यता आवडी–निवडीबद्दल चिकित्सा हे दुर्गुण यापुढे फिके पडतात. चारित्र्यहनन करण्याच्या नव्या तंत्रात त्या लाल आहेत किंवा होऊ पहात आहेत, त्यांच्या मुलांना छोट्या मोटार उत्पादनाची एकमेव मालकी हक्क देऊ पहात आहेत वगैरे सांगितले जाते. परंतु असे सांगणाऱ्या लोकांचे हात किती बरबटले आहेत तेहि आपण पाहिले पाहिजे. देशाला जर या स्वार्थाच्या रौरव नरकातून वर काढावयाचे असेल तर त्याला अत्युच्चपदी

साहसी नेतृत्व लाभल्याशिवाय ते साधणार नाही. ध्येयवादाशी व्यवहाराची सांगड घालता आली पाहिजे. सत्याच्या कक्षा परिणामी सत्यापर्यंत जाऊन भिडल्या पाहिजेत. चोराला तू चोर आहेस म्हणून तोंडावर सांगण्याइतका निर्भिडपणा प्राप्त झाला पाहिजे व या सर्व कसोट्या लागल्या तर इंदिराजींना अग्रक्रम देणे प्राप्त आहे. आधीच हा रोग इतका बळावला आहे व खोलवर रुजला आहे की त्याचे उच्चाटन करणे कदाचित पंतप्रधानांना लवकर जमणार नाही. या बाबतीत इंदिराजी ही व्यक्ति महत्वाची नसून त्या जी धोरणे अवलंबित आहेत. ती महत्वाची आहेत व याच धोरणाचा पाठपुरावा सतत होत राहिला तर थोडे फार यश मिळण्याची शक्यता आहे. इंदिराजींच्या नंतर येणाऱ्या पंतप्रधानात गुण दिसले पाहिजेत. तसा नेता आज तरी त्यांच्या मालिकेत किंवा बाहेर दिसत नाही. तेव्हा पुन्हा उपस्थित नेत्यात जास्त गुण मिळणारी व्यक्ति त्याजागी निवडावी लागेल असे असले तरी कसोटीचे मूल्यमापन एकाच मापाने झाले पाहिजे व त्यादृष्टीने आजच्या पंतप्रधान जी पावले टाकीत आहेत ती महत्वाची आहेत. त्यांना याकामी निरनिराळ्या मार्गाने अनेक अडथळे आणले जात आहेत पण सूज्ञांनी ते ओळखून आपल्याला पटतील त्या कामी त्यांना पाठिंबा देणे अगत्याचे आहे. आजच जर हा निस्वार्थी समाजसेवेचा व व्यवहारी धोरणाचा तसेच उक्ती व कृतीत समानता आणण्याचा पायंडा आपण रोवला नाही तर आपला भविष्यकाळ खचित अंधकारमय झाल्याशिवाय रहाणार नाही

• • •

इंदिराजींचे आजचे सहकारी

पंडित नेहरूंच्या मृत्यूनंतर इंदिराजींना कैः शास्त्रीजींनी मंत्रीमंडळात पाचारण केले होते. परंतु अनेक कौटुंबिक प्रश्न त्यावेळी सोडविण्याची निकड असल्यामुळे व आपल्या वडिलांच्या निधनामुळे झालेले अतीव दुःख या दोन कारणांनी त्यांनी मंत्रीपद थोडे उशीरा स्वीकारले. कैं. शास्त्री हे कधीहि सत्तेचे भोक्ते नव्हते. नेहरू परिवारात हिंडताना सुद्धा ते स्वतःला 'हुकुमोंका बंदा' असे हात जोडून अत्यंत विनयाने म्हणत. तेव्हा मुख्यमंत्रीपद स्वीकारताना शास्त्रीजींची हीच भूमिका होती की, काही दिवस आपण हा भार संभाळावा व नंतर तो इंदिराजींना सुपुर्द करावा. ते जर आणखी काही दिवस हयात रहाते तर पुढच्या निवडणुकीनंतर त्यांनी हे काम निश्चित केले असते. मुख्यमंत्रीपदासाठी दुसरे उमेदवार म्हणजे श्री. मोरारजी देसाई हे होते. श्री. देसाई हे एक अत्यंत महत्वाकांक्षी पुढारी आहेत. नेहरूंच्या कारकिर्दीवर ते मनापासून नाराज होते व नेहरूंना प्रधानमंत्रीपदावरून खाली ओढण्यासाठी त्यांनी अनंत खटपटी केल्या पण मोरारजींचा अहंमन्य स्वभाव, हेकटपणा, भांडवलशाहीचा पुरस्कार करणारी विचारधारा, स्वतः पडद्याआड राहून आपल्या चिरंजिवांची त्यांनी केलेली घनदौलत इत्यादि कारणांनी काँग्रेस पक्षात त्यांना बहुमत मिळणे अशक्यप्राय झाले. ही सर्व कारस्थाने परिचित असलेल्या पुढाऱ्यांनी काय वाटेल ते झाले तरी मोरारजींना पंतप्रधान होऊ द्यावयाचे नाही असा चंग श्री. कामराज यांच्या नेतृत्वाखाली केला. याकामी श्री. कामराज यांना सर्व डाव्या नेत्यांचा पाठिंबा मिळाला. श्री. मोरारजी यांचा कडवा महाराष्ट्र द्वेष व संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील दुष्टपणा लक्षात घेऊन महाराष्ट्राचाहि त्यांना तीव्र विरोध होता अर्थात त्यावेळेपासूनचे आपले नेते श्री. यशवंतराव चव्हाण हे तोंडाने तसे बोलत नसल्यामुळे महाराष्ट्राचे हे मत जरी मुग्ध होते तरी मते मात्र प्रथम शास्त्रीजींना व नंतर इंदिराजींना देण्यात आली.

वास्तविक श्री. चव्हाण जर पहिल्यापासून श्री. मोरारजींच्या विरुद्ध खुलेपणाने उभे राहिले असते तर शास्त्रीजींच्यानंतर इंदिराजींच्याऐवजी तेच पंतप्रधान झाले असते पण त्यांच्या कुंपण मनोवृत्तीमुळे त्यांच्या मनाचा कोणास थांग लागत नसे व हीच मनोवृत्ती आजहि आपल्याला नडत आहे. श्री. चव्हाण हे डाव्या विचारांचे म्हणून सर्वांना ज्ञात होते. शास्त्रीजींना जेव्हा तुम्ही पंतप्रधान व्हा म्हणून सांगण्यात आले तेव्हा त्यांनी सुद्धा श्री. चव्हाणांचे नाव सुचविले. कारण संरक्षणमंत्री म्हणून त्यांची अलौकिक कामगिरी श्री. कृष्णमेनन यांच्या अपयशाच्या पार्श्वभूमीवर विशेष खुलून दिसत होती. पण त्यावेळी कर्नाटक नेते महाराष्ट्र–म्हैसूर सीमाप्रश्नामुळे श्री. चव्हाणांच्यावर नाराज होते व श्री. मोरारजीविरूद्ध श्री. चव्हाण असा सामना झाला असता तर श्री. चव्हाणांच्या यशाची खात्री नसल्यामुळे शास्त्रीजींच्यासारखा अजातशत्रू त्या जागी निवडण्यात आला.

शास्त्रीजींच्या निधनानंतर इंदिराजींना जेव्हा पंतप्रधानकीची वस्त्रे देण्यात आली. तेव्हाची पार्श्वभूमी लक्षात घेतल्याशिवाय त्यांच्या अडचणी समजणार नाहीत. त्यावेळी श्री. कामराज यांच्यापुढे इंदिराजींच्याबरोबर श्री. चव्हाण व श्री. जगजीवनराम ही दोन नावे होती. पण श्री. मोरारजींचा पराभव करण्यास तितकाच प्रबळ उमेदवार हवा एवढ्याच एका भावनेने इंदिराजींचे नाव व आपले गाव या भावनेने श्री. कामराज यांनी या इंदिराजींना गादीवर बसविले. तरुण व डाव्या विचारांच्या नेत्यांची त्यांचे नेतृत्वाला अनुकुलता होती. पण त्यांच्यापेक्षा वयाने मोठे असलेले सर्व नेते मनातून त्यांना अपयश यावे व त्याजागी आपण अथवा आपला उमेदवार पंतप्रधानपदी आरुढ करावा या मनोराज्यात दंग होते. अशा ह्या संशयास्पद वातावरणात इंदिराजींना आपल्या सहकार्यांचा विश्वास वाटेनासा झाला. त्यामुळे नव्या विचारांचे युवक नेते त्यांना जास्त जवळचे वाटू लागले. निदान ते जे बोलतील ते चुकीचे असले तरी प्रामाणिक आहेत ही भावना इंदिराजींना जेष्ठ नेत्यांच्या तुलनेने सोईस्कर वाटली. समाजवाद जवळ आणण्यासाठी जो दहा कलमी कार्यक्रम आखण्यात आला त्याला तोंडाने संमती देऊन शासनात त्याला नख लावण्याचा उपक्रम सर्वश्री. मोरारजी

देसाई, स. का. पाटील, निजलिंगप्पा, संजीव रेड्डी व जगजीवनरामसारख्या नेत्यांनी सुरू केला. यंगटर्क्स यांनी या पावित्र्याविरूद्ध बंड करून या उजव्या नेत्यांना–त्यांचे आंतरिकःकोऽपि हेतू । उजेडात आणला व पुढील राष्ट्रपति कोण या वादातून त्याला तोंड फुटले. जोपर्यंत इंदिराजींना त्यांच्या कार्यक्रमान मधुतिष्ठति जिव्हाग्रे हृदये तू हलाहलम् । या न्यायाने काम चालू होते. तोवर दम खाणाऱ्या इंदिराजींनी जेव्हा श्री. संजीव रेड्डी यांना राष्ट्रपति करून आपल्याला व पर्यायाने आपल्या विचारसरणीला बाहुले बनविण्याचा उघड डाव त्यांना दिसून आला तेव्हा त्यांचे माथे भडकले. किंबहुना त्यावेळी त्या जर थोड्या शांतचित्ताने श्री. चव्हाण यांना महत्त्व देऊन त्यांच्याशी खलबत करत्या तर पुढील रामायण घडलेही नसते. श्री. चव्हाणांना त्या विश्वासात घेत नाहीत तर दुसरा पक्ष त्यांना पंतप्रधान करण्याचे मनसुबे रचतो. या पेचात श्री. चव्हाण यांनी पंतप्रधानकीच्या मोहाने इंदिराजींच्या विरूद्ध कौल दिला ही दुसरी चूक त्यांचेकडून झाली. जर जगजीवनराम त्यावेळी राष्ट्रपति झाले असते तर आज चव्हाणांच्याकडे उपप्रधानमंत्रीपद आपोआप आले असते. पण त्यावेळी सर्वच मामला इतका गरमागरमीचा झाला की त्यामुळे इंदिराजींची नैसर्गिक तडफ उफाळून येऊन त्यांनी प्रथम श्री. मोरारजींवर कडाडून हल्ला चढविला व पुढचा मागचा विचार न करता चौदा बँकांचे राष्ट्रीयोकरण केले. या दोन गोष्टींमुळे बहुजनसमाजात व डाव्या नेत्यात त्यांची प्रतिमा उजाळली व त्यांचीच पावती म्हणजे या वर्षातील निवडणूकांमधे अपूर्व यश हे होय. त्यांना निवडून जनतेने त्यांच्यावर जो अपूर्व विश्वास दाखविला त्या पाठीमागे या बाई बोलतील ते करतील त्यांच्यात ती तडफ आहे व त्या प्रामाणिक आहेत हीच भावना दर्शविते. जनतेच्या या अपेक्षेला उतरावयाचे म्हणजे आपली कर्तबगारी त्याला शोभून दिसली पाहिजे. त्यासाठी आपले सहकारी आपल्या विचाराशी संपूर्णतया सहमत असले पाहिजेत. यादृष्टीने जेव्हा त्या सभोवार पाहू लागल्या तेव्हा त्यांच्या पदरी तीव्र निराशा आली. निवडणुकीपूर्वी श्री. जगजीवनराम किंवा श्री. चव्हाण यांना त्या दुखवू शकत नव्हत्या. कारण त्यांच्यापैकी एकजण जरी बाहेर पडला असता तरी त्यांचे बहुमत संपुष्टात आले असते. बौद्धिक पात्रतेपेक्षा इतर कारणे प्रबळ असल्यामुळे मंत्रिमंडळात काही व्यक्तिना

त्यांना मनाविरूद्ध समाविष्ट करून घ्यावे लागले. त्यामुळे आपले सहकारी बुद्धीने जरी मंद असले तरी आपल्याशी प्रामाणिक रहातील व आपल्या डाव्या विचाराशी त्यांचा चेहरा मोहरा मिळता जुळता असेल अशा पद्धतीने त्यांनी निवडले. सिंडिकेटद्वारा त्यांना विरोध करणाऱ्या सर्व नेत्यांना धूळ चारल्यानंतर जर एखाद्या कूट प्रश्नावर अनुभवी नेत्यांचे विचार जाणून घ्यावे असे त्यांना वाटले तर त्यांच्या विश्वासातील असा एकही प्रामाणिक नेता आज यांचे सहकाऱ्यात नाही. श्री. चव्हाण हे या दृष्टीने खरोखरीच योग्य व समजदार आहेत. त्यांच्याजवळ संघटनाचातुर्य व प्रसंगाची जाण आहे. परंतु त्यांच्या कुंपण मनोवृत्तीमुळे त्यांना सिंडिकेटतर्फे वारंवार जी प्रलोभने दाखविण्यात येतात त्यामुळे ते आपल्याशी किती प्रामाणिक रहातील व केव्हा गोत्यांत आणतील याची खात्री नसल्यामुळे श्री. चव्हाण इंदिराजींच्या किचन कॅबीनेटमधे प्रवेश करू शकत नाहीत. हा खरोखरी दुर्दैवाचा भाग आहे. वास्तविक श्री. चव्हाण यांनी मनापासून इंदिराजींचे श्रेष्ठत्व मानून त्यांचा विश्वास संपादन करणे आवश्यक आहे. त्यांचा पंतप्रधान होण्याचा मान आता हुकला आहे. सिंडिकेटवाले पुन्हा डोके वर काढतील व आपला शब्द पाळून त्यांना पंतप्रधान करतील हा भ्रम आहे. यापुढे श्री चव्हाणांचे स्थान इंदिराजींच्या दरबारात नंबर दोनचे असावसास पाहिजे व त्यांनी जर आपली वृत्ती सोडली व त्यावद्दल इंदिराजींना मनोमन विश्वास पटला तरच ते शक्य होईल. त्यांचे दुसरे सहकारी श्री. जगजीवनराम हे बुद्धीमान म्हणून कधीच प्रसिद्ध नव्हते. डॉ. आंबेडकरांना शह देण्यासाठी हे नररत्न विहारच्या खाणीतून नेहरुंनी शोधून काढले व तेव्हापासून आपल्या हरिजन भांडवलावर ते सत्तारूढ आहेत. हरिजनांना आपल्या जागेचा जास्तीत-जास्त लाभ देण्यापलीकडे गेल्या २५ वर्षांत या महाभागाने काहीहि विशेष केलेले नाही, त्यांच्याभोवती जे मतलबी स्तुतिपाठक जमा होतात त्यांच्या स्तुतिला भुलून आपणही पंतप्रधानकीच्या मुंडावळ्या बांधण्यास उपवर आहोत असे त्यांना वाटते व सध्याच्या मंत्रीमंडळात ते सर्वात जुने असल्यामुळे त्यांना संरक्षणमंत्री केले व भारत-पाक युद्धामुळे त्यांची प्रतिमा उजळली तरीहि 'ऐकावे जनाचे, करावे मनाचे' या न्यायाने इंदिराजींना सर्व निर्णय स्वतःच्या बुद्धीने घ्यावे लागतात. सर्वश्री.

दिनेशसिंग, डी. पी. मिश्रा, उमाशंकर दिक्षित, पी. एन. कौल इ. नावे त्यांच्या (इन्नर सर्कल) आंतरवर्तुळात घेतली जात असली तरी इंदिराजींचा स्वभाव मी ओळखत असल्यामुळे ती निव्वळ प्रचाराची अंगे होत. ही सर्व नावे हळूहळू काळाच्या आड जातील. कारण अशा वेळी मनुष्य स्वतःला न पटणारा, पेलणारा किंवा आवडणारा सल्ला ऐकून घेण्याचा मनःस्थितीत नसतो. त्याला फक्त स्वतःच्या हो ला दुसऱ्याचा हो लागत असतो. नेहरुंची जी गत होती तीच आज इंदिराजींची झाली आहे त्यामुळे त्यांच्या विचारात बदल घडवून आणेल अशी कोठलीहि मानवी शक्ति अस्तित्वात नाही व म्हणून दुसऱ्या कोणा व्यक्तिचा वृत्तपत्रातून होणारा बडेजाव बाजूला सारून आपण लोकमत जागृत ठेवले पाहिजे. यापुढे फक्त प्रभावी लोकमत हेच इंदिराजींना सरळ रस्त्यावर ठेवू शकेल. सध्याचे मंत्रीमंडळ सल्लामसलत हा लोकशाहीतील अपरिहार्य देखावा आहे. स्वतः इंदिराजी कितीही कार्य-कुशल असल्या तरी प्रभावी लोकमताचा अंकुश त्यांच्यामागे सदैव असला तरच आपण प्रगतिपथावर राहू

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, डाणे. स्थलम
अनुक्रम ७५५९२ वि: निबंध
आज्ञा २१५८ वो: दि: ३१.३.५

इंदिराजीचे विरोधक

इंदिराजींचा स्वभाव एक घाव दोन तुकडे असा रोखठोक असल्यामुळे घरी-दारी त्यांना अनेक शत्रू निर्माण होणे स्वाभाविक आहे. बघू, अभ्यास करून कसे काय जमते ते, पाहू या, तत्त्व मान्य पण तपशील पहायला पाहिजे, म्हटलं तर खरं, म्हटलं तर खोटं असे सार्वजनिक जीवनातील अनेक परवलीचे शब्द म्हणजे त्या त्या प्रश्नांचे नकारार्थी उत्तर असते. पण मनुष्य स्वभाव असा गमतीदार आहे की त्याला वरील उत्तरे परवडतात. पण तोंडावर स्पष्टपणे तुम्ही चूक आहात, तुमचे म्हणणे मला पटत नाही, तुमचे काम मी करू शकणार नाही, तुम्ही खोटे बोलत आहात, वगैरे शब्दांनी एखाद्याने बोळवण केली तर लगेच त्याची ती निर्भत्सना होते व मग तो आपल्या शक्तिनुसार स्पष्ट बोलणाराचा सूड घेऊ इच्छितो. कोणी हेवादेवा सुरू करतात तर कोणी स्पष्टवक्त्याची निर्भत्सना करून स्वतःचा राग शमवितात. राजकीय क्षेत्रात अशी असंतुष्ट मंडळी त्याच पक्षात जमले तर दबा धरून बसतात व वेळ येताच डोके वर काढून आपल्या विषारी नांगीने तुम्हाला डसतात. जे जास्त प्रामाणिक अथवा अविचारी असतात ते विरोधी पक्षाला मिळून तुमचा पाणउतारा करण्यात पुरुषार्थ मानतात. या सर्व विरोधात सत्य किंवा तत्त्व कोठेही नसते. हा सर्व व्यक्तिगत ईर्षा, आकांक्षा व लोभ यांच्या पोटी निर्माण झालेला सौदा आहे. मी गेली ४० वर्षे राजकारण अगदी अत्युच्च क्षेत्रात राष्ट्रीय व प्रांतीय स्तरावर जवळून पाहिले आहे. व प्रत्येक विरोधात तुरळक अपवाद सोडले तर व्यक्तिगत हेवेदावे गुंफलेले असतात व त्यातूनच अनेक महान समस्या निर्माण होतात. आपल्या डोक्याची सर्वात मोठी कर्मकटकट म्हणजे पाकिस्तान-निर्मिती होय व हे पाकिस्तान जिनांच्या काही व्यक्तिगत महत्त्वाकांक्षांना म. गांधींनी खतपाणी घातले म्हणून पाकिस्तान निर्माण झाले. या निर्मितीपूर्वी जिनांनी पाकिस्तान निर्माण करणे हा एक मूर्खपणा आहे, ते

स्वयंप्रज्ञ कधीच रहाणार नाही, इत्यादि विचार मजजवळ अनेक वेळा बोलून दाखविले. परंतु गांधींनी त्यांना काँग्रेसचे अध्यक्षपद नाकारले व इतर मुसलमान नेते व जवाहरलालांना जास्त जवळ केले. यामुळे चिडून जाऊन त्यांनी गांधींची खोडकी जिरविण्याचे ठरविले व या रस्सीखेचीतून किती भयंकर परिणाम झाले ते आज आपण पहातच आहोत.

इंदिराजींच्या फटकळ स्वभावामुळे त्यांना सच्चे मित्र कोणीच नसावे असा माझा समज आहे. जे त्यांच्या बाजूला आहेत ते स्वार्थी तरी असावेत किंवा बुद्दू असावेत. काही धूर्त मंडळी त्यांच्या पाठीशी पुढल्या मोक्यासाठी टपून बसलेली, ही जशी त्यांच्या समर्थकांची बाजू तसाच काहीसा प्रकार विरोधकांचा आहे. राजकारण हा एक डावपेचांचा खेळ झाला असल्यामुळे त्यात प्रामाणिकपणाला वाव उरलेला नाही. जो तो अंतरिक : कोऽपी हेतू। या न्यायाने राजकारणात वावरत असतो. त्यामुळे कोणाहि राजकीय पुढाऱ्याच्या जाहीर वक्तव्यावर विश्वास ठेवू नये असे माझे प्रामाणिक मत आहे. स्वराज्यप्राप्तीपूर्वीची देशभक्ती व निष्ठा संपुष्टात आली असून तिची जागा सत्तालोभ, अहंमन्यता व द्रव्यलोभाने घेतली आहे. आजच्या राजकीय पक्षात जनसंघाची विशिष्ट विचारसरणी सोडली तर कोठल्याही पक्षाला आपले स्वतंत्र अस्तित्व टिकविण्याची गरज नाही. एकाच काँग्रेसमधे राहून हे नेते आपले इष्ट कार्य मतपरिवर्तनाच्या मार्गाने साधू शकतात पण प्रत्येकाला पुढारी होण्याची हाव सुटल्यामुळे अनुयायांपेक्षा पुढाऱ्यांची संख्या अलिकडे जास्त झाली आहे. खुद्द काँग्रेसमध्ये स्वतःला समाजवादी म्हणवणारी मंडळी साखरेचे कारखाने चालवितात. जिल्हा परिषदावर हुकुमत चालवितात. सहकारी व भूविकास बँकावर डल्ला मारतात. जलसिंचन योजनेच्या नावाखाली लाखो रुपयांची उघळपट्टी एकीकडे चालू असताना दुसऱ्या हाताने कामगारांच्या संघटना आपल्या स्वामित्वाखाली राबवून कुठे बोनसने लढे, कुठे मोर्चे तर कुठे निषेध सप्ताह अशा रीतीने त्यांचे कार्य अविरत चालू असते. देशातील लाखो दरिद्री बांधवांचा किंवा हरिजन, गिरिजन अथवा शेतमजूर यांच्या समस्या सोडविण्यासाठी कोणाही समाजवादी नेत्याला तो कोठल्याही पक्षाचा असला तरी त्याबद्दल कसलीहि पोटतिडिक वाटत नाही. हे झाले आमचे समाजवादी नेते. कम्युनिस्ट हे तर

बोलून चालून परधार्जिणे. कुणाच्या खिशात लेनिनचा फोटो तर कुणाच्या खिशात माओचा फोटो. हे लोक खरोखरी देशद्रोही समजले पाहिजेत. पण घोषणांच्या बळावर रशिया व चीनकडून भरपूर मलिदा खाऊन स्वतःची गुजराण भागविणारे नेतेही वृत्तपत्रातून सदैव दर डोके काढीत असतात. अशा हच्या साठमारीच्या खेळात उडदामाजि काळे गोरे, काय निवडावे निवडणारे असा प्रश्न सामान्य नागरिकांपुढे उभा रहातो. त्यावेळी स्वतःच्या शब्दाला जागण्याचा प्रयत्न करणाऱ्या इंदिराजी या वरून कितीहि ओबड घोबड असल्या तरी त्या लोकांना चालतात पण या लोकशाहीच्या युगात नीती व धर्म यांचे स्थान नष्टप्राय झाल्यामुळे त्यांच्या भविष्यकाळाविषयी मला मोठी चिंता वाटते. त्या डाव्या विचारांच्या असल्यामुळे रशियाच्या संपूर्णतया आधीन गेल्या आहेत किंवा उद्या जातील याचे भय वाटत नाही. कारण माझ्या मते असे म्हणणे म्हणजे राजकीय प्रचाराचे एक अंग आहे. ज्याप्रमाणे स्वतंत्र किंवा सिंडिकेटवाले अमेरिकेच्या कच्छपि लागतील किंवा कम्युनिस्ट रशिया अथवा चीनला देश गहाण टाकतील या कल्पना जशा सहजसुलभ वाटतात त्याच विचारसरणीचा हा प्रचार हे एक अंग होय. शेवटी दगडापेक्षा वीट मऊ या न्यायाने या राजकारणी लोकांच्या मेळाव्यातून आपणाला निष्ठावंत नेते निवडावे लागणार आहेत. परीक्षेमधून परीक्षक ज्याप्रमाणे गुण देत असतो व नंतर १०० पैकी १०० गुण जरी मिळाले नाहीत तरी ज्याला सर्वांत जास्त गुण मिळतात त्याचा क्रम पहिला लावला जातो तोच न्याय याबाबतीत उचित ठरेल. ही गोष्ट स्वाभाविक असली तरी सध्याच्या राजकारणाच्या कडबोळ्यात माणसाने धूर्तपणे व चलाखीने वागले तरच त्याचा निभाव लागू शकेल. इंदिराजींनी आपल्या एकमुखी नेतृत्वाची जी घोडदौड चालविली आहे ती एका दृष्टीने आवश्यक असली तरी त्यांनी आसपास पहाणेही तितकेच आवश्यक आहे.

तात्पर्य जो विरोध आपण वृत्तपत्रातून वाचतो त्यांची झळ इंदिराजींना फारशी लागणार नाही. एकतर बहुजन समाज या सर्व विरोधकांना

ओळखून आहे त्यामुळे एखाद्या प्रांतात थोड्याफार जागा मिळाल्या म्हणून कम्युनिस्ट, समाजवादी, स्वतंत्र अथवा सिंडिकेटवाले केव्हाही अखिल भारतीय स्तरावर आपला प्रभाव पाडू शकणार नाहीत. जनसंघाची लोकप्रियता जरी वाढत असली तरी त्यांचा दृष्टिकोन पांढरपेशा वर्गापुरता मर्यादित असल्याने व हिंदु धर्मियांव्यतिरिक्त अन्य धर्मियांना त्यांचे आकर्षण नसल्यामुळे जनसंघाचा प्रभाव सदैव मर्यादित राहणार. अशा या परिस्थितीत इंदिराजींना खरी भीति त्यांच्या स्वतःच्या पक्षात आहे. त्यांचे अनेक वैयक्तिक गुण आज आपल्यापुढे प्रकर्षाने दिसत असले तरी त्यांच्या हुकुमशाही वागण्यामुळे त्यांनी त्यांच्याच पक्षात हजारो नेते व कार्यकर्त्यांना दुखवून ठेवले आहे. ही मंडळी एकेक निवडली तर जरी क्षुल्लक वाटत असली तरी उद्या इंदिराजींचा जर एखादा राजकीय पवित्रा चुकला तर त्यांना खाली ओढण्यास मागेपुढे पहाणार नाहीत. ज्या ज्या ठिकाणी आपण सार्वजनिक महत्वाचे प्रश्न सोडवितो तेव्हा चार दुढ्ढाचार्यांचा सल्ला घेण्यात काहीच कमीपणाचे नाही. ऐकावे जनाचे, करावे मनाचे हा हितोपदेश सार्थ आहे. बऱ्याच वेळा इंदिराजी हेतुपुरःस्सर किंवा घाईगर्दीत आपल्या ज्येष्ठ सवंगड्यांना विश्वासात न घेता निर्णय घेऊन टाकतात व अशा ज्येष्ठ नेत्यांना हे निर्णय जेव्हा इंदिराजींच्या दरबारातील एखाद्या सोम्यागोम्याकडून कळतात तेव्हा त्यांना काय वाटत असेल ? नेहरूंच्या वेळी बरेच वेळा असे होत असे. पण नेहरूंचे जेष्ठत्व व श्रेष्ठत्व सर्वमान्य असल्यामुळे त्यावेळी किरकोळ घुसपुशीशिवाय त्यांचा स्फोट झाला नाही. पण इंदिराजी ह्या अनेक जेष्ठ नेत्यांना डावलून पंतप्रधान झाल्या आहेत. सल्लामसलतीची परंपरा म. गांधींपासून कै. शास्त्रींच्यापर्यंत या ना त्या स्वरूपात चालू होती. आज तो परंपरा लुप्त होत असून इंदिराजींच्या सहकाऱ्यांना रबर स्टॅम्पइतकेच महत्व उरले आहे. त्यांच्या जोडीला त्यांचा रागीट व उर्मट स्वभाव. यावेळी मला श्री. कृष्ण मेनन यांच्या कार्यपद्धतीची आठवण होते. तेही आपल्या अधिकारकक्षेत नेहरूंच्या जिवावर उद्दामपणे वागत व लहानमोठ्यांची तमा न बाळगता स्वतःच्या मनाला येईल ते निर्णय घेत. चीनचा दणका बसताच सर्व मेननविरोधी शक्ति एकत्र येऊन

त्यांना नेस्तनाबूत करण्यात आले. तेव्हा तुम्ही कितीहि सर्वज्ञ असलात तरी जवळपासच्या मंडळींना विश्वासात घेणे ही कार्यपद्धति अत्यंत महत्वाची आहे. जसजशी इंदिराजींची लोकप्रियता जगात वाढत आहे तसतशी त्यांची जबाबदारीही वाढत आहे. अशावेळी जर त्या शिखरावरच सदैव बसून राज्य करू लागल्या तर त्याच्या शिखराखाली लागलेली दिमख (कीड) त्यांना दिसणार नाही. राजकीय विरोधकांपेक्षा त्यानी कळत नकळत दुखावलेल्या विरोधकांची त्यांना जास्त भीति आहे. ही गोष्ट उशिरा लक्षात येऊन मग पश्चात्ताप करण्यापेक्षा वेळीच जाग येईल तर ते त्यांच्या व देशाच्या दृष्टीने लाभदायक ठरेल. ● ● ●

आंतरराष्ट्रीय राजकारण

आंतराष्ट्रीय राजकारणाचे बाळकडू इंदिराजींना त्यांच्या वडिलांच्यापासून मिळाले आहे. स्वातंत्र्यकाळापूर्वीपासून काँग्रेस पक्षात कै. जवाहरलाल नेहरु हे एकटेच पुढारी असे होते की ज्यांना परराष्ट्र राजकारणात रस होता. व त्याचे महत्व समजल्यामुळे प्रत्येक बारीकसुरीक गोष्टीत ते जातीने लक्ष घालीत. काँग्रेस पक्षात कै. असफअल्ली व डॉ. बाळकृष्ण केसकर यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी काँग्रेस पक्षाचा परराष्ट्रीय विभाग सुरू केला होता. मी राष्ट्रसंघात असताना राष्ट्रसंघाच्या अनेक उपयुक्त कार्यांची माहिती कै. नेहरूंना देत असे तेव्हा प्रत्येक पत्राचे उत्तर ते आस्थापूर्वक देत असत व लहान मोठ्या प्रश्नात चौकसपणे पृच्छा करीत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ही त्यांची आवड विकास पावून आपण जागतिक नेतृत्व स्वीकारावे अशी मनीषा त्यांच्यात निर्माण झाली. त्या दृष्टीने अलिप्ततावादाचा प्रसार करून त्यांनी इजिप्तचे अध्यक्ष नासर, युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष टिटो, इंडोनेशियाचे अध्यक्ष सोकार्नो वगैरे लहान मोठ्या नेत्यांचा एक अलिप्त गट तयार केला. त्यानंतर प्रथम चीनशी व नंतर रशियाशी

हिंदी चीनी भाई-भाई व हिंदी रुसी भाई-भाई असे गट तयार केले. या सर्व घटना घडत असताना पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी जवळून पाहिल्या आहेत. प्रत्यक्ष वाटाघाटीत जरी त्या भाग घेत नव्हत्या तरी त्यांच्या वडिलांशी प्रत्येक प्रश्नावर चर्चा करून त्यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाचे प्राथमिक धडे गिरविले. याचा उपयोग त्यांना आता होणे स्वाभाविक आहे.

आपल्या वडिलांच्या समाजवादी विचारसरणीचा प्रभाव व विद्यार्थीदशेतील श्री. कृष्णमेनन यांच्या मार्गदर्शन यामुळे त्यांचा कल समाजवादी राष्ट्रांच्याकडे जरी सुरवातीला झुकला तरी १९५५ मध्ये आपल्या वडिलांच्याबरोबर त्यांनी रशियाला भेट दिली त्यावेळी सत्यस्थिती अवगत होताच त्या सावध झाल्या. आंतराष्ट्रीय राजकारणात कायमचा असा कोणी कोणाचा मित्र नाही वा कोणी कोणाचा शत्रु नाही असे त्या नेहमी म्हणतात. नेहरूंच्यापेक्षा त्यांना माणसाची पारख जास्त होती व व्यवहारवादी धोरणामुळे त्या अनेक वेळा नेहरू भावनावश होत असताना त्यांना सावरण्याचा प्रयत्न करीत १९५३ मध्ये व १९५५ मध्ये नेहरूंनी जेव्हा युरोप व रशियाचा दौरा केला तेव्हा मी या गोष्टी अगदी जवळून पाहिल्या आहेत. त्याकाळी नेहरू आंतराष्ट्रीय राजकारणात स्वतःला परिपक्व समजत तर इंदिराजी या शिकाऊ उमेदवार असल्यामुळे त्यांचा वडिलांच्यावर विशेष प्रभाव पडत नसे. उलट ते त्यांना कधीकधी चिडल्यावर mind your business म्हणून फटकारीत. चीनच्या बाबतीतहि सुरुवातीपासून सर्व मामला सरळ नाही असा त्यांना वास येत होता व तिबेटच्या प्रश्नावर त्यांचा तीव्र विरोध कृष्णमेनन यांनी त्यांना वेडयात जमा करून बाजूला काढला.

ही पार्श्वभूमी लक्षात घेता स्वतःकडे सर्व सूत्रे आल्यानंतर त्या धूर्तपणाने सर्व प्रश्न हाताळू शकतील यात मला शंका नाही. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या मुत्सद्दीपणाचे सूत्र म्हणजे मोजक्या शब्दात मुद्याच्या गोष्टी बोलणे. ते तुमचा पाहुणचार करण्यात कसलीहि कसूर करणार नाहीत. पण मुद्याला हात घातला की सर्व व्यवहार काटकसरीने व शब्दांचे वेचक

प्रयोग करून चालत. त्याच्या उलट साम्यवादी राष्ट्रे बोलण्यात ऐसपैस व अघळपघळ. पण तुम्ही त्यांचा निष्कर्ष पाहू लागाल तर दोन्ही विचार-सरणीत स्वतःचा स्वार्थ हा प्रबळ ठरतो. त्यांच्या स्वार्थाला सोईस्कर असेल तरच ते तुम्हाला मदत करणार, एरवी गोडगोड बोलून तुमची बोळवण करणार हे ठरलेले, तेव्हा हे सत्य इंदिराजींच्या मनावर प्रथमपासून ठसले असल्यामुळे त्या कोणत्याही एका गटाच्या कच्छपी लागतील याची सुतराम शक्यता नाही.

नेहरू व इंदिराजी यांच्या परराष्ट्र धोरणाचा दुसरा महत्त्वाचा फरक म्हणजे इंदिराजींचा व्यवहारवादावरील भरवसा होय. आपल्यावर संकट आल्यास या कट्टर शत्रूशीहि तडजोड करण्यास कचरणार नाहीत किंवा दुसऱ्या एखाद्या राष्ट्राला त्याबद्दल काय वाटेल याची तमा बाळगणार नाहीत. साधे हैद्राबाद संस्थान घ्यावयाचे होते तर स्वदेशातील व स्वदेशा-बाहेरील मुसलमानांना काय वाटेल किंवा आपण जर गोवा घेतले तर तर अमेरिका इंग्लंड, स्पेन व पोर्तुगाल काय म्हणेल या विवंचनेत नेहरू गुरफटले जात. पण इंदिराजींची धोरणे व्यवहारावर आधारित असल्यामुळे उद्या पाकिस्तानने जास्त त्रास दिला तर त्या चीनशीसुद्धा समझोता कर-ण्यास मागे-पुढे पहाणार नाहीत व याच वृत्तीमुळे त्यांनी विद्युतगतीने रशियाशी करार करून व पाठोपाठ युद्ध जिंकून आजच्या जागतिक राजकारणात कलाटणी दिली. यामधे दिसून येणारा त्यांचा मुत्सद्दीपणा हा जरी आपल्या देशातील त्यांच्या राजकीय विरोधकांना मान्य नसला तरी त्यामुळे चीन व अमेरिका यांची या प्रश्नाकडे पहाण्याची दृष्टी निःसंशय बदलली आहे.

सुरुवातीपासून इंदिरा गांधी डाव्या विचारसरणीच्या असल्यामुळे यापुढील अ.पले आंतरराष्ट्रीय रशियाच्या तंत्राने चालणार अशी भीती अनेकांना वाटत आहे. त्यात पुन्हा काही पक्ष अमेरिकाधार्जिणे तर काही पक्ष चीन किंवा रशियाधार्जिणे किंबहुना त्यांच्याच पैसा व प्रतिष्ठेवर पोसले जात असल्यामुळे ते इंदिराजींच्याविरुद्ध जी ओरड करतात ती आपण समजावून घ्यावयास पाहिजे, आज जगामध्ये भांडवलशाही,

लोकशाही व समाजवाद या तीन विचारसरणी प्रामुख्येकरून आढळतात. भांडवलशाही राज्ये लोकशाहीवर आधारीत असली तरी त्यांचे धोरण काही ठळक व्यक्तींचे हाती असून गुणवत्तेनुसार सधनता प्राप्त करून देण्यावर त्यांचा भर असतो. पण त्यामुळे कर्तबगार माणूस सारखे धन व सत्ता मिळवीत असतो तर येरा गबाळाचे हाल कुत्रा खात नाही. साम्यवादी राष्ट्रात देखावा जरी समानतेचा असला तरी सत्तेचे वाण निवडक लोकांच्या हातीच पडते. या राष्ट्रातून सामान्य माणसाचा समानतेचा हक्क मानला जातो व त्याच्या कल्याणासाठी काही मूलभूत सोयी पुरविल्या जातात. तुमची पात्रता सिद्ध न करता तुम्हाला खायला अन्न, नेसायला वस्त्र व रहायला निवारा पुरवला जातो. तुमचे आरोग्य, शिक्षण, व्यवसाय यांचीहि जबाबदारी प्रस्थापित सरकार स्वीकारते. या दोन विचारसरणीत जे गुणदोष आढळतात ते लक्षात घेऊन आपण लोकशाहीचा मार्ग स्वीकारला आहे. आपल्या देशातील अठरा विश्वे दारिद्र्य, अनंत जाती, धर्म, भेद, लोकसंख्येचा भयानक प्रश्न, पाकिस्तानसारखे आजन्म आपल्या द्वेषावर गुजराण करणारे शेजारी राष्ट्र इत्यादि समस्या लक्षात घेऊन समाजवादाची वाटचाल ही जास्त श्रेयस्कर वाटते व त्यामुळेच भांडवलशाही विचार करणारी मंडळी मागे पडत असून बहुजन समाजाला समाजवादाचे आकर्षण प्रभावी वाटते व इंदिराजींच्या निवडणुकीतील यशाचे हेच प्रमुख कारण आहे. त्या समाजवादी विचाराच्या आहेत व आज प्राप्त परिस्थितीत त्यांनी रशियाशी करार केला की त्या आजन्म त्यांचे बोटास धरून चालतील असे समजण्याचे कारण नाही. प्राप्त परिस्थितीत आपल्या मुखवट्याशी जुळतामिळता चेहरा कुणाचा आहे याचे हे एक उत्तर आहे. अमेरिकेने अशिया खंडात आपले प्रभुत्व रहावे म्हणून पाकिस्तान निर्मितीपासून आंतरराष्ट्रीय राजकारणात सदैव भारत विरोधी धोरण ठेवले आहे. येथील उद्योगधंद्यांना किंवा काही राजकीय पक्ष, पुढारी व वृत्तपत्रांना तसेच तांत्रिक ज्ञान देण्यासाठी भारताला भरीव मदत दिली असली तरी ज्या ज्या वेळी आमच्या जीवन-मरणाचा प्रश्न आमच्या पुढे उभा राहिला तेव्हा अमेरिकेने आमचा दावा साधला, काश्मीरचा प्रश्न घ्या, पाकिस्तान व चीनचे आमच्यावरील आक्रमण घ्या किंवा हल्लीचा

बांगला देश प्रश्न घ्या, या सर्व प्रश्नावर अमेरिका निसंदिग्धपणे आमच्या-विरूद्ध उभी राहिली आहे. याच्या उलट रशियाने आपला सतत पाठपुरावा केला आहे. व पाकिस्तान आक्रमणात उघड उघड आपली बाजू घेतली वरवर तटस्थपणा पण आतूनसहानुभूती असे केले नाही. दाखविली आहे. चीनने तर आपला उघड उघड विश्वासघात करून आपल्यावर आक्रमण केले. हे तीन निरनिराळे अनुभव जमेस घरता त्यातले त्यात रशिया बरा असे जर कोणास वाटले तर ते स्वाभाविक आहे. भारत स्वतः एक अत्यंत प्रबल राष्ट्र आहे. जगाच्या नकाशातील त्याचे स्थानही उत्कट आहे. तेव्हा एकमुखी राज्यकारभार राहिला तर अमेरिका, रशिया व चीन जोडीचे राष्ट्र म्हणून आपली गणना होण्यास कोठलाच प्रत्यवाय नाही. किंबहुना आजपर्यंत दुसऱ्याच्या जोगव्यावर गुजराण करणारे आम्ही अलिकडेच नेपाळ, सिलोन वगैरे छोट्या राष्ट्रांना मदत करू लागलो आहोत व ही युद्धाची कटकट जर याह्याखानने निर्माण केली नसती तर इंदिराजींच्या कार्यक्षम नेतृत्वाखाली आपण याहीपेक्षा अधिक प्रगती केली असती. तरीही निराश होण्याचे कारण नाही. ज्या ज्या वेळी परकीय आक्रमणाची दुष्ट चक्रे आपल्यामोवती घिरट्या घालतात तेव्हा मिळेल त्या साधनांनी व मित्रांच्या मदतीने त्याचा प्रतिकार करणे क्रमप्राप्त ठरते. उद्या जर एखादा मित्र, शत्रूसमान वाटला तर त्याचे स्नेहसंबंध तोडून टाकण्याचे दाखले इतिहासात सापडतात. जे सूत्र आपण आपल्या दैनंदिन व्यवहारात पाळतो तेच सूत्र आंतरराष्ट्रीय राजकारणात आपल्या पथ्यावर पडेल तोपर्यंत पाळले तर यात गैर कांहीच नाही. उद्या आपणाला रशियाने धोका दिला तर अशी भिती अनेकांना वाटते. अशा फाल्गुनरावांनी आपला संशयकल्लोळ न होऊ देता व्यावहारिक पातळीवर उतरले पाहिजे. जशी अन्य राष्ट्रे आपल्या स्वार्थाला प्राधान्य देतात तोच मार्ग आपण स्वीकारला तर त्याज्य का समजावा ? प्रत्येक प्रश्नाचे उत्तर त्यापासून भारताला होणाऱ्या फायद्यात समविष्ट आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात भावनेपेक्षा व्यवहाराला प्राधान्य दिले तर स्वहित साधता येते हे त्रिकालाबाधित सत्य इंदिराजींनी ओळखले

असल्यामुळे आपण आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांना पाठिंबा देणे अत्यावश्यक आहे. बांगला देश प्रश्नावर ज्या तडफेने त्यांनी आपल्या बाजारबुणग्या सहकाऱ्यांच्या मदतीने जागतिक लोकमत भारताला अनुकुल करून घेतले व अमेरिकेसारख्या कर्मठ राष्ट्रात या प्रश्नावर दोन तट निर्माण केले. या मुत्सद्देगिरीची पावती आपण आपल्या पंतप्रधानांना दिलीच पाहिजे. चीनशी आपले संबंध सुधारले तर त्यामुळे उरल्या सुरल्या पाकिस्तानच्या नाड्या आपोआप आखडल्या जाणार आहेत. अशा रीतिने आपल्यावर आलेल्या घोर आपत्तिमधून एकटचाच्या बुद्धीमत्तेच्या बळावर या महिलेने जागतिक मुत्सद्यांच्या मालिकेत पहिल्या श्रेणीचे स्थान मिळवले जागतिक राजकारणात नेहरु नुसतेचिंतक होते. त्यांचा अलिप्ततावाद व चीन मैत्रीचा त्यांचे हयातीत पराभव झाला. पण या चिंतनातील अलिप्ततावादाचा देखावा कायम ठेवून त्याला जी व्यवहाराची जोड मिळाली आहे ती आजच्या राजकीय ढगामधील एक चंदेरी रेषाच समजली पाहिजे.

• • •

औद्योगिक धोरणातील खाचखळगे

भारतातील उद्योगधंदे व उद्योगपति स्वातंत्र्य मिळाल्यापासून राज्यकर्त्यांची एक डोकेदुखी झाले आहेत. एकजात सर्व उद्योगपति चोर, स्वार्थी व देशद्रोही आहेत असा पंडित नेहरूंचा समज होता व स्वतःला तसे वाटते म्हणून किंवा कधी समोरच्या प्रेक्षकांच्या टाळ्या घेण्यासाठी तर कधी मजूर व मजूरनेत्यांना खूष करण्यासाठी पंडितजी या वर्गाविरुद्ध रणदुंदुभीथाटात गर्जना देत असत. त्याच वेळी म. गांधी व सरदार पटेल यांच्यापासून सर्व नेते या उद्योगपतींच्या थैलीवर काँग्रेस व स्वतःच्या अनुयायांची गुजराण करीत असत. पंडितजींना वाटेल ते बोलू द्या, तुम्हाला त्याचे काय? बोलण्याने काही बिघडत नाही. अशा शब्दात हेच नेते पंडितजींच्या माघारी त्यांची हेटाळणी करीत. 'अरे भाई, हुवा क्या, यह तो बोलो. पंडितजींने जो बकवास की वह तो मैंने अखबारमे पढी है. मुझे सिर्फ असलमे जो कुछ हुवा वही बताओ। असे म्हणून सरदार पटेल उद्योगपतींना संरक्षण देत. या पाठीमागे काँग्रेसला आर्थिक मदत मिळविणे हाच एकमेव हेतू नसून देशाचे उत्पादन वाढल्याशिवाय आपली गरीबी हटणार नाही ही भावना जास्त दृढमूल होती. या उक्ती व कृतीच्या संघर्षांमधून उद्योगपतींनी व्यावहारिक मार्ग काढून बरीच प्रगति केली. त्यांना नियंत्रण घालणारा कोठलाहि कायदा किंवा कर बसविताच त्यातील पळवाटा सांगणारे तज्ज्ञ त्यांच्या पाठीशी उभे रहात. धूर्त उद्योगपतींनी काँग्रेस पुढारी व मंत्री अक्षरशः पोसले. त्यांचेकडून सरकारी गुपिते त्यांना मलिदा चारून मिळविली. लहान-मोठ्या अधिकाऱ्यांना त्यांच्या गरजा भागवून खूष केले व स्वतःची प्रगती चालू ठेवली. श्री. मोरारजी देसाई, स. का. पाटील प्रभृती नेत्यांनी ही परंपरा पुढे चालविली. पण आता त्यांचा अस्त झाल्यावर पुढे काय हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

उद्योगधंदे व उत्पादन वाढले पाहिजे असे तोंडाने बोलून मजूर वर्गाला काम करा म्हणून सांगण्याऐवजी काम टाळून नुसते या ना त्या

रूपाने जास्त पैसे मागा हे सांगणारेच पुढारीच सर्वत्रच आढळतात. लोकशाहीत मजूरवर्ग बहुसंख्य असल्यामुळे राज्यकर्तेहि त्या पुढाऱ्यांचीच री ओढतात. उद्योगधंदे निर्माण करून ते चालविणे ही गोष्ट मंत्री होण्याइतकी सोपी नाही. त्यासाठी उद्योगपतींना भांडवल जमा करण्यापासून आपली निर्मिती बाजारात लोकप्रिय करण्यापर्यंत हजारो अडचणींना तोंड द्यावे लागते. शेकडो माणसांना त्यांच्या तंत्राने संभाळून घ्यावे लागते. स्वतः करोडोपति बनण्याचे स्वप्न तो पहात असला तरी त्याचबरोबर दिवाळखोर बनण्याची धास्ती तो पेलत असतो. या गोष्टीची दखल न घेता जो शासनकर्ता उठतो तो उचलली जीभ लावली टाळ्याला या न्यायाने उद्योगपती विरुद्ध तोंडाची वाफ दवडून स्वतःची पाठ दुसऱ्याकडून थोपटून घेतो. स्वतःला पुढारी समजण्याचे व बनविण्याचे हे वेड पांघरून आपल्याभोवती अडाणी मजुरांची शक्ति उभी करून स्वतःसाठी शासनयंत्रणेत एखादी मोक्याची जागा मिळवतो. हा आजच्या पुढाऱ्यांचा नित्यक्रम आहे.

उद्योगपती मोटर गाडयातून हिंडतो, चांगले कपडे घालतो, रुबाबात रहातो, याही गोष्टी बऱ्याच जणांना खटकतात. आपल्या क्षेत्रात रुबाब राखून दुसऱ्यावर इंप्रेशन मारण्यासाठी प्रसंगविशेषी कर्ज काढून तो हे लक्ष्मीधराचे सोंग आणीत असतो हे आपण विसरतो. उद्योग ही एक प्रचंड स्पर्धा आहे व या स्पर्धेत ज्याची मोटरगाडी, गेस्टहाऊस, भेटी, रुबाब, बाई व बाटली इ. गोष्टी त्याला त्याचा धंदा वाढविण्यास मदत करीत असतात. त्याचा उपभोग घेणारे मंत्री व अधिकारी ही दुतोंडी जात एका बाजूने हे सर्व फायदे उपटून दुसरीकडे त्यांना शिव्या देत असतात. ही झाली वस्तुस्थिती. यातून आपल्याला पुढील मार्ग आक्रमण करावयाचा आहे. दुर्दैवाने उद्योगपतींच्या सत्कृत्याऐवजी दुष्कृत्यांची जाहिरात जास्त होते व त्यामुळे हा वर्ग बदनाम झालेला आहे. शितावरून भाताची परीक्षा करावी असे आपण म्हणतो व तसाच काहीसा प्रकार पं. नेहरू व त्यांच्या कन्या यांच्या बाबतीत झाला आहे.

गेल्या महायुद्धानंतर जर्मनी व जपान ही राष्ट्रे उद्योगाच्या सहाय्याने अल्पावधीत उभी राहू शकली. पंजाबच्या विभाजनानंतर चार–पाच वर्षात

स्वर्गीय कैरो यांच्या व्यावहारीक वोरणाने पंजाब पुन्हा ताठ उभा राहू शकला. या गोष्टीपासून आपण काहीच बोध घेऊ शकणार नाही काय ? आजची देशाची निकडीची गरज म्हणजे उत्पादन वाढ आहे. पण त्यावर लक्ष केन्द्रीभूत करण्याऐवजी आमचे सरकार पुन्हा जुन्याच वाटेने मजूरांना भडकावीत असते. इंदिराजींचे याबाबतीतलें धोरण निश्चित चुकत आहे. काही उद्योगपती वाममार्गी असतील, जास्त नफा उकळीत असतील, आपल्या कामगार वर्गावर अन्याय करीत असतील. अशी सर्व उदाहरणे निवडून काढून त्याविरुद्ध कृती करण्याचे काम सरकारी यंत्रणेचे आहे. त्यासाठी न्याय कचेऱ्याहि आहेत त्यावर भर न देता कामगाराला बरे वाटते म्हणून नुसत्या त्याच्या मागण्या व आकांक्षावर भर देऊन ही समस्या सुटणार नाही. बरेचसे उद्योगपती अशिक्षित असूनसुद्धा कल्पकतेमुळे करोडोपती बनल्याचे व लाखो लोकांना रोजगार मिळवून दिल्याचे दाखले अद्याप ताजेतवाने आहेत. अशा उद्योगांच्या मागील तपस्या जाणून घेण्याऐवजी ते धंदे सरकारजमा करून उत्पादनात व मिळकतीत घट होत असली तरी त्याची पर्वा नाही. फक्त एखाद्या तथाकथित धनवानाचे आम्ही नाक कापले एवढेच समाधान. इंदिराजींना याबाबतीतील आपले धोरण बदलल्याशिवाय तरणोपाय नाही. आजपर्यंतच्या त्यांच्या घोषणा नुसत्या वरवर परिस्थिती पाहून केल्यासारख्या वाटतात. या रोगाचे निदान त्यांना झालेले नाही.

वास्तविक हा झगडा मालकाने अवास्तव नफा घेऊ नये. एवढ्यापुरता सीमित आहे व त्यासाठी प्रत्येक उद्योगात जास्त नफा कसा मिळविता येईल याची तजबीज करून मग त्या नफ्याची वाटणी करताना मालकावर अंकुश लावता येईल. दुभत्या गाईला योग्य चारा घालून तिची दूध देण्याची पात्रता वाढविण्याऐवजी नुसतेच दूध कोणी किती घ्यावे यावर आपण भांडत बसलो तर गाईला चारा देण्याची व्यवस्था केली नाही तर त्या गाईचे दूध तर आटणारच पण शिवाय ती बिचारी मृत्युपंथास लागणार. हा साधा हिशोब आमच्या पुढाऱ्यांना समजत नाही.

आजपर्यंत या प्रश्नावर आखलेली सर्व धोरणे सत्यस्थितीचे आकलन न करता आखली गेली आहेत. राजकारणाच्या धोडदौडीत प्रत्येकजण सवंग

लोकप्रियतेच्या मागे लागले आहेत व इंदिराजी याहि त्याला अपवाद नाहीत. उत्पादनवाढ, उत्पादकता तांत्रिक ज्ञान इ. गोष्टी नुसत्या घोषणातूनः आढळतात. पण त्यासाठी सरकारी यंत्रणा ही उद्योगपतींच्याकडे शत्रू म्हणून पहात असते व मग वड्याचे तेल वांग्यावर निघते. अनेक उद्योगपतींच्या योग्य तक्रारी घेऊन मी जेव्हा या महाभागांना भेटत असे तेव्हा आमचे पुढारी अमुक जण चोर आहे, अमक्याने आठ बायका केल्यात, त्यांच्या इतक्या मोटारी व बंगले आहेत. एवढी जमीन आहे. त्याने अमुक फंडाला पैसे दिले नाहीत इ. त्या प्रश्नाशी निगडित नसलेल्या सवबी सांगून त्यांच्या तक्रारी दुर्लक्षिल्या जात व मग चाणाक्ष उद्योगपती आपली कामे खालच्या लोकांना हवा तो मलिदा चारून करून घेतो. भ्रष्टाचार, लाच घुसखोरी, इ. गोष्टींचा उगम सरकारच्या या मृगजल पद्धतीच्या घोरणात आहे. मूळ घोरणात इंदिराजींनी आमूलाग्र फरक केल्याशिवाय आपली आर्थिक स्थिती सुधारणार नाही. घंद्याचे राष्ट्रीयीकरण, बँकांचे विम्याचे राष्ट्रीयीकरण संस्थानिकांची प्रिव्हिपर्स रद्द करणे, या मार्गाने समाजवादाची वाटचाल मंदगती रहाणार आहे. काही काळ लोकांचे डोळे दिपविण्यासाठी व स्वतःच्या कर्तृत्वशक्तिचा ठसा उमटविण्यासाठी या गोष्टी ठीक होत्या. पण हीच तडफ जर उद्योगधंद्यांच्या बाबतीत दूरगामी घोरण आखले नाही तर आर्थिक क्षेत्रात आपला भविष्यकाळ आपणास अंधकाराकडे नेल्याशिवाय रहाणार नाही. इंदिराजींनी देशातील उत्पादन वाढविण्याकडे जातीने लक्ष दिले पाहिजे. ही घोषणा फक्त वर्षातून एकदा उद्योगपतींच्या फेडरेशनपुढे करण्यापुरती मर्यादित न ठेवता खोलात शिरले पाहिजे. उत्पादनवाढ करणाऱ्या मालकास व कामगारास आर्थिक उत्तेजन दिले पाहिजे. मालाचा दर्जा वाढविणे, निर्यात वाढविणे, आयात कमी करणे, स्वयंचलित यंत्रे वाढविणे, तांत्रिक ज्ञान अवगत करणे इ. निकडींच्या गरजांना सक्रिय प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. वास्तविक इंदिराजींनी अमेरिका, रशिया, जर्मनी व इतर देशातील औद्योगिक प्रगति पाहिली आहे, त्याचे महत्वहि त्या जाणतात. पण असे असून स्वतःच्या देशातील उद्योगधंद्यांचा प्रश्न समोर आला की त्यांना फक्त मालकांची वाईट बाजू दिसते. उद्योगधंद्यांच्या पाठीमागील अश्वशक्ति दिसत नाही हा दैवदुर्विलास आहे. स्वतःला पटते ते स्पष्टपणे

बोलून दाखविण्याचे धाडस त्यांच्याजवळ आहे. त्यांना जनतेचा भरपूर पाठिंबाहि आहे. असे असताना उद्योगधंदे व चैनी उद्योगपति यांची सरमिसळ न करता उद्योगधंद्यांना त्यांनी उत्तेजन दिले पाहिजे. कामगारांना खडसावून सांगितले पाहिजे की आधी काम व मग दाम. असा एकहि कामगार नेता या देशात निपजू नये की त्याची कामगारांना तुम्ही काम करा म्हणून सांगण्याची हिंमत होत नाही. यावरून आमच्या पुढाऱ्यांची न्यायबुध्दी व नैतिक स्तर किती खालावला आहे हे दिसून येते. या परिस्थितीतून योग्य मार्गाला जाण्याची हिंमत आमच्या पंतप्रधानांचे जवळ आहे. त्यांनी जर एकाच वेळी उत्पादनातील प्रगतीला सरकारकडून मिळणारे प्रोत्साहन व खोटे हिशेब ठेवणे जास्त नफा उकळणे कामगारांवर अन्याय करणे इ. गोष्टींना मिळणारे शासन या दोन्ही गोष्टी जाहीर केल्या, तसेच कामगारांच्या वाढत्या मिळकतीचा संबंध उत्पादनाशी जोडला, कामगारांचे नेतृत्व फक्त त्यांच्यातीलच नेत्याकडे ठेवले व राजकीय पक्ष व पुढाऱ्यांची त्यातून हकालपट्टी केली तर आपल्या देशाचे औद्योगिक चित्र बदलून जाईल. या कामी त्यांना हितसंबंधियांचा जरूर विरोध होईल. पण अशा विरोधाला समर्थपणे तोंड देण्याची शक्ति इंदिराजींच्याजवळ आहे हे आपण गेल्या २।३ वर्षात पाहिले आहेच. त्यांच्यात ही शक्ति आहे. फक्त चष्मा बदलण्याची जरूरी आहे व तशी बुद्धी त्यांना होवो हीच प्रार्थना.

●●●

बांगला देश आणि इंदिराजी

काँग्रेसवाल्यांच्या उक्ती व कृतीमध्ये कधीच मेळ नसतो व त्यामुळे जनतेचा काँग्रेसवरील विश्वास उडत चालल्याची खात्री जेव्हा इंदिराजींना पटली तेव्हा त्यांनी हा गोंधळ दूर करण्याचा निश्चय केला व दहा कलमी कार्यक्रम कार्यान्वित करण्याच्या त्यांच्या अट्टाहासामुळे काँग्रेसमध्ये दुफळी माजली. इंडिकेट व सिंडिकेट असे दोन तट पडले. सिंडिकेटच्या बाजूने काँग्रेसच्या जुन्या परंपरेत लहानाचे मोठे झालेले सर्व योद्धे सुसज्ज झाले. व इंडिकेटच्या बाजूला समाजवादी नेते इंदिराजींच्या पाठीशी उभे राहिले. या रणधुमाळीत प्रथम इंडिकेटच्या यशाबद्दल जनता जरी साशंक होती तरी निवडणुकींनी इंदिराजींच्या बाजूने प्रचंड बहुमताने कौल दिला याचा अर्थ इतकाच होता की, काँग्रेसवाले प्लॅटफॉर्मवर बोलतात ते करण्याची धमक फक्त इंदिराजींच्या नेतृत्वात आहे. गरीबी हटाव हे स्वप्न साकार करण्याची ताकद असलेला हा नेता बँक व विमा राष्ट्रीयीकरण, प्रिव्हीपर्स रद्द करणे इ. क्रांतीकारक पाऊले टाकून जनतेच्या विश्वासास पात्र झाला. पण दैवम् अन्यत्र चिंतयेत, किंवा इंग्रजीतील प्रसिद्ध वाक्प्रचार There is many a slip betwiecn thc cup and the lip या म्हणीप्रमाणे आपली गरीबी हटण्याऐवजी एक कोटी निर्वासितांचा लोंढा आपल्या दाराशी येऊन ठेपला व भारतरूपी सुदाम्याला आपल्या जवळचे पोहे स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन त्याला देणे क्रमप्राप्त ठरले.

तसे पाहिले तर बंगला देशसारखी गुंतागुंतीची समस्या हाताळण्यास इंदिराजींच्याजवळ पुरेसा अनुभव नव्हता. जवळ योग्य सल्ला देणारे कोणी कोणी मुत्सद्दीहि नव्हते. अशा परिस्थीतीत या धीरगंभीर बाईने ज्या चतुराईने व धोरणाने मध्यवर्ती निवडणुकीत आपल्या विरोधकांना चारी मुंड्या चीत केले त्याच तडफेने त्यांनी याह्याखानला तर खडे चारलेच पण

त्याचबरोबर चीन व अमेरिकेसारख्या मुत्सद्देगिरीचा अर्क समजल्या जाणाऱ्या राष्ट्रांचा दम काढला. त्यांच्या धोरणाची भारतात सुरुवातीला सर्वत्र टिंगल होत होती व त्यांचे चहाते साशंक होते. जनसंघवाले या सुवर्णसंधीचा फायदा घेऊन पाकिस्तानला धूळ चारण्यास अधीर झाले होते व ते पंतप्रधानांच्यावर जास्तीत–जास्त दबाव आणीत होते. बंगला देशला ताबडतोब मान्यता द्यावी हा तर सर्वांचा एकमुखी आग्रह होता पण इंदिराजी कोठल्याहि भिडेला बळी न पडता विरोधकांना वाकडयात शिरू न देता आपल्या धोरणावर खंबीर राहिल्या.

याह्याखानने पूर्व पाकिस्तानवर जे अमानुष अत्याचार केले व लोकशाहीला सरळ पायदळी तुडविले त्यांची जास्तीत–जास्त जाहिरात जगभर करण्याचे इंदिराजींनी ठरविले व आपल्याजवळ असलेले सर्व घोडदळ, पायदळ जगाच्या चारी दिशांना चौखूर उधळले. यावेळी त्यांच्या धोरणाला स्वकीयांचा तीव्र विरोध व हेटाळणी बाहेर चीन व अमेरिकेचा आपल्या विरुद्ध रोखठोक पवित्रा, युनोसारख्या तटस्थ संस्था व राष्ट्रांचा हा तंटा भारतविरूद्ध पाकिस्तान अशा रीतीने जगाच्या चव्हाटयावर मांडण्याचा दावा पाकिस्तानने काही केले तरी तुम्ही स्वसंरक्षणासाठी सुद्धा सुसज्ज राहू नका असा काही सूज्ञांचा सल्ला इ. अनेक पेचप्रसंगातून इंदिराजींना आपली वाट काढावी लागली. अशा बिकट प्रसंगी मनुष्य गतइतिहासाची पाने चाळतो तोहि काही फारसा लाभदायी नव्हता. म. गांधींच्यापासून पं. नेहरुंच्यापर्यंत ४५ वर्षाची (१९२० ते ६५) परंपरा त्यांना हेच सांगत होती की मुसलमान कोठेहि असले तरी आपले धाकटे भाऊ आहेत. त्यांनी एका गालावर थोबाडीत मारली तर आपण दुसरा गाल पुढे करावा केव्हांतरी त्याचा हात दुखेल तेव्हा ते बाळ आपला खेळ थांबवेल, या परंपरेला शास्त्रीजींनी पहिला धक्का दिला असला तरी तो युद्धजन्य पवित्रा होता. इंदिराजींना पाकिस्तानशी शस्त्रास्त्रांचे युद्ध न करता त्याचे बळावर पण मुत्सद्देगिरीने शत्रूला जेरीला आणावयाचे होते. पहिल्या फेरीत त्यांनी जागतिक लोकमत आपल्या बाजूने जागृत करण्याचा प्रयत्न केला तरी त्याला यावे तसे यश आले नाही. उलट अमेरिका व चीनने पाकिस्तानला

शस्त्रास्त्रे देऊन आपल्याविरुद्ध चाल करण्यास मुसज्ज केले. आज किंवा उद्या भारतावर हल्ला होणार अशी चिन्हे दिसताच इंदिराजींनी विद्युत गतीने रशियाशी मैत्रीचा करार करून जगाला थक्क करून सोडले. या कराराचे अनेक अन्वयार्थ काढण्यात राजनीतीज्ञ अद्यापहि आपले डोके खाजवीत असले तरी त्यामुळे आपल्या उंबरठ्यावर आलेले युद्ध थोडे लांबणीवर पडले, चीन व अमेरिकेसारख्या बलाढ्य योद्धांना दम लागला व त्यांचा पवित्रा बदलण्यास हा करार कारणीभूत झाला हे दिव्य करणारी महिला किती श्रेष्ठ दर्जाची मुत्सद्दी असेल हे सांगण्यात शब्दसंपत्ती अपुरी पडते. अशा रीतीने दुसऱ्या राऊंडमध्ये अभूतपूर्व पराक्रम करून ही झाशीची राणी युरोप अमेरिकेच्या दौऱ्यावर निघाली. आजपर्यंत आमचे सर्व युरोप अमेरिकेचे दौरे भीक मागण्यासाठी होत असत पण या बाईने सुरवातीलाच सर्वांना खडसावले की 'मला तुमची भीक नको. मी तुमच्याकडे शस्त्रास्त्रे किंवा पैसा मागायला आले नाही. फक्त सत्यस्थिती सांगण्यास पुराव्यानिशी आले आहे. या त्यांच्या पवित्र्यामुळे प्रत्येकाला त्यांचे म्हणणे ऐकणे भाग पडले. त्यांनी भेटी दिलेल्या ६ राष्ट्रांपैकी इंग्लंड व अमेरिका ही दोन राष्ट्रे वरून कितीहि गोड असली तरी हृदये तू हलाहलाम् याची त्यांना जाण होती. आपला प्रतिपक्ष हा सामर्थ्यशाली असतो तेव्हा त्याच्याविरुद्ध बागताना बचावाचा पवित्रा न घेता या धूर्त महिलेने त्यांच्यावर चढाईचा पवित्रा स्वीकारला. तुम्ही हा प्रश्न पूर्व व पश्चिम पाकिस्तानचा आहे असे म्हणता, मग तुम्हाला त्याचा पुळका का ? असे विचारताच इंग्लंडमध्ये त्यांनी हिटलरने स्वदेशातील ज्यूंचा छळ केला किंवा बेल्जम व फ्रान्सवर स्वारी केली तेव्हा तुम्ही का टाहो फोडलात म्हणून घरचाच आहेर करून त्यांची दातखीळ बसविली. अमेरिकेला व्यूबाचा दाखला देऊन त्यांचेहि तोंड बंद केले या मात्रेमुळे दोन्ही खटांना या समस्येची राजकीय सोडवणूक त्वरित निघालीच पाहिजे व भारताने सीमेवरील आपले सैन्य मागे घेऊ नये या आपल्या मूलभूत भूमिकेशी इंग्लड व अमेरिकेला एकरूप व्हावे लागले. त्याचबरोबर रशियाशी झालेल्या आपल्या सामर्थ्यशक्ती करारासंबंधी इंग्लंड व अमेरिकेला कितीहि दुस्वास वाटत असला तरीहि त्यांनी

त्याविरुद्ध काढू दिला नाही. उलट अमेरिकेने पाकिस्तानला देऊ केलेली ३६ लक्ष डॉलर्सची मदत परत घेतल्याचा आहेर इंदिराजींच्या ओटचात टाकला. फ्रान्समध्ये आणखी एक मुत्सद्देगिरीचे पाऊल टाकून इंदिराजींनी शर्थ केली. कारण इंग्लंड व अमेरिका यांना आपले म्हणणे पटवून दिल्यानंतर चीन हा एकमेव दोस्त पाकिस्तानच्या पाठीशी उभा होता. पूर्वीच्या वादात न पडता तावडतोब चीनशी विनाशर्त दोस्ती करण्याची तत्परता दाखवून त्यासाठी चीनप्रेमी फ्रान्सला सांकडे घातले. चीनची व आपली आढी तोडण्यासाठी प्रथम कोणी तोंड उघडावे या मानाच्या पानासाठी अडून न बसता व्यवहारी दृष्टी ठेवून भारताने कम्युनिस्ट चीनला जे आवाहन केले आहे त्याचा प्रतिसाद आज नाही तरी यथावकाश खचित आशादायक लाभेल. त्यासाठी वेळ मोठी खुबीची आहे. चीनने युनोमध्ये गृहप्रवेश केला असून त्याला तेथे स्वतःची तालीम तयार करावयाची आहे. याकामी भारतासारखे प्रभावी राष्ट्र त्यांच्या पाठीशी उभे राहिले तर ते त्याला हवे आहे. या सर्व नीतीचा परिणाम ८ महिन्याच्या मंथनानंतर दिसून आला. साऱ्या जगाला याह्याखानची दुष्कृत्ये पटली. सवाई हिटलर म्हणून त्याचे नाव जगाच्या इतिहासात ठळक अक्षराने लिहिले गेले. त्याला एकाकी पाडण्याचा डाव अशारीतीने सफल करण्यात जे जे पवित्रे घेतले गेले त्या पाठीमागची जोन ऑफ आर्क म्हणजे आपल्या पंतप्रधान इंदिरा गांधी होत.

या प्रश्नाची चर्चा करताना आणखी एक तुलना अप्रस्तुत होणार नाही. आपल्या परराष्ट्रधोरणाचा पाया पं. नेहरूंनी घातला. त्यामध्ये अलिप्ततावाद, सभ्यता, शालिनता व निधर्मीय विचारसरणी प्रस्तुत केली. या विचाराची मोहिनी त्यांनी अनेक धुरंधरांच्यावर प्रभावीपणे टाकली. आजच्या परिस्थितीत जर पंडितजी हयात असते तर त्यांनी काय केले असते हा एक शंभर डॉलर किंमतीचा कुटिल प्रश्न सोडवण्यासारखा आहे. त्याचे उत्तर पंडितजींनी याह्याखानच्या पाठीशी उभे रहाण्यापासून काहीही दिले जाते. रोज त्यांनी जगाला उद्देशून तत्त्वज्ञानाचे ढोस पाजले असते व परस्परविरोधी पवित्रे घेतले असते असा अनेकांचा कयास आहे. आपल्यावर संकट आले असता

आपण काय करावें यापेक्षा इतरांनी काय करावें याच्यावर त्यांनी भर दिला असता. प्रत्येकवेळी आपल्या पवित्र्यामुळे याला काय वाटेल, त्याला काय वाटेल असा घोळ घालण्यास त्यांनी कमी केले नसते. अशी तुलना आत्याबाईंना मिशा असत्या तर इतकी पोरकट नाही. पंडितजींचा इतिहास अद्याप ताजा आहे. त्यांच्या आखाड्यात इंदिराजी तयार झाल्या आहेत. कितीही झाले तरी त्यांच्या त्या एकमेव कन्या व खाजगी दौलतीप्रमाणे राजकीय विचारांच्या वारस असूनही बाका प्रसंग येताच त्यांच्या कन्येने आपल्या वडिलांचा भोंगळ बुरखा फेकून देऊन व्यवहारवादी धोरण स्विकारले व ते तडफेने एकट्याच्या हिमतीवर अमलात आणले. त्यामुळे भारताचे अनेक फायदे झाले आहेत. एक तर सर्वच मुसलमानांना कळून चुकले की यापुढे इंदिराजींच्या राज्यात अल्पसंख्यांक म्हणून त्यांना संरक्षण असले तरी फाजिल लाड चालू दिले जाणार नाहीत. भारताचे हित व समर्थता लक्षात घेऊन यापुढील त्यांचे धोरण आखले जाईल याचीही ही ग्वाही आहे. शरीरमाद्यम् खलु धर्म साधनम् । या न्यायाने भारत ज्या मार्गाने धष्टपुष्ट राहिल तोच आमचा धर्म आहे. मित्राशी मित्र व शेराला सव्वाशेर ही आमची नीती यापुढेही राहील. सध्याची समस्या सुटल्यानंतर इंदिराजींच्या या बाण्यामुळे पाकिस्तानची आपल्याभोवतीची कर्मकटकट कायमची थांबणार आहे. यापुढील पाकिस्तानी राजकर्त्यांना वड्याचे तेल वांग्यावर काढून त्यांच्या प्रत्येक रोगाला भारताला जबाबदार धरून त्यांचा राज्यशकट चालविता येणार नाही. परदेशांना आलात तर तुमच्यासह नाही आलात तर तुमच्याशिवाय हे सावरकरी सूत्र यापुढे चांगलेच ज्ञात होईल. यानंतर खंबीर इंदिराजी अणु अस्त्रापासून जमतील ती सर्व आयुधे सुसज्ज करून भारताची उज्वल प्रतिमा जगाच्या वेशीवर प्रज्वलीत केल्याशिवाय रहाणार नाहीत. या अभूतपूर्व कामगिरीमुळे त्यांनी आपले नाव अल्पावधीत लो. टिळक म. गांधी व पं. नेहरु या राष्ट्रपुरुषांच्या मालिकेत गोवले आहे.

• • •

इंदिरा गांधी : उद्या

कालच्या इंदिरा गांधींच्याबद्दल पहिल्या आठ प्रकरणात मला व्यक्तिशः ज्ञात असलेली माहिती दिली. त्यानंतरच्या आठ प्रकरणात आजच्या समस्यांची चिकित्सा केली, यापुढील प्रकरणात उद्याच्या काळात इंदिरा गांधींची घोरणे कशी रहातील याची मी चर्चा करणार आहे. वास्तविक इंदिरा गांधींनी काय करावे हे सांगण्याची माझी पात्रता नाही. मिसरूड फुटू लागले की मते फुटतात असे आपण विनोदाने म्हणतो. लोकशाही मध्ये राज्यकर्त्यांना विधायक या संज्ञेखाली सूचना करण्याचा प्रत्येकाला अधिकार असतो व आपण पुणेकर मंडळींनी तर हा अधिकार पिढ्यानुपिढ्या गाजविला आहे. पुण्यात मी अलिकडे स्थायिक झालो असलो तरी मूळचा मी पुणेकरच. ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेऊन मी ही प्रकरणे लिहिण्याचे साहस करीत आहे. या कामी माझा राष्ट्रसंघासारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेतील १२ वर्षांचा अनुभव तसेच नेहरूंच्या प्रदीर्घ सहवासात अंगी बिंबलेला बहुश्रुतपणा मला उपयोगी पडणार आहे. मोठ्या लोकांचे दोष त्यांच्या तोंडावर बोलण्याची कोणाचीच हिंमत होत नाही. लहान तोंडी मोठा घास घेऊ नये असे आपण नेहमीच म्हणतो, पण याचा अर्थ ते दोष आपल्याला दिसत असतात फक्त ते बोलण्याचे धैर्य नसते. किंवा त्यावेळी आपला तो कार्यभागही नसतो. पण १५ वर्षांच्या अवधीनंतर या गोष्टीची चिकित्सा करताना मनुष्य थोडासा मुक्त असतो.

पुढील प्रकरणातून मी आंतरराष्ट्रीय राजकारण, भारतातील राजकीय परिस्थिती, आर्थिक व औद्योगिक धोरणे, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक प्रश्नांचा उल्लेख करणार आहे. या प्रत्येक क्षेत्रात आपणाला क्रांती घडवून आणावयाची आहे व त्यासाठी सामान्य नागरिकांची उंची वाढविणे जितके महत्वाचे आहे तितकेच यापुढे आपणाला लाभणारे नेतृत्व महत्वाचे ठरणार आहे. प्रवाहपतित होणे सोपे असते पण प्रवाहाला विरोध करण्यात नेत्याचे अंगी त्याग, निग्रह, धाडस व धैर्य लागते. सुदैवाने इंदिराजींच्या अंगी हे सर्व गुण विपुलतेने आढळतात. व त्यामुळे त्यांच्या हाती आपले भवितव्य सुरक्षित आहे असे मी नेहमी म्हणतो.

आंतरराष्ट्रीय राजकारण

आंतरराष्ट्रीय व्यवहारात कोणी कोणाचा कायमचा मित्र अथवा शत्रू नसतो. स्वार्थ व बडेजाव यांनाच सदैव प्राधान्य दिले जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणात मधु तिष्ठति जिव्हाग्रे, हृदये तू हलाहलम् हा दाखला राष्ट्र-संघात असताना मला पदोपदी आढळत असे. तेव्हा त्या स्तरावर होणारी भाषणे किंवा बोलणी हा एक मुत्सद्देगिरीचा अलंकार समजावा. या क्षेत्रात निष्ठा किंवा सचोटीला काडीमात्र स्थान नाही हे आपणास गेल्या २५ वर्षांतील आंतरराष्ट्रीय व्यवहार पाहिल्यानंतर सहज लक्षात येईल. हेच सूत्र लक्षात घेऊन पं. नेहरूंनी आंतरराष्ट्रीय धोरण म्हणून अलिप्ततावादाचा जयघोष चालविला होता व त्याचबरोबर स्वतःचा तत्त्वनिष्ठ पक्ष निर्माण करण्याचा नासर, टिटो, सोकार्नो, चौ एन लाय इ. च्या मदतीने प्रयत्न केला. पण कसोटीची वेळ येताच नेहरूंच्या या सर्व सच्च्या दोस्तांनी पाठीमागच्या दाराने पलायन केले. राजकारणातील सर्व सोयरिक सोयीसाठी असते. सोय संपली की जो तो हात झाडून मोकळा. आजचा दोस्त उद्याचा हाडवैरी बनतो. ही सर्व मूलभूत तत्वे आपल्या राज्यकर्त्यांना आता अवगत झाली आहेत याबद्दल मला शंका नाही व म्हणूनच जेव्हा इंदिराजींचे विरोधक त्या रशियाचे बोट धरून यापुढे चालणार असे म्हणतात ते मला पटत नाही. अमेरिका, रशिया व चीन या तीन बलाढ्य राष्ट्रात व जगातील प्रमुख विचारधारात रशिया व त्याची सघ्याची राजनीती आपल्याला जवळची आहे. चीनशी तो आपला शेजारी म्हणून जास्त जवळीक करण्याचा नेहरूंनी खूप प्रयत्न केला. पण तो विश्वासघातकी निघाल्यामुळे स्वाभाविकच रशियाकडे आपला ओढा वाढला. वास्तविक हिंदुस्थान या तिन्ही राष्ट्रांच्या तोडीचे राष्ट्र आहे व आपले एकमुखी नेतृत्व टिकले तर तो मान आपल्याला लवकरच मिळाल्याशिवाय रहाणार नाही. स्व. नेहरूंनी कितीहि चुका केल्या असल्या तरी आपल्या राष्ट्राचे मूलभूत संरक्षणसामर्थ्य वाढविण्यासाठी खंबीर पाया घातला. आपले जगाच्या नकाशातील भौगोलिक स्थान, आपली लोकसंख्या, पुरातन सांस्कृतिक वारसा, बुद्धीमत्ता इ. गुणांमुळे भारताला जगाच्या दरबारांत चौथा क्रमांक आहेच. तो फक्त इतरांनी

मानण्याचा भाग शिल्लक आहे. तो अन्य राष्ट्रे तोंडाने जरी कबूल करीत नसली तरी आपली शक्ति खच्ची करण्यासाठी ज्या अट्टाहासाने ही बडी राष्ट्रे यत्न करीत असतात त्यातच ही कबुली सुप्त आहे. आपली संरक्षण–फळी जितकी मजबूत तितका आपला आवाज बुलंद ठरेल. त्या दृष्टीने ॲटम शक्ति वाढविणे व न्यूकलियर एर्नाजिचा उपयोग संरक्षणाकडे करण्यास मागेपुढे न पाहणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात आपल्या मनात नसले किंवा तेवढी ताकद नसली तरी काहीवेळा आक्रमक पवित्रा घ्यावा लागतो व एखाद्या मुलाप्रमाणे आरडाओरड करून आपल्याकडे सर्वांचे लक्ष वेधून घ्यावे लागते. सुदैवाने नेहरूंच्या मृत्युनंतर आपल्या धोरणातील भोळा आशावाद कमी झाला असून इंदिराजींनी अलिकडे जी व्यवहारवादाची कास धरली आहे हे एक शुभचिन्ह आहे. एकेकाळी त्यांचा अमेरिकेवर इतका राग होता की यापूर्वीच्या अमेरिका भेटीत तेथील उच्च पदस्थांना भेटण्याचे त्यांनी कटाक्षाने टाळले होते. भारतामध्ये आपल्या हातात सर्व शक्ति एकवटली असल्यामुळे असल्या एकांगी वर्तनाचा फारसा दुष्परिणाम होणार नाही. परंतु जागतिक राजकारणात अमेरिकेसारख्या अग्रेसर देशाशी इतकी टरेंबाजी करणे शिष्टसंमत नाही. I mean Business हे इंदिराजींचे आवडते वाक्य आहे. त्याचा हा अविष्कार राजकारणाचे एक अंग म्हणून समजण्यासारखे असले तरी त्याचा अतिरेक वाईटच. जोवर आपणाला आपली उन्नती साधण्यासाठी सर्व बडया राष्ट्रांची मदत आवश्यक आहे तसेच पाकिस्तानसारखं खुनशी व कर्मदरिद्री शेजारी मध्यरात्रीसुद्धा आपल्या नरडीला नख लावून स्वतःची गुजराण करू इच्छित आहे तोवर आपणाला मुत्सद्देगिरीचे हास्य व टेबल टेनिसनीती अवलंबिली पाहिजे. या दृष्टीने इंदिराजीनी मागील सर्व अपमान विसरून चीनशी सद्यस्थितीपुरता स्नेह जोडण्याचा जो पवित्रा फ्रान्सतर्फे घेतला हे त्यांचे मुत्सद्देगिरीचे कृत्य आहे. विशेषतः बंगला देश समस्या हाताळताना त्यांनी जी खंबिरी दाखविली व एकटचाच्या हिमतीवर अनेक समरप्रसंग कल्पकता व कौशल्याने लढविले त्यावरून त्यांचे हाती आपली जागतिक प्रतिष्ठा सुरक्षित आहे. इतर बडया राष्ट्रांप्रमाणे आपणही ॲटम बाँब, हैड्रोजन बाँब इ. बनवित आहोत किंवा बनविला आहे असे जाहीर करून समुद्रातून त्यांच्या काही

चाचण्या घेतल्या तर पाकिस्तानसारखी नेहमीच उसने अवसान आणणारी व बकवासीने जगणारी राष्ट्रे थंड होतील. शेराला सव्वाशेर अशी आमची नीती प्रकट होताच आज जे सर्व शेर भारताविरुद्ध डरकाळ्या फोडीत आहेत ते पावशेर होतील.

रशिया प्रेम

१९५५ मधील नेहरुंच्या रशिया भेटीच्या वेळी मी सन्निध होतो. बुलगानीन् व ख्रुश्चेव यांच्या भारतप्रेमाच्या देखाव्यासंबंधी त्यावेळी भारतीय तंबूत जी चर्चा चाले त्यात इंदिराजींहि सहभागी होत. रशियाचा स्नेह मोलाचा तर खरा पण ते ज्या गोष्टी दाव्याने सांगत असत त्या मुळात तशा नव्हत्या याची जाणीव कै. नेहरु व इंदिराजींना होती. लेनिन व स्टॅलिन यांच्या मृतदेहाच्या दर्शनासाठी रोज लाखो लोकांचा लागलेला क्यू परदेशी पाहुण्यांना दाखवून हे सर्व रशियन नागरिक स्वयंस्फूर्तीने करत आहेत असे दाखविणे किंवा युद्धामध्ये नष्ट झालेली घरे, पूल, रस्ते हे सर्व तसे काही नाही, आमचे पुनर्रचना काम चालू आहे असे जेव्हा रशियन नेते सांगत असत तेव्हा 'आम्हाला हे लोक इतके वावळट कसे समजतात' म्हणून नेहरुंना अचंबा वाटे ! ख्रुश्चेव थोडे बोलके होते म्हणून नेहरु त्यांना बरेच वेळा खडसावीत. अशी वस्तुस्थिती असतानाही हिंदी-रुसी भाई भाई हा देखावा शाबूत होताच. तात्पर्य, रशियाशी दोस्ती करताना रशिया छाप समाजवाद आणण्याची भाषा राज्यकर्त्यांनी जरी तोंडाने बोलून दाखविली तरी घोरणे आखताना शिरसलामत तो पगडीपचास या न्यायाने भारताचा स्वार्थ व संरक्षण यांना प्राधान्य मिळालेच पाहिजे. आमचे स्वातंत्र्य अबाधित रहाणार नसेल तर आम्हाला त्या समाजवादाची जरूरी नाही. कारण रशिया किंवा चीन यांच्या समाजवादाच्या मागे लपलेला (नाही असे ते म्हणतात, पण साऱ्या जगाला दिसणारा) हुकुमशहा भारताला नको आहे. प्रथम आमचे स्वातंत्र्य मग लोकशाही व त्यानंतर समाजवादाचा क्रम तिसरा येतो ही क्रमावली लक्षात घेतल्यानंतर आपले जर हितरक्षण होत असेल तर अमेरिकेचीच काय पण उद्या पाकिस्तानशी सुद्धा दोस्ती करण्यास हरकत नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणात धर्म, नीतीमत्ता, संस्कृति इ.

तत्त्वांना मर्यादित अर्थ असतो. या सर्व सुवर्णतत्त्वांच्या मोवती स्वार्थ व स्वसंरक्षणाचे कवच असते व ते जोवर शाबूत आहे तोवर आपणाला कुणाचीहि भिती नाही. बरेच वेळा काही धूर्त राष्ट्रे तुमचा सांस्कृतिक वारसा प्राचीन व दांडगा आहे, तुमचा धर्म सामर्थ्यशाली आहे वगैरे आपणाला गुदगुल्या करणाऱ्या शब्दांची फेक करून टोपी घालू पहातात. स्वतःचे म्हणणे गळी उतरविण्यासाठी बाई–बाटलीपासून ते सत्तेच्या अत्युच्च पदापर्यंत आश्वासने फेकली जातात. या सर्व मोहजालांत आपले राज्यकर्ते अद्याप सापडले नाहीत हे आपले सुदैव आहे. जो काही फसवा सांस्कृतिक व नैतिक वारसा होता तोहि इंदिराजींच्या व्यवहारवादात लुप्त झाला आहे. तेव्हा आपले आंतरराष्ट्रीय घोरण व प्रतिष्ठा पंतप्रधानांचे हाती सुरक्षित आहे व या कामी त्यांना साऱ्या राष्ट्राने पाठिंबा दिला पाहिजे.

● ● ●

आपले राजकीय नेते कोठवर जाणार?

आपल्या देशातील राजकारणाला लो. टिळक व म. गांधी यांनी जे थोर नैतिक अधिष्ठान दिले होते व त्यावर स्वातंत्र्यप्राप्तीच्या झगड्याच्या वेळी जी त्यागाची झालर चढविण्यात आली होती ती आता समूळ नष्ट झाली असून आपले राजकीय नेते आता आपणास कोठे नेणार आहेत ते खरोखरीच समजत नाही. कोणाहि सभ्य माणसाला राजकीय नेत्यांचा दुरूनसुद्धा वास नको असतो. स्वार्थ साधण्यासाठी व सत्तेच्या राक्षसी पिपासूपणामुळे पुढाऱ्यात चाललेली साठमारी म्हणजे एक दुर्गंधीजन्य रोग या देशाला जडला आहे व त्यातून आपली कधी मुक्तता होईल अशी चिन्हे तर सध्या तरी दिसत नाहीत.

नेहरूंच्या जमान्यात इंदिराजींना या ढोंगाचा अत्यंत तिटकारा असे. लोभी व सत्तापिपासू नेते नुसते समोर दिसले तरी त्या नाक मुरडीत असत. कित्येकांना तर त्यांनी तोंडावर ठणकावलेले मी पाहिले व ऐकले आहे. कधी कधी इंदिराजींच्या या वागण्यामुळे नेहरू त्यांच्यांवर कावत व 'तुझे यापुढे कसे होणार आहे ? काय हा फटकळपणा ? जिभेला हाड नाही असे म्हणतात ते तुझ्याबाबतीत तरी मला पटते' असे म्हणून त्यांची निर्भत्सना करीत. अशा तेजस्विनी इंदिराजी पंतप्रधान झाल्या. नंतर त्यांच्याकडून राजकारणातील सत्ताप्रेम, ढोंग, थोतांड इ. कर्करोग त्यांनी समूळ नष्ट करावेत अशी अपेक्षा माझ्यासारख्याने बाळगली तर त्यात चूक काय ? आपण नेहमीच आपली पाच बोटे सारखी नसतात असे म्हणून सामुदायिक जीवनातील बरीवाईट माणसे आपल्या जीवतात समजूतदारपणाने समाविष्ट करून घेतो. पण राजकारणातला हा मामला आता इतक्या पराकोटीला पोचला आहे की आज एकमेकांचे पाय ओढण्याची जी स्पर्धा आमच्या राजकारणात सर्वत्र चालू आहे तिला हुकूमशाहीचे वळण लागून ज्या मार्गाने कम्युनिस्ट देशातील बुल्गानीन, ख्रुश्चेव्ह आदि नेते त्यांच्या जीवनातून उठविण्यात आले तेच मार्ग यापुढे आपल्या देशात चोखाळले जाण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री कोण असावेत यासाठी जो चव्हाटा सध्या खुल्या मैदानात दिसतो त्यावरून भावी काळात असे, प्रश्न गल्लीबोळातून किंवा भर रस्त्यावर सोडविले गेले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही ! वास्तविक महाराष्ट्राचा कारभार एकमुखी व एकजिनसी समजला जातो. 'साहेब बोले व दल हले' हेच आमचे आजपर्यंतचे एकमेव राजकारण होते. पण आता साहेबांच्या या सामर्थ्यशाली नेतृत्वाला कोठे फोरमच्या रूपाने तर कोठे आघाडी उघडून सुरुंग लावण्यात येत आहेत. प्रत्येकजण आपल्या कल्याणस्वामीच्या शोधात असून पाहुण्याकडून साप मारण्याचा प्रयत्न करीत आहे. अशावेळी आमचा भविष्यकाळ अंधःकारमय वाटणे स्वाभाविक आहे.

सत्ता आणि पैसा यांचा मद नेहमीच चढत्या भाजणीवर असतो. त्याला अंत ठाऊक नाही. मोठमोठ्या धनिकांना आपण दरिद्री आहोत अशा

भावनेने तो अधिक पैसा वाटेल त्या मार्गाने मिळविण्याच्या धुंदीत असतो. तर साधा पंचायत समितीवरील कोणाच्या तरी मेहेरबानीने निवडून आलेला मेंबर आपण केव्हा ना केव्हा तरी भारताचे पंतप्रधान होणार या हेतूने आपली सार्वजनिक पावले टाकीत असतो. हा झाला मनुष्याचा सर्वसाधारण स्वभाव. त्याला वेसण घालण्याचे काम उच्च पदस्थ नेत्यांचे आहे व तेही स्वत:चे स्थान बळकट करण्यासाठी नसून गुणी माणसांना योग्य तो वाव देण्यासाठी आहे.

लोकशाहीमध्ये सर्वांना प्रतिनिधित्व सर्व स्तरावर मिळावे म्हणून गुणवत्ता मागे पडून जात, गोत, धर्म इ. विचारांना प्राधान्य मिळू लागले. नेहरु स्वत:ला गुणांचे पूजक समजत. पण तेही वरील चक्रव्यूहातून सुटले नाहीत. आपले मंत्रीमंडळ बनविताना प्रथम प्रांतांची नावे लिहिली जात, माणसांची नव्हे. मग त्या त्या प्रांतातील सोईस्कर नेता निवडला जाई. हे काम झाल्यावर दुसऱ्या फेरीत सर्व धर्म समाविष्ट झाले की नाही याची दक्षता घेतली जाई. तिसऱ्या फेरीत मजूर, संस्थाने, शेतकरी, मागासलेले वगैरे वर्गांचा विचार होई व या तीन फेरीत नंतर त्यांचे मंत्रीमंडळ तयार होत असे. यात कोठेही गुणांना वाव नसे. या कार्यपद्धतीमुळे माणसांची बुद्धीमत्ता मागे पडून जो तो आपल्या आवांतर भांडवलावर पुढे घुसू लागला. याचा परिणाम प्रत्येकाला आपल्या अनुसुचित वैशिष्ट्यांचे महत्त्व जोपासण्यासाठी वेगडी नेतृत्व फळी उभारावी लागली. समजदार, बुद्धीजीवी वर्ग या संघर्षापासून दूर राहू लागला तर त्यांच्यातील काही लोभी मंडळी खुषमस्करेपणा करून स्वत:च्या पदरी मिळेल ती दौलत जमा करू लागले. अशी ही सद्य:स्थिती आहे.

इंदिराजींचे स्वत:चे स्थान जोवर दोलायमान होते तोवर त्यांनी हा प्रश्न हाती घेतला नाही हे आम्ही समजू शकतो. अशाही संभ्रमावस्थेत त्यांनी ज्या तडफेने सिंडिकेटवादी सर्व लोभी नेत्यांना धूळ चारली. त्याच तडफेने त्यांनी देशातील घूसखोर व भ्रष्टाचार दूर केला पाहिजे. याची सुरूवात त्यांनी स्वत:च्या पक्षातर्फे केल्याशिवाय त्यांचा प्रभाव पडणार नाही. अजूनही काही काही प्रांतातून गटबाजीला खुद्द पंतप्रधान उत्तेजन देतात अशी शंका व्यक्त होताच सच्चे देशभक्त बेचैन होतात. कारण देशातील हा कर्करोग

दूर करण्याचे सामर्थ्य सद्यःस्थितीत फक्त इंदिराजींच्याजवळ आहे त्या व्यवहारवादी आहेत. आपल्या वडिलांच्याप्रमाणे उच्च तत्त्वांच्या कोळीष्टकात स्वतःला वेढून न घेता स्पेडला स्पेड म्हणण्याची धमकी त्यांच्यात आहे. या रोगाचे निर्दालन करण्यासाठी त्यांना प्रदीर्घ पराक्रमाची जरूरी नाही. जाणून-बुजून इन्कमटॅक्स चुकविणारा एखादा मंत्री किंवा पाण्याखालची जमीन स्वतःच्या बायकापोरांच्या नावे खरेदी करणारा उपमंत्री व भेटींच्या रूपाने बंगले, मोटारी, किंवा गलेलठ्ठ पगाराच्या खासगी नोकऱ्या हस्तगत करणारे बुभुक्षित अधिकारी यांच्यापैकी एकेकाला जरी त्यांनी कडक शासन केले तरी इतर लोक जागे होऊन भ्रष्टाचार बराच कमी होईल. नेहरुंच्या जमान्यात त्यांच्या बडबडीला हा वर्ग महत्त्व देत नसे, त्यांच्या तोंडावर समाजवादाचे गोडवे गाणारे महाभाग त्यांचे तोंड फिरताच स्वतःची तुंबडी भरीत असत. त्यावेळचा तो रिवाजच होता. पण आता जर हे चालू दिले तर आपला देश या गर्तेतून कधीच वर येणार नाही. इंदिराजींच्या हाती सध्या एवढी प्रचंड शक्ति आहे की त्या करीन ती पूर्व म्हणू शकतात. या सामर्थ्याचा उपयोग त्यांनी स्वतःचे घर शुचिर्भूत करण्यासाठी केला पाहिजे. त्यांना आता सर्वोच्च मान मिळाला आहे. यापुढे कमवावयाचे असे काहीच शिल्लक नाही. तेव्हा त्या इतर कूट प्रश्नांबाबत राजकारणातील भ्रष्टाचार निर्मूलनाकडे लक्ष देण्यास समर्थ आहेत. एकदा जर इंदिराजींना भ्रष्ट नेते चालू शकतात किंवा आपले राजकीय इप्सित साध्य करण्यासाठी त्या जर या भ्रष्टाचारी शिडीच्या सहाय्याने पुढील मार्ग आक्रमू लागल्या तर आपल्या देशाचे देव भले करो ! सत्तेवर येण्यापूर्वी बोले तैसा जाले हा जो आदर्श त्या ईर्षेने पुढे मांडत त्यास सत्तेच्या मोहजालात फसल्यावर त्या विसरू लागल्या, असेच म्हणावे लागेल.

बुद्धीवंतांनी राजकारण वर्ज्य केले त्यामुळे साहजिकच दुय्यम दर्जाची माणसे पुढे येऊ लागली असा एक युक्तिवाद केला जातो. परंतु लोकशाहीच्या जमान्यात गटबाजीशिवाय किंवा स्वतःच्या मतांना मुरड घातल्याशिवाय निवडणूका जिंकणे शक्य नसल्यामुळे बुद्धीजीवी वर्ग उदासिन झाला आहे. बरेच लोक औद्योगिक क्षेत्रात लक्ष घालून आपल्या कर्तबगारीस वाट

मोकळी करून देत आहेत. वास्तविक लोकशाही पत्करल्यानंतरहि बुद्धीवंतांना शोधून काढून त्यांचा जास्तीत जास्त उपयोग देशाच्या कल्याणाकडे केला पाहिजे. भाभा, मथाई, आंबेडकर, देशमुख इ. बुद्धीवंतांना नेहरुंनी जवळ करून त्यांचे ज्ञान व अनुभवाचा फायदा घेण्याचा पायंडा पाडला होता. पण या सर्वांचा काँग्रेसवाल्यांनी दुस्वास करून त्यांच्या गुणांचे मातेरे केले व सच्चा काँग्रेसवाला च्चपदी असावा अशी हाकाटी सुरू केली. नेहरुंनी जमा केलेली ही मंडळी आपापल्या क्षेत्रात निरपवाद श्रेष्ठतम होती. पण इंदिराजींच्या तंबूमध्ये एकवेळ द्वारकाप्रसाद मिश्र यांच्यासारखे धूर्त कोल्हे पाहिल्यानंतर त्यांची माणसांच्या पारखेची कीव करावीशी वाटते. भ्रष्टाचारांचे अर्क असलेली अनेक तथाकथित नेतेमंडळी त्यांचा गोंडा घोळत असून स्वतःचा स्वार्थ साधत असलेले त्यांच्या लक्षात येत नाही हे कोणाला खरे वाटणार नाही. मग अशा माणसांना जवळ करणाऱ्या नेत्याकडून आपल्या राजकारणाचे शुद्धीकरणाची अपेक्षा किती करावी हाहि एक प्रश्नच आहे. त्या आज ज्या स्थानी आहेत त्याठिकाणी साध्याइतकीच साधने महत्वाची आहेत. त्यांची भूमिका व लोकप्रियता इतकी शिखरावर पोचली आहे की त्यांना या शुद्धीकरण मोहिमेस हात घालण्यास काहीच प्रत्यवाय नसावा. आपले नेते जी घोरणे आखतील त्यानुसार आपली प्रगति होणार, तेव्हा योग्य नेतृत्त्व हा आपल्या जीवनाचा पाया आहे व तो पाया जर भरभक्कम नसेल तर त्यावर उमारली जाणारी इमारत कितपत भरीव असणार या सर्व गोष्टी सर्वसामान्य माणसाला समजतात पण इंदिराजींना समजत नाहीत हे म्हणणे योग्य नाही. समजलेली गोष्ट उमजावी लागते ती उमजण्याचे बाळकडू त्यांना मिळालेले आहे. तेव्हा माझ्या मते ही वेळ अशी आहे की त्यांनी आपल्या प्रत्येक अनुयायाला अहंकाराने त्याच्या आकारानुसार त्याला कापण्याऐवजी त्याच्या पापाची लकतरे चव्हाट्यावर टांगून जर त्याला फांशी दिले तर त्यांच्या या मनोधैर्याचे विरोधी पक्षसुद्धा स्वागत करतील. इंदिराजी, तुम्हाला ही गोष्ट करावीच लागणार आहे. न केलीत तर तो तुमच्या चंद्रमावरील डाग ठरेल व केलीत तर इतिहास तुमची कारकीर्द सुवर्णाक्षरानेंच नव्हे तर हिरामाणक्याने लिहून ठेवील.

● ● ●

काळाचे आव्हान

स्वातंत्र्य मिळाल्यापासून गेल्या २५ वर्षांत अनेक अडचणींना तोंड देऊन आपण विविध क्षेत्रात प्रशंसनीय प्रगती केली आहे. या प्रगतीचा पाया स्व. नेहरू यांनी घातला. आपल्या देशाला शास्त्रीय ज्ञान व आधुनिक संशोधनाच्या आधारे आपली संरक्षण सिद्धता व औद्योगिक विकास यांना भरभक्कम आधार लाभला आहे. हे साधताना ज्या अनंत अडचणी आल्या त्या जर कमी होऊ शकल्या तर प्रगतीचा वेग वाढू शकेल. ब्रिटिशांच्या १५० वर्षांच्या गुलामगिरीत आपल्या देशातील निरक्षिरता, भाबडेपणा, भोळचा श्रद्धा, जातीयता इ. दुर्गुणांनी आपल्या देशात जे घर केले आहे ते अद्याप कमी होत नाही. त्याच्या जोडीस अठरा विश्वे दारिद्र्य हा तर शापच आहे. अशा दुर्घट परिस्थितीतून इंदिराजींना मार्ग काढावयाचा आहे. त्या पंतप्रधान झाल्यापासून स्वत:चे बहुमत टिकविण्यासाठी केलेल्या कसरतीपलिकडे विकासाचे दृष्टीने त्यांच्या गाठीला अद्याप काहीहि पुण्याई लाभलेली नाही.

या अडचणींपैकी काही अडचणी कृत्रिम आहेत. आमचा धर्म व संस्कृती पुरातन असल्याचा आम्ही अभिमान बाळगतो. मघल्या काळात या धर्माचे नीतिसूत्र लोप पावून बाह्य देखाव्याला जे महत्त्व सनातन धर्म-मार्तंडांनी दिले त्याचीच नक्कल राजकीय क्षेत्रात सध्या चालू आहे. विधायक कामापेक्षा गांधीजींच्या जमान्यात दाढी व लुंगीचा भाव वधारला होता तर नंतरच्या काळात टिनोपॉलछाप गांधी टोपी व कुडता यांना भाव आला. चांगल्या कपडचानी आपण दुसऱ्याचे लक्ष आकर्षित करू शकलो तरी अंगीकृत कार्य करण्याची कार्यक्षमता या कपडचात नसते. यातूनच पुढे व्यक्तीमहात्म्य व नेतेपदांची चुरस लागली. या स्पर्धेतून काँग्रेस विरोधी पक्षहि सुटले नाहीत. आपल्या देशात स्वातंत्र्यपूर्वकाळात

काँग्रेस, हिंदुमहासभा, मुस्लीमलीग, व काही स्वतंत्र लिबरल गट असे चारच प्रमुख वर्ग होते. पण पुढाऱ्यांची रेस सुरू होताच या चाराचे चाळीस पक्ष झाले. कम्युनिस्टांनी आपला स्वतंत्र तंबू उभारताच त्यांच्यातहि दुफळी-त्रिफळी होऊन मार्किस्ट माओवादी व अन्य पोटजाती निर्माण झाल्या. एकेकाळी ज्या समाजवादी नेत्यावर जनतेचा विश्वास होता त्यांच्यातहि अनेक पक्ष निर्माण झाले. वास्तविक श्री. नानासाहेब गोरे व एस. एम. जोशी हे लहानपणापासून एकमेकाच्या खांद्याला खांदा लावून काम करणारे नेते. दोघांचाहि प्रामाणिकपणा, देशभक्ति व कळकळ निर्विवाद आहे. असे असूनहि या स्पर्धेतून ते स्वतःचा बचाव करू शकले नाहीत. ज्याला जमेल तो आपल्या नेतेपदावर शिक्कामोर्तब करण्यासाठी स्वतःचा पक्ष काढतो. आपले वेगळे पद शाबीत करण्यासाठी कोठल्यातरी तकलादू तत्त्वाचा आधार घेऊन स्वतःचे वेगळेपण सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. असा हा सर्व तमाशा आहे. वास्तविक जनसंघ, हिंदुमहासभा व आर. एस. एस. यांच्या विचारप्रणालीत फारसा फरक नाही. पण त्यांचेहि डेरे वेगवेगळे असल्याचे आपण पहातो. याचा परिणाम राज्यकर्त्यांची शक्ती खच्ची करण्याकडे होणे अपरिहार्य आहे. राजकीय जीवनात विरोधी पक्ष अवश्य पाहिजे. पण आपल्याकडे या पक्षांची जी माऊगर्दी उडाली आहे यावरून या सर्व पुढाऱ्यांना आपल्या तत्वप्रणालीपेक्षा स्वतःचे महत्व कसे वाढेल व आपले नाव व फोटो वृत्तपत्रातून रोज किंवा निदान वारंवार कसा झळकेल याचीच चिंता लागलेली दिसते. काँग्रेसमधून सिंडीकेटवाल्यांना बाहेर काढल्यानंतर सर्व इंडिकेटवादी डाव्या विचाराचे आहेत असा जनतेचा समज होता. पण त्यातही फोरमवादी नेते पुढे येऊन त्यांनी आपले नगारे बडविण्यास सुरवात केली आहे. सर्व काँग्रेसवाले एक झाले व वादग्रस्त प्रश्नावर आपापसात चर्चा करून मतपरिवर्तन किंवा बहुमताने निर्णय घेऊ शकले तर ते लोकशाहीला शोभेल असेच होणार आहे. इकडे विरोधी पक्षातहि जनसंघ, समाजवादी व कम्युनिस्ट हे तीनच विरोधी पक्ष राहून आजचे राजकीय नेते विचाराने आपणास जवळ असलेल्या पक्षात विलीन झाले तर त्यांना प्रिय असलेले त्यांचे कार्य जास्त वेगाने करता येईल.

हा वेगळचा चुलीचा खटाटोप थांबविण्याचे कामी इंदिराजी स्वतःच्या पक्षापासून सुरुवात करू शकतात. वास्तविक फोरमवाल्यांना किंवा जंतर-मंतरमधील काँग्रेस कचेरीचा तावा घेणाऱ्यांना इंदिराजी कानपिचक्या देऊ शकतात. त्यांनी नुसता इशारा केला तरी या मर्कटलिला थांबू शकतात परंतु दुर्दैवाने त्यांच्या अनुयायांच्या या हुल्लडबाजीस त्यांचे अप्रत्यक्ष उत्तेजन आहे. हा देखावा स्वागतार्ह नाही. याबाबतीत इंदिराजींनी आपले मन विशाल करून सिंडिकेटवाल्यांना सुद्धा चुचकारून आत घेतले पाहिजे. चीन व अमेरिका यांची दोस्ती होऊ शकते. चीनने जबरदस्तीने बळकावलेला आपला मुलुख आपण सोडून देऊन त्यांच्याशी दोस्ती करू शकतो तर आपल्याच हाडामासाचे एकेकाळचे मान्यवर जेष्ठ व श्रेष्ठ नेते यांच्याशी पिंगपाँग जरी खेळता आला नाही तरी इंदिराजींच्या साध्या स्मिताने अर्धे सिंडिकेटवाले त्यांच्या तंबूत आनंदाने प्रवेश करतील. आमच्या यशवंतरावांच्यापासून इंदिराजींनी ही मुत्सद्देगिरी शिकली पाहिजे. वास्तविक सिंडिकेटमधील डाव्या विचारांचे व समंजस नेते इंदिराजींच्या पक्षात येण्याची उघड उघड सूचना करीत असतानाही त्यांची दखल न घेणे ही राजकीय चूक आहे. इंदिराजींच्या दृष्टीने हे नेते कमी महत्त्वाचे वाटत असले तरी थेंबे थेंबे तळे साचे या न्यायाने अशा नेत्यांच्या बरोबर त्यांचे कच्छपि असलेले अनुयायी काँग्रेसमध्ये येऊन हळू हळू सिंडिकेट नामशेष होईल व मोरारजींसारखा एखादा नेता बाहेर राहिला तरी त्यांचा हट्टीपणा त्यामुळे जास्तच खुलून दिसेल. सद्यःस्थितीत एक मोरारजी सोडले तर सर्व सिंडिकेटवाले इंदिराजींनी नुसते स्मित केले तरी त्यांच्याकडे धाव घेतील. असे असताना त्यांनी आपल्या मनाचा मोठेपणा का दाखवू नये ? सिंडिकेटपैकी मोरारजी व कामराज सोडल्यास त्यांच्या नेतृत्वास आव्हान देईल असा एकही नेता त्यांच्याजवळ नाही. याही दोन्ही सिंहांची आयाळ जरी अद्याप आकर्षक असली तरी त्यांचे अनुयायांचे दात गेल्या निवडणुकीत संपूर्णतः पडले आहेत. ही मंडळी आत आली की स्वतंत्र पक्ष, संस्थानिकांचे चहाते व काही प्रमाणात जनसंघाची शक्ति कमी होईल.

सिंडिकेट विसर्जित केल्यानंतर इंदिराजींनी समाजवाद्यांची मोट बांधली पाहिजे. विरोधी पक्षाची शक्ति खच्ची करण्याचा यशवंतरावांचा

दा. क्र. 1842

अनुभव दांडगा आहे. महाराष्ट्रात त्यांनी ते काम मोठ्या कौशल्याने केले आहे. इंदिराजी स्वतः समाजवादी असल्यामुळे त्यांना यशवंतरावांच्या मदतीने हे काम सहज करता येईल. वास्तविक तो पक्ष फक्त नेत्यांचाच आहे. अनुयायी असे त्यांना नाहीतच. त्यातून राजनारायणसारखे माथेफिरू खडयासारखे वगळून इतर समंजस नेत्यांना जवळ करणे अशक्यप्राय नाही. कम्युनिस्टांच्या नादी मात्र त्यांनी लागू नये. कारण ते कोणी रशियाचे जावई तर कोणी चीनचे जावई आहेत. ही मंडळी फक्त नावाला भारतीय नागरिक आहेत. राहता राहिला जनसंघ. जनसंघाची विचारसरणी बऱ्याच समंजस लोकांना मान्य नसली तरी त्यांची देशभक्ती वादातीत आहे. त्यांची संघटना दिवसेंदिवस प्रबळ होत आहे. त्यांची विशिष्ट तत्त्वप्रणाली आहे व त्यासाठी लागणारी शिस्त, संघभावना व एकजूट टिकविण्यात आजपर्यंत त्यांनी यश मिळविले आहे. जोवर इंदिराजी योग्य मार्गाने जात आहेत तोवर त्यांना या पक्षाची भीति वाटण्याचे कारण नाही. पाकिस्तान प्रश्नावर त्यांचे धोरण इंदिराजींपेक्षा जास्त कडवे असले किंवा हिंदुत्वाचा त्यांना जास्त अभिमान असला तरी त्यामुळे इंदिराजींच्या समाजवादी कार्यक्रमास अडथळा येणार नाही. विरोधी पक्ष म्हणून जनसंघ हिंदुधर्म, भांडवलशाही, पुंजीपती वगैरे वर्गाचे हितरक्षण करू शकतो. तात्पर्य आपल्या देशात काँग्रेस व जनसंघ अशा दोनच पक्षास स्थान आहे. त्यामुळे सर्व डावे एका तंबूत व उजवे दुसऱ्या तंबूत एकत्र येऊन राज्यशकट चालवू शकतात. हे साधण्याची शक्ती जरी एकटया इंदिराजींच्या जवळ नसली तरी काळाची गरज ओळखून त्यांनी स्वतःचे घर सावरण्यापासून सुरुवात केली तर हे शुभकाम लवकर पार पडू शकेल. त्यासाठी त्यांनी ताठरपणा सोडून काही कर्तबगार माणसे विश्वासात घेतली पाहिजेत. आपली संशयी वृत्ती सोडली पाहिजे. आज त्यांची लोकप्रियता व सामर्थ्य एवढे दांडगे आहे की त्यांच्या नामोच्चाराने त्यांचे नेते अनेकांना आपल्या पक्षात आणू शकतील. माणसाचा एक प्रकारचा हा न्यूनगंड असतो ! पडलो तरी नाक वर या थाटात हल्ली बरेच विरोधक इंदिराजींच्याकडे मोठ्या आशेने मन व डोळे लावून पाहात आहेत. त्यांचा अंत न पाहता ज्या ज्या कारणांनी ते भेटतील

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ७८५० वि: निबंध
खाते २५४ बो: वि. ३९.३

तेव्हा नुसते How do you do एवढ्या इशाऱ्यावर विरोधी तंबू ढासळतील व एकदा काँग्रेसचे एकत्रीकरण होत आहे हे पहाताच विरोधी पक्षातहि ही हवा पसरण्यास वेळ लागणार नाही. असे झाल्याने इंदिराजींची जी शक्ति आज विरोधी पक्षांच्या डावपेचाशी लढण्यात वाया जात आहे ती वाचेल व त्यांची घोरणे जास्त कार्यक्षमतेने हाताळता येतील. हे काळाचे आव्हान आहे व ते स्वीकारण्यासाठी लागणारा लवचिकपणा त्यांनी दाखवलाच पाहिजे. दुर्दैवाने लहानपणापासून 'हम करे सो कायदा' या वातावरणात त्या वाढल्या आहेत. स्वतःला आवडत किंवा पटत नाही अशी कुठलीहि गोष्ट त्या करण्यास तयार नसतात. या बाबतीत त्यांच्या वडिलांनीहि त्यांच्यापुढे हात टेकले ! वडिलांच्या कारकीर्दीत हा तामसीपणा शोभून दिसला. पण आता त्या भारताच्या विधात्या आहेत. कुटुंबप्रमुख आहेत. तेव्हा सर्वांना ते चुकत असले तरी आंजारून-गोंजारून जवळ केले पाहिजे. जिद्दीने पुढे धावण्यापेक्षा सर्वांना बरोबर घेऊन चालण्यात नेत्याचे कौशल्य कसास लागते. त्यांचे विरोधक त्यांच्या मानाने कमकुवत असले तरी विरोधात राहून त्यांची शक्ति त्यांना खच्ची करण्याकडे जी वाया जात आहे तिला त्या हे काळाचे आव्हान स्वीकारून इंदिराजी विधायक स्वरूप देऊ शकतील.

●●●

आर्थिक व औद्योगिक आघाडी

आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात समाधानकारक प्रगति होत नाही हे स्पष्ट आहे, याबाबतीत माझ्या अल्पमतीनुसार सुरुवातीपासून सरकारी धोरण व्यवहारी भूमिकेवर आधारले नसल्यामुळे आपली आर्थिक व औद्योगिक उन्नति होत नाही. पंडित नेहरू यांचा समाजवादाकडील ओढा लक्षात घेऊन अनेक धूर्त लोकांनी भारतीय उद्योगपतींच्याविरुद्ध खऱ्या-खोट्या गोष्टी सांगून त्यांचे मन कलुषित केले. दिल्लीतील फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीज या संस्थेचे दरवर्षी मार्च महिन्यात वार्षिक अधिवेशन होत असते. व त्यावेळी पंतप्रधान म्हणून पं. नेहरूंना आमंत्रण आले की, त्यांना जो जोश चढे तो पाहण्यासारखा असे. जणू काय ते परराष्ट्रावर स्वारी करण्यास निघाले आहेत. अशा थाटात या अधिवेशनास जात. या त्यांच्या पूर्वदूषित ग्रहामुळे बुऱ्याबरोबर भलेही भरडले जात. बरं, त्यातून व्यक्तीचा प्रश्न गौण असला तरी सर्वच खाजगी उद्योगधंद्यांविरुद्ध पंतप्रधानांसारख्या कर्तुमअकर्तुम अन्यथा कर्तुम सामर्थ्य असलेल्या माणसाने दंड थोपटल्यावर खाजगी क्षेत्राचे मरण नाही ओढवले तरच नवल. त्यातून सरदार पटेल हयात होते तोपर्यंत त्यांनी उद्योगपतींना सबूरीचा सल्ला देऊन शांत केले. त्यानंतर पंडितजी सरळ सरळ ऐकत नाहीत म्हणून वाममार्गाने उद्योगपतींनी आपला कार्यभाग साधण्यास सुरुवात केली. पण या संघर्षामुळे देशाचे अत्यंत नुकसान झाले. आज आपल्या देशापुढील सर्वात मोठी समस्या म्हणजे आपले दारिद्र्य होय व ते दूर करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शेती व उद्योगधंदे समृद्ध करणे. त्यासाठी जेणे करून उत्पादन व उत्पादकता वाढीस लागेल अशा सर्व धोरणास सरकारने मदत केली पाहिजे. त्याऐवजी त्यांनी एखाद्या धंदेवाईक कामगार नेत्याप्रमाणे सदैव मजूरवर्गाला उत्पादनाबद्दल एकहि शब्द न बोलता नुसते मालकांकडून येनकेनप्रकारेण जास्तीत जास्त पैसा

कसा काढला येईल यासाठी संघटित केले. लोकशाहीमधे लोकसंख्येला व लोकांच्या मताला प्राधान्य असल्यामुळे पं. नेहरूंच्या नेतृत्वाखाली सर्व नेत्यांनी बहुसंख्य कामगारवर्गाची तळी उचलून धरली. कामगारांचे दारिद्र्य व पिळवणूक दूर झाली पाहिजे याबद्दल कोणाचाच मतभेद असणे शक्य नाही. किंबहुना ते आपले प्रथम कर्तव्य आहे. परंतु ज्या उद्योगधंद्यातून कामगारांना आपण पैसा मिळवून देणार आहोत त्या उद्योगधंद्यांची उत्पादनशक्ति कशी वाढेल हे पाहाणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. एकदा उत्पादन वाढल्यानंतर मग वाढत्या उत्पादनाची वाटणी करणे अवघड नाही मरहूम लियाकत अली यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात रुपयावर चौदा आण्यापर्यंत वाढत्या श्रेणीने कर बसवून मालकांना जेरीस आणले होते.

दुर्दैवाने इंदिराजींनी याबाबतीत पंडितजींचीच री ओढली आहे किंबहुना बापसे बेटी सवाई अशा थाटात त्या उद्योगपतींच्याकडे पाहत असतात. वास्तविक उद्योगधंद्यात स्वावलंबी होणे हा काही जादूचा प्रयोग नाही. तो समृद्ध करण्यास मालकाला कल्पकता, बुद्धीमत्ता, मानवी व्यवहार इ. अनेक गुण लागतात. त्याच्या जोडीस त्यांना शत्रू समजणारे व सवंग लोकप्रियतेच्या मागे लागणारे मंत्री व सदैव कायद्यावर बोट ठेवून चालणारे सरकारी अधिकारी यांच्याशी नेहमी दोन हात करावे लागतात. वास्तविक घटना व नियम हे संघटनेला पोषक असावे लागतात त्याऐवजी ते विघातक ठरत आहेत. सरकारी धोरण मुळात प्रतिगामी असल्यामुळे मग उद्योगपतीहि बऱ्याच वेळा वाममार्गाने आपली कामे साधण्यावर आपले लक्ष केंद्रिभूत करतात. अशी ही दुर्गुणांची कोंडी (Vicious Circle) फोडण्याचे काम पंतप्रधानांनी शांत चित्ताने करावयास पाहिजे. त्याऐवजी ऊठसूठ जमेल त्या धंद्याचे राष्ट्रीयीकरण करून जी हुजूर टाईप लोकांच्या हाती हे धंदे दिले जाऊन राष्ट्राच्या तुटीत मात्र भर पडत असते. शाळेचे तोंड न पाहणारे परंतु उद्योगधंद्यात स्वतःची बुद्धिमत्ता व कल्पकतेच्या जोरावर करोडपति झालेल्या अनेक व्यक्तींची मला माहिती आहे. यासाठी त्यांनी अनेक वाममार्ग चोखाळले असण्याची शक्यता आहे. तरीपण त्याच्या पाठीमागे असलेली कल्पकता अगदीच क्षुद्र लेखणे योग्य नाही. राजकारणात जर गुंड व खुनी

लोकांना तुम्ही जवळ करता तर अशा कल्पक उद्योगपतींनाही सन्मार्ग दाखवून त्यांच्या बुद्धीमत्तेचा उपयोग स्वदेशाच्या उन्नतीसाठी का केला जाऊ नये ? सर्वच उद्योगपति स्वार्थी किंवा दुष्ट नसतात. औद्योगिक उन्नतीचे एक तंत्र आहे व ते तंत्र त्यांना अवगत असल्यामुळे त्यांचा उपयोग देशहिताकडे करून घेणे इष्ट आहे. नुसते गरिबी हटाओ या घोषणेने गरीबी हटणार नाही. त्यासाठी शासनकर्त्यांनी व्यावहारिक धोरण अवलंबिले पाहिजे. शासनकर्त्यांनी आपली दृष्टी एकांगी ठेवता कामा नये. भांडवलशाही, हुकूमशाही, कम्युनिझम हे जर आपल्या राजकीय जीवनातील शाप समजले जातात तर समतोल साधण्यासाठी समाजातील सर्व स्तरांचा विचार होणे आवश्यक आहे. सरकारी उद्योगधंदे अपयशी कां ठरतात, आपल्या देशातील शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ भारतात नोकरी करण्याऐवजी परदेशात का राहू इच्छितात, शेतकरीवर्गात जो एक भांडवलवादी वर्ग निर्माण होऊन सहकाराचे नावाखाली राजकीय धोरण का नियंत्रित करीत असतो, वाढत्या महर्गतेला आळा का बसत नाही, इत्यादि प्रश्नांची उत्तरे इंदिराजींना केव्हा ना केव्हा तरी शोधावी लागणारच. अद्याप त्यांना या प्रश्नांची सर्वांगीण उकल झालेली दिसत नाही. कारण आपल्या वडिलांच्या प्रमाणे त्याही फक्त हत्तीचे पाय बघून त्यालाच संपूर्ण हत्ती समजत आहेत. मागील महायुद्धानंतर अल्पावधीत जर्मनी व जपान स्वयंपूर्ण होऊ शकतात, त्यांचा आवडता रशिया पंधरा वर्षांत अमेरिकेची बरोबरी करू शकतो, एवढेच काय पण भारतामध्ये स्व. प्रतापसिंग कैरो यांनी पंजाबचे मुख्यमंत्री असताना एका वर्षात पंजाबचे पुनर्वसन करून दाखविले, इत्यादि उदाहरणांपासून इंदिराजींनी बोध घेणे आवश्यक आहे, कैरो यांनी केलेले औद्योगिक पुनरुज्जीवन मी जवळून पाहिले आहे. सत्पात्र मागसाला ते निव्वळ त्याच्या गुणाकडे पाहून त्याला हवी तेवढी जागा, मशिनरी, शेड बांधून देणे व इतर सहाय्य मुक्त हस्ताने करीत. काही वर्षानंतर त्याची प्रगति पाहून मग त्याला होणाऱ्या फायद्याच्या प्रमाणात सरकारी कर किंवा कर्जवसुली केली जाई. सरकारी यंत्रणेतील लाल फितीचा त्यांना तिटकारा असे, हे व्यावहारिक धोरण स्वीकारल्यामुळेच पंजाब हा आज संपन्नावस्थेत आहे. त्याचवेळी बंगालचीही फाळणी

झाली, पण व्यावहारिक धोरणाचे अभावी तो प्रांत अजूनहि विपन्नावस्थेत आहे व त्यामुळे नक्षलवादी चळवळी तेथे फोफावत आहेत.

गरीबी हटविण्यासाठी गरीब व श्रीमंत यामधील फरक कमी करणे इष्ट आहे. पण त्यासाठी भारतातील धनिक वर्ग, संस्थानिक, सुखवस्तु उद्योगपति यांना ओरबाडून गरीबांना लंगोटी सुद्धा देता येणार नाही. संपन्नता निर्माण करावी लागते. अ च्या खिशात असलेले पैसे जबरदस्तीने घेऊन ते इतरांना वाटले तर त्याला समाजवाद म्हणता येणार नाही किंवा त्यामुळे गरिबीहि हटणार नाही. एकीकडे औद्योगिकक्षेत्रात पंतप्रधान करडचा नजरेने उद्योगपतींच्यावर डोळे वटारीत असताना त्यांच्या पाठीशी शेती व सहकार यांच्या नावाखाली जो एक सधन वर्ग निर्माण होऊ पाहत आहे तो इंदिराजींच्या समाजवादाच्या नरडीला नख लावल्याशिवाय सोडणार नाही. त्यांचे बरेचसे राजकीय धोरण हा सधनवर्ग नियंत्रित करीत असून त्यांच्यापुढे गरीब शेतकरी व कामगारांच्या कल्याणाच्या घोषणाहि फिक्या पडतात. या धोरणामुळे प्रत्येक वर्ग संघटित होऊन सामाजिक न्याय धाब्यावर बसवून आरडा ओरडा करून आपल्या पदरी जे पडेल ते पाडून घेत आहे. अशा पद्धतीने आपला आर्थिक व औद्योगिक ऱ्हास टळणार नाही. राजकीय जीवनात ठगाला ठग म्हणणाऱ्या स्पष्ट वक्त्या इंदिराजी कामगारांना तू आधी काम कर, उत्पादन वाढव असे ठासून सांगत नाहीत किंवा शेती व सहकाराच्या आधारे गरीब शेतकऱ्यांचे शोषण करणारांचे कान पकडू शकत नाहीत ही आमची शोकांतिका आहे. ही कोंडी केव्हा ना केव्हा तरी फोडलीच पाहिजे कारण गरीबी हटविणे ही आजची निकडीची गरज आहे. व त्यासाठी जगन्मान्य नियमानुसारच आपण गेले पाहिजे. इंदिराजींनी ज्या अट्टाहासाने राजकारणातील भ्रष्टाचार दूर केला पाहिजे असे मी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले आहे. तेवढ्याच अट्टाहासाने त्यांनी याही क्षेत्रात वास्तववाद हाताळून देशाचे कल्याण केले पाहिजे. असे न झाले तर आमच्या स्वराज्याला काहीच अर्थ उरणार नाही. आज त्यांच्या भोवती जे बोलघेवडे तथाकथित समाजवादी, फोरमवादी, यंगटर्क्स इ. नामाभिधाने घेऊन जे लोक वाघाचे कातडे पांघरून समाजात डरकाळ्या फोडीत असतात त्यांचे अंत-

स्वरूप समजून घेतले पाहिजे. सरकारी नियम आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात उत्पादकतेला पोषक असले पाहिजेत. सच्चा कर्तबगार माणसाच्या वाटेत कसल्याहि अडचणी येता कामा नयेत. जो कुणी देशाच्या सधनतेत आपल्या श्रम व कल्पकतेमुळे भर घालेल त्याचे कौतुक झाले पाहिजे. कार्यकर्त्याच्या मागे किती मते आहेत हे न पाहता त्याची श्रद्धा, सचोटी व कार्यक्षमता पाहिली पाहिजे. तसेच या क्षेत्रात राजकारण शिरता कामा नये, वाढत्या किंमतींना इंदिराजींच्या आजच्या मंत्रिमंडळात बुद्धिमत्तेत ज्यांचा निर्विवादपणे दुसरा क्रमांक लागतो ते श्री. चव्हाण आळा घालू शकले नाहीत. या दोषाचे खापर व्यापारी व उद्योगपति यांच्या माथ्यावर न फोडता बुटाला खरोखरीच कोठे चिमटा बसत आहे ते पाहण्याचे काम सर्वप्रथम इंदिराजींचे आहे. परमेश्वराने त्यांना तशी बुद्धि द्यावी या पलिकडे माझ्यासारखा सामान्य माणूस काय म्हणणार ?

• • •

सांस्कृतिक कार्याचे महत्व

आपल्या जीवनात आपण राजकारणाला फार महत्त्व दिले आहे. त्याच्या खालोखाल आर्थिक प्रश्न मोडतात. परंतु ज्यामुळे आपले जीवन घडते, त्याला आकार येतो त्या सांस्कृतिक जीवनाची आबाळ होता कामा नये. सुदैवाने पं. नेहरूंनी या कामासाठी संगीत नाटक अॅकॅडमी, साहित्य अॅकॅडमी व ललित कला अॅकॅडमी काढून सांस्कृतिक जीवनाचा पाया घातला. लोकसमूह नृत्याच्या–सारख्या पारंपारिक नृत्यांना गणतंत्र–दिनाचे महोत्सवात आर्जवाने निमंत्रून त्यांना राष्ट्रीय मान दिला. तरीहि या क्षेत्रात त्यांच्या सवंगड्यांनी त्यांना योग्य ती साथ न दिल्यामुळे राष्ट्रीय थिएटर-सारख्या अनेक कल्पना अजून हवेतच विरत आहेत. पिंगपाँगसारख्या मामूली

खेळाच्या साहाय्याने अहिनकुल समजले जाणारे चीन व अमेरिका जवळ येऊ शकतात. माऊवाद्यांच्या साध्या स्मितामे बदलते राजकीय घोरण सूचित केले जाते. असे अनेक अलिकडील दाखले या क्षेत्राचे महत्त्व प्रतिपादन करतात. इंदिराजींनाहि सांस्कृतिक कार्याची फार आवड आहे. त्यांच्याबरोबर याच क्षेत्रात मी अनेक वर्षे काम केल्याचा उल्लेख यापूर्वीच्या प्रकरणामधून आला आहे.

सांस्कृतिक कार्यामधे नुसते नृत्य नाटच, गायन, साहित्य, चित्रकला, खेळ इ. गोष्टींचा समावेश होत नसून शैक्षणिक कार्य, स्नेहपूर्ण भेटी, सामाजिक, धार्मिक व नैतिक स्तरावर देशादेशामधून देवाणघेवाण इत्यादि स्वरूपाचे व्यापक क्षेत्र या सदरात मोडते. इंदिराजींचा या क्षेत्रातील अनुभव राजकारणापेक्षाहि अधिक व्यापक व बोलका आहे. राजकारणाच्या फापटपसाऱ्यात त्या गुंतल्यामुळे त्यांना या कामाकडे लक्ष देण्यास अलिकडे वेळ मिळत नाही. वास्तविक भारत या क्षेत्रामध्ये जगात अग्रेसर आहे. राष्ट्रसंघाच्या नोकरीत असताना विविध देशातील नोकरवर्ग जेव्हा सामाजिक पातळीवर एकत्र येत तेव्हा होणाऱ्या चर्चेतून आपला सांस्कृतिक वारसा व नैतिक अधिष्ठान सर्वश्रेष्ठ आहे हे अनेक परदेशीयांनी मान्य केले आहे. तेव्हा त्यासंबंधी जास्त पुस्तके व भेटी यांच्या रूपाने आपण जगावर छाप पाडली पाहिजे. तसे न झाल्यास आपल्या सांस्कृतिक जीवनातील अंधश्रद्धा, संकुचितपणा, भोळा भाव यांची जाहिरात वाढीस लागेल व चुकीचे चित्र जगापुढे मांडले जाईल. सर्वसाधारण समाजात अद्याप या क्षेत्राचे महत्त्व पटलेले नाही. शाळा–कॉलेजातून जाणाऱ्या आपल्या मुलांच्या पुस्तकी–अभ्यासावर व परीक्षेतील यशावर जसा भर दिला जातो तितकाच भर त्याच्या अभ्यासाव्यतिरिक्त शिक्षणसंस्थांमधून क्रीडा, नाटच, वक्तृत्व व इतर संघटनाकार्यांना दिला पाहिजे. वास्तविक शाळाकॉलेजात केलेला अभ्यास पुढील जीवनात उपयोगी पडतो असे नाही. पण याच्या उलट बहिःशाल संघटनातून अंगी बिंबणारे खेळाडू वृत्ती, शिस्त, समजूदारपणा इ. गुण आयुष्यभर उपयोगी पडतात. तसे पाहिले तर आपल्या शालेय व कॉलेज शिक्षणात या गोष्टींना अद्याप जेवढे महत्त्व मिळावयास पाहिजे तेवढे

मिळालेले नाही. उलट अंग्रेजी हटावसारखे सवंग व पोरकट खेळ शासन-कर्त्यांनी करून दोन पिढ्यांचे नुकसान केले आहे. शिक्षण हा जीवनाचा पाया असल्यामुळे शिक्षणक्रमावर उच्च स्तरावरून विचार होणे इष्ट आहे. त्याचबरोबर धार्मिक शिक्षणाची आज नितांत जरूरी आहे. धर्मातील मूलभूत तत्त्वे व ज्यांना नीतीचा आधार आहे अशी शोधून काढून त्यांना शालेय जीवनापासून मानाचे स्थान मिळाले पाहिजे. धर्मावर आलेली बाह्य देखाव्याची व ढोंगाची पुटे जरूर बाहेर काढली पाहिजेत. पण ओल्याबरोबर सुकेहि जळते असे आपण म्हणतो तसे हल्ली चालू आहे. धार्मिक लोकांचे बाह्य दांभिक स्वरूप पाहून पं. नेहरूंनी धार्मिक आचरणाला अफूची गोळी समजून त्याज्य ठरविले. या त्यांच्या चुकीची फळे आज आपण राजकारणात भोगत आहोत. पाश्चिमात्य राष्ट्रातील ऐहिक भोगवादाच्या मोहजालात फसून आमचे बहुसंख्य लोक त्याग व चारित्र्यापेक्षा स्वार्थ व अहंपणाकडे जास्त केन्द्रीभूत झाले आहेत. धर्माच्या त्या मूलभूत तत्त्वांना राजमान्यता मिळाल्याशिवाय आपले चारित्र्य सुधारणार नाही. बऱ्याचशा क्षेत्रात हल्लीचे राज्यकर्ते शितावरून भाताची परीक्षा करतात ते चूक आहे. भगवद्गीता, ज्ञानेश्वरी इ. ग्रंथातील मानवाचा विकास करणारे व कर्म-योगावर भर देणारे अनेक सिद्धांत राज्यकर्त्यांनी रूढ केले पाहिजेत. त्रिकुंड लावलेले व भगवी वस्त्रे नेसून आपल्या साधुत्वाचा देखावा करणाऱ्या लोकांच्याकडे पाहून सर्वच धर्मतत्त्वे त्याज्य समजण्यात इंदिराजींच्या वडिलांनी जी चूक केली आहे ती त्यांनी सुधारली पाहिजे. राष्ट्रीय जीवनात आपला झेंडा, राष्ट्रगीत, राष्ट्रीय पोशाख यांना जितके महत्त्व आहे तितकेच महत्त्व मूर्तिपूजेला दिले पाहिजे. निरनिराळचा मूर्ती या आपल्या श्रद्धांची प्रतीके आहेत. आपल्या प्राचीन परंपरांचे ते फोटो आहेत. तेव्हा त्यांचा योग्य बडेजाव ठेवूनहि कर्मकांड साधता येईल. लो. टिळक व म. गांधींनी या गोष्टी ओळखून त्यांच्यावर भर दिला होता. पण नेहरूयुग सुरू झाल्या-पासून बुद्धिवादाच्या नावाखाली खरा धर्म व संस्कृतीचा ऱ्हास झाला आहे. हा ऱ्हास इंदिराजींना त्यांच्या भावी कार्यक्रमात पदोपदी नडणार आहे. त्यांचे सर्व कार्यक्रम त्यांचेच तथाकथित अनुयायी आपल्या स्वार्थासाठी या ना त्या मार्गाने अपयशी ठरवतील. आजपर्यंत जगात व विशेषतः भारतात

जे युगपुरुष निर्माण झाले त्यांचे व्यक्तिगत चारित्र्य हे त्यांचे सर्वांत मोठे भांडवल होते. नेहरू किंवा इंदिराजी यांच्या चारित्र्याबद्दलहि वाद नाही. पण ते जे अनुयायी निर्माण करीत आहेत त्यांना नीतिमत्तेची जरूरी आहे. हिंदु धर्मातील उदात्त तत्त्वांचा जयजयकार केला तर मुसलमान, ख्रिश्चन व अन्य जमाती नाराज होतील हा एक भ्रामक समज आहे. हिंदु धर्मप्रमाणेच अल्पसंख्यांकांच्या धर्मामध्ये नीतीला पोषक अशी जी तत्त्वे असतील त्यांचाहि आधार घेण्यास काहीच हरकत नाही. नीति व चारित्र्य हे व्यक्तीचे मूल्य-मापन करणारे साधन आहे. त्यांच्या पाठीशी असलेल्या धर्माच्या लेबलचे नाही. या उदात्त भूमिकेवरून भावी काळात विचार केल्याशिवाय इंदिरा-जींना चारित्र्यसंपन्न अनुयायी लाभणार नाहीत व एकदा त्यांच्याभोवती स्वार्थलोलुप लोकांचा पडलेला घेराव त्या जर दूर करू शकल्या नाहीत तर त्यांनाच ते अनुयायी खाल्ल्याशिवाय राहणार नाहीत.

आपल्या देशामध्ये सांस्कृतिक स्तरावर अनेक आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय संस्था प्रशंसनीय कार्य करीत आहेत. या संस्थांचा आपण जेवढा लाभ घ्यावयास पाहिजे तेवढा घेत नाही. युनोस्कोसारखी संस्था सांस्कृतिक क्षेत्रात प्रचंड कार्य करीत आहे. वास्तविक भारत या संस्थेत अग्रभागी असावयास पाहिजे. परंतु या संस्थेच्या आपणास लाभकारी, अशा अनेक उपक्रमांच्याकडे उपेक्षेने पाहिले जाते. नाट्य, नृत्य, अभिनय, संगीत इ. विविध क्षेत्रात आपल्या युवकयुवतींना या संस्थेमार्फत अधिक ज्ञान व अनुभव मिळण्याची शक्यता आहे. रोटरी इंटरनॅशनल ही संस्थाहि असेच उपयुक्त कार्य करीत आहे. तिचा कोठल्याहि राजकीय विचारप्रणालीशी संबंध नाही. आज जगातील १४९ देशात गेली ६६ वर्षे निष्ठेने काम करणाऱ्या या संस्थेशी श्री. मोरारजी देसाई हे भारताचे वित्तमंत्री असताना व्यक्तिगत मानापमानासाठी तिच्याशी उभा दावा साधून त्यांची कित्येक लाख रुपयांची वर्गणी गोठवून टाकली. रोटरी फौंडेशनसारखी संस्था दरवर्षी एक हजार विद्यार्थी स्वखर्चाने उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवते. पण अशा उपक्रमांची दखल व्यक्तिगत मानापमानाचे संदर्भात घेतली जाऊ नये. आपण स्वतः विकसनशील राष्ट्रात मोडत असताना अशा प्रत्येक उपक्रमाकडे

निष्पक्षपातीपणे पाहून त्याचा आपल्या देशाला जास्तीत–जास्त लाभ कसा होईल ते राज्यकर्त्यांनी पाहिले पाहिजे. दुर्दैवाने आजपर्यंतचा अनुभव असे सांगतो की अशा प्रश्नांच्याकडे अगदी वरवर पाहिले जाते. प्रत्येक मंत्री आपल्या विषयातील तज्ज्ञ नसल्यामुळे अर्ध्या हळकुंडाने तो पिवळा होतो. त्याला तज्ज्ञांचा सल्ला घेण्याची किंवा दुसऱ्याचे म्हणणे ऐकून घेण्याची आवश्यकता वाटत नाही. व त्यामुळे आपल्या सांस्कृतिक जीवनात हा भोंगळपणा निर्माण झाला आहे. सत्तेची खुर्ची लाभली की आपण सर्वज्ञ झालो व जेणेकरून आपले नांव व छबी सदैव वृत्तपत्रातून झळकत राहील अशा गोष्टीवर त्यांचे लक्ष केंद्रीभूत होत असल्यामुळे विघायक विचार मागे पडतो. सर्व भर दौरे, प्रचार व वायफळ वडबड यावर–मग अभ्यासाची त्यांना जरूरच भासत नाही. ही कोंडी फोडल्याशिवाय आपल्या देशाला तरणोपाय नाही व हे कोंडी फोडण्याचे काम इंदिराजींना करावे लागणार आहे. मंत्र्यांची पात्रता त्याची जात, प्रांत, धर्म, त्याचे अनुयायी व पुल (pull) व पुश (Push) यावर अवलंबून न रहता त्यांचे ज्ञान, अभ्यास सर्वकष दृष्टी यावर आधारले पाहिजे. प्रत्येक प्रश्न आपल्याला समजतो अशा भ्रमात राहणारांना तो खरोखरीच समजला आहे याची खबरदारी पंतप्रधानांनी घेतली पाहिजे.

हल्ली राजकारणाला अवास्तव महत्त्व प्राप्त झाले आहे कारण राजकीय व्यक्ति बनण्यास खास अक्कल अथवा विद्वत्ता लागत नाही. मते मिळविली की कार्यभाग उरकला व त्यामुळे हल्लीचा झगमगाट दिसत आहे. या वस्तुस्थितीमुळे आपल्या जीवनातील आधारभूत तत्त्वांचा आपणास विसर पडत आहे. प्राचीन संस्कृतीचे गोडवे फक्त सभातून टाळ्या मिळविण्यापुरते गायिले जातात. पण त्यांचा विकास कसा व्हावा याची दखल कोणी घेत नाही. हा मूलभूत आजार दूर केल्याशिवाय इंदिराजींना आपल्या इष्ट कार्यात यश मिळणार नाही.

●●●

त्रिभुवनी तुज ऐसी नाही

भारत–पाक संघर्षात सर्व दृष्टीने भारताचा विजय झाला आहे यात शंका नाही. जी काही कसर शिल्लक आहे तीहि भरून निघेल अशी उमेद आपल्या पराक्रमी पंतप्रधानांची मुत्सद्देगिरीची पावले पाहता खात्री वाटते. हा विजय फक्त रणांगणावर झालेला नसून त्याने आपल्या इतिहासात नवे पर्व सुरू केले आहे. वरवर आपण ही लढाई जरी पाकिस्तानविरुद्ध लढलो असलो तरी इंदिराजींना ही लढाई जगातील सर्व शक्तिशाली अशा तीन प्रचंड देशांशी सतत ९ महिने एकाकी लढावी लागली व यातच त्यांचे अलौकिकत्व सिद्ध होते.

स्वतःची बाजू न सोडता संयम, धीर व रुबाबात सर्व कामे करून त्यांनी जगातील सर्व भारतविरोधी राष्ट्रांना खडे चारले आहेत. आज-पर्यंतची आमची हजारो वर्षाची शांतीदूताची भूमिका सोडून शठंप्रतिशाठ्यम्, ठोशास ठोसा, गुद्यास गुद्दा, शेराला सव्वाशेर अशा महाराष्ट्राला प्रिय असलेल्या शेकडो म्हणींचा साक्षात्कार या धोरणात दिसून येतो. शत्रूने एका गालात थोबाडीत मारली तर दुसरा गाल पुढे करावा पण प्रतिकार करू नये अशी गांधीजींची शिकवण अद्याप रूढ आहे अशी अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन यांची समजूत होती व म्हणूनच ते पाकिस्तानने युद्ध पुकारले असताहि भारताला आक्रमक म्हणत होते. यापुढे इंदिराजींच्या नव्या धोरणामुळे भारताकडे पाहण्याचा साऱ्या जगाचा दृष्टिकोन बदलणार आहे. या मर्दाच्या राणीने हा नवा विक्रम करताना सत्य व विश्वशांतीची आपली परंपरा सोडली नाही. सतत ९ महिने सर्व पराक्रमी राष्ट्रांना वारंवार हलवून त्या जागे करीत होत्या. स्वार्थाने लडबडलेली ही राष्ट्रे मधुतिष्ठति जिव्हाग्रे या न्यायाने वरवर जरी शांततेचा घोष करीत होती तरी एकदा युद्ध सुरू झाल्यावर त्यांच्या हृदयातील हलाहल बाहेर पडले.

आपला खरा शत्रू कोण व मित्र कोण हेहि समजले. पूर्वीच्या अशा तंटच्यात आपल्या सदैव विरुद्ध असणारी इंग्लंड व फ्रान्ससारखी राष्ट्रे यावेळी तटस्थ राहिली. इजिप्तसारखी आपणाला मित्र वाटणारी राष्ट्रे प्रसंगविशेषी आपल्या नरडीला नख लावण्यास कमी करणार नाहीत हेहि समजून आले. मार्शल टिटोसारखे भारताचे सच्चे दोस्त कधी कधी चुका करू शकतात याची जाण झाली. नेपाळ, सिक्कीम, ब्रह्मदेश, सिलोनसारख्या शेजाऱ्यांच्यावर आणीबाणीच्याप्रसंगी आपणास अवलंबून रहाता येणार नाही हे स्पष्ट झाले. आपल्यातील काहीजणांना जपान व जर्मनी भारताचे बाजूने युनोत मतदान करतील अशी आशा वाटत होती तीहि निष्फळ ठरली. अर्थात ही सर्व राष्ट्रे भारताची वैरी आहेत असे समजणे चूक ठरेल. रस्त्यावर चाललेली एखादी मारामारी, ती करणारा चूक कोण व बरोबर कोण या खोलात न शिरता 'जाऊ द्या, जाऊ द्या' म्हणून आपण मारामारी करणाऱ्या दोघांनाही बाजूला सारतो त्यातला हा प्रकार आहे. फक्त अशावेळी अशा मारमारीत आपल्याला ओळखणारा एखादा त्रयस्थ तेथे असला तर तो मारामारी न सोडवता आपल्या बाजूने प्रतिस्पर्ध्याला दोन दणके घालील अशी जी आपली अपेक्षा असते ती सफल झाली नाही. यापुढील राजकारणाचे तारू हाकताना पंतप्रधानांना या सर्व गोष्टी विचारात घ्याव्या लागतील.

युगप्रवर्तक नेतृत्व

इंदिराजींच्या दृष्टीने या युद्धातील त्यांची संस्मरणीय अशी कामगिरी म्हणून त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ज्या बेडरपणे परिस्थितीला तोंड दिले व चीन, अमेरिका इ. स्वार्थांध व दंगलखोर राष्ट्रांना मुत्सद्देगिरीत चारी मुंड्या चित केले यात आहे. वास्तविक आपले सैनिक कितीही शूर असले तरी राजकारणाची परंपरा अशी निग्रहास अनुकूल नव्हती. गांधीजी तर अहिंसेचे निर्माते त्यांच्यानंतर नेहरुहि जागतिक बंधुभाव व विश्वशांतीचे प्रतीक होते. त्यानंतर शास्त्रीजींनी थोडा हात दाखवला पण तो काळ इतका अल्प होता की त्यामुळे त्याला परंपरा बदलली असे म्हणता येणार नाही. पण या बाईने निवडणुकीनंतर सतत दहा महिने एकाच धोरणाचा पुरस्कार

केला व तोही स्वपक्षात बरोबरीचे असे कोणी सल्लागार नाहीत. विरोधी पक्षात निवडणुकीतील पराभवाने चिडलेले सर्व तथाकथित नेते त्यांच्या धोरणातील छिद्रांच्याकडे दुर्बिणीतून पाहत होते. जागतिक राजकारणात हुकमीपणाने आपल्या पाठीशी उभी राहील अशी शक्ति नाही. इतक्या सर्व अडचणीतून इंदिराजींनी स्वतःची निग्रही भूमिका टिकविली. या प्रश्नास हिंदु-मुसलमान असे धार्मिक युद्धाचे स्वरूप विरोधकांना सहज देता आले असते व त्यामुळे खुद्द भारतात धर्मयुद्ध होण्याची शक्यता होती. बंगला देशाला मान्यता द्या म्हणून देशाच्या कानाकोपऱ्यातून त्यांना सुरुवातीपासून अनाहुत सल्ला दिला जात होता. तरी ही मर्दांची राणी आपल्याच चालीने आगेकूच करीत होती. त्यांच्या धोरणात आता ९ महिन्यानंतर कोठेही चूक नव्हती असे त्यांचे विरोधकहि कबूल करतात. युद्धामध्ये केव्हा व कोठे सुरुवात करावी तसेच केव्हा व कोठे थांबावे हेही एक शास्त्र आहे व त्या बाबतीत त्यांनी दाखवलेला धूर्तपणा वाखाणण्यासारखा आहे. त्यांनी घेतलेली ठाम भूमिका यापुढे कोणालाहि नाकारता येणार नाही. व युनोमधील मी मी म्हणणारे मुत्सद्दी त्यामुळेच गांगरून गेले आहेत. प्रथम याह्याखानला 'तू पुढे हो, आम्ही मागून आलोच' म्हणून चीनने भडकावले. अमेरिकेने 'तुझा अगदी जीव जायची वेळ आली तर आम्ही येतोच' म्हणून आपणावर छूं केले व लक्षावधी पूर्व पाकिस्तान्यांच्या अमानुष छळाबद्दल ब्र सुद्धा काढला नाही. चीनचा दम इंदिराजींनी विद्युत गतीने रशियाशी संरक्षण करार करून उखडून काढला. तर अमेरिकेच्या बाबतीत त्यांनी स्वतः त्या देशास भेट देऊन अमेरिकेचे धोरण भारताला अनुकुल करण्यात तात्पुरते यश मिळविले. इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी या दुय्यम राष्ट्रांची त्यांनी मिळवलेली सहानुभूति व समजूतदारपणाची भूमिका अद्याप टिकून आहे. अमेरिकेचे प्रत्यक्ष युद्धकालीन धोरण भारत विरोधी असले तरी निक्सनचा याह्याखान झाल्याशिवाय रहाणार नाही. निक्सनला खुद्द त्यांच्याच देशात होणारा तीव्र विरोध यापूर्वी कधीही दिसला नव्हता. भारतावर आजपर्यंत अनेक संकटे आली. हैद्राबाद, गोवा, चीनशी युद्ध (१९६२) पाकिस्तानशी युद्ध (१९६५) या चारी समर प्रसंगात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने भारताचा उपमर्द व्हावा अशीच भूमिका सर्व पाश्चिमात्त्य राष्ट्रांनी घेतली होती. पण

इंदिराजींनी आपला डाव अशा रितीने खेळला आहे की जगात एक निक्सन सोडल्यास भारताचा हाडवैरी कोणी उरला नाही. चीन हा याला जरी अपवाद असला तरी तो केव्हा कोलांटी उडी मारील त्याचा नेम नाही. अमेरिकेच्या पुढील निवडणुकीत निक्सनचा जर पराभव झाला तर ते राष्ट्र रशियाइतकाच आपला पाठपुरावा करील. निक्सनची चीनशी आज जी चुंबाचुंबी चालू आहे त्यापाठीमागे अमेरिकेचा घसरता डॉलर संभाळण्याचे राजकारण आहे. तो सावरण्याचा चीनने प्रतिसाद दिला नाही तर अमेरिकेला लोकसंख्येच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र म्हणून भारताला गोंडा घोळावा लागेल. अशा रितीने ही जी तीन प्रबल राष्ट्रे आपल्या तालावर भारताला नाचवू इच्छित होती व भारताबद्दल ज्या काही बेंगरुळपणाच्या किंवा taken for granted अशी जी भूमिका होती ती बदलावी लागणार आहे. भारतीयांच्या रक्तात पराक्रम व शौर्य पिढ्यानुपिढ्या होते व आहे. पण या गुणांना जे कोंदण आजपर्यंत मिळत नव्हते ते इंदिराजींच्या रूपाने मिळाले आहे. एखाद्या संघात किंवा संघटनेत व्यक्तिशः पराक्रमी असे लोक असतात. पण या सर्व पराक्रमी वीरांना एका घाऱ्यात गुंफणारी अशी प्रबळ शक्ति नुसते नेतृत्व नव्हे–आदिमाया शक्ति आवश्यक असते व ती आज आपणाला इंदिराजींच्या रूपाने मिळाली आहे. आमच्या पराक्रमावर जी शांतीदूतांची जळमटे चढली होती ती इंदिराजींनी घुवून पुसून स्वच्छ केलीत. तलवारींच्यावरील गंज आपल्या निग्रही घोरणाच्या तेलाने हटवला आहे. व आता भारताकडे कानाडोळा करून पाहण्याची कोणाची हिंमत होणार नाही. ही महिषाशूर मर्दिनी आता मंदिराच्या बाहेर पडून भारताच्या सर्व सरहद्दीवर डोळ्यात तेल घालून पहारा करीत आहे. नुसते नेतृत्व नव्हे अदिमाया शक्ति व वेळ आली तर जवळच्या लहान राष्ट्रांच्यामध्ये त्यांच्या न्याय्य हक्कासाठी पाठीशी उभी राहू शकेल असा दिलासा निर्माण केला आहे. या सर्व घोरणाचा परिपाक म्हणून पुढील पांच वर्षात जगाच्या तीन प्रबळ राष्ट्रांना भारताला चौथा क्रमांक देऊन आपल्या बरोबरीचा मान द्यावा लागणार आहे. जागतिक मुत्सद्यांच्या यादीत या गौरवशाली महिलेचा समावेश यापुढं अपरिहार्य ठरणार आहे. या विक्रम-

शाली पर्वामुळे परकीयांप्रमाणे स्वकीयांनाही त्यांच्यातील विविध गुणांचे पैलू पटले आहेत.

मी या पुस्तकाच्या पूर्वीच्या परिच्छेदात माझ्या अल्पसमजुतीप्रमाणे इंदिराजींचे काही दोष दिग्दर्शित केले होते. त्यामध्ये त्या कोणाचा सल्ला घेऊ इच्छित नाहीत याबद्दल खेद व्यक्त केला होता. परंतु या युद्धाच्या प्रसंगी केवळ स्वकीयांचा नव्हे तर विरोधी पक्षांचाहि मान राखून त्यांचा त्या वारंवार सल्ला घेत व याबद्दल जनसंघाच्या काही जेष्ठ पुढाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. यावरून स्वतःची काही ठाम धोरणे असली तरी इतरांचा सल्ला घेण्यानें बिघडत नाही. उलट लाभच होण्याची शक्यता असते हे त्यांना पटलेले दिसते. त्यांनी श्री. जगजीवनराम व चव्हाण यांचा केलेला गौरव बोलका आहे. तात्पर्य त्यांच्या ओजस्वी नेतृत्वरूपी चंद्रमावर मला जो एक अंधुक डाग दिसत होता तोहि नष्ट झाल्यास इंदिराजींच्या रूपाने आपणाला खरोखरीच एक नवे तेज व युगप्रवर्तक नेतृत्व लाभले आहे. त्यांच्यावर प्रचंड मानसिक व शारीरिक ताण आहे. त्यातूनहि परमेश्वराने या भारतरत्नाला दीर्घायुरारोग्य देऊन आमच्या ह्या सुवर्णभूमीवर जी दारिद्र्याची छटा आलेली आहे ती नष्ट करून आमची भूमि अक्षरशः सुजलाम् सुफलाम् करण्याची शक्ति देवो हीच त्या सर्व शक्तिशाली जगदंबेच्या चरणी प्रार्थना आहे.

● ● ●

उपसंहार

सर्वसाधारणरित्या हयात व्यक्तीचे मूल्यमापन करण्याची प्रथा आपल्या देशात रूढ नाही व त्यादृष्टीने इंदिराजींच्या सहवासात लाभलेल्या आठवणी लिहिण्याचा माझा मनोदय होता. परंतु आजच्या क्रांतीकारक जीवनात इंदिराजींचे स्थान इतके महत्त्वाचे आहे की, त्याची मीमांसा प्रत्येक विचारवंतांनी आपल्या चष्म्यातून केली पाहिजे. असे वाटल्यामुळे प्रपंच प्रकाशनचे चालक श्री. माधवराव कानिटकर यांनी मला भारत–रत्न इंदिरा गांधी 'काल–आज व उद्या' हे पुस्तक लिहिण्यास प्रोत्साहित केले. त्यामुळे काल हया भागात माझ्या आठवणी ग्रथित केल्या असून आज व उद्यामध्ये सद्यःस्थितीचे इंदिराजी हे सूत्र ठेवून सर्व विवेचन केले आहे.

आजच्या हयात व्यक्तीत श्रीमती इंदिरा गांधी या सर्वश्रेष्ठ आहेत याबद्दल मला तिळमात्र शंका नाही. किंबहुना आजच्या सर्वश्रेष्ठ पदाला त्या केव्हांना केव्हा तरी पोचतील अशी माझी १९३६ पासूनची भाबडी समजूत खरी झाली म्हणून मी थोडासा स्वतःच्या अंदाजावर खूष आहे. सर्वश्रेष्ठत्वाचा मान देताना साहजिकच त्यांच्या गुणांचे पारडे जड आहे व ते त्यांच्या गेल्या वर्षातील कारकीर्दीने सिद्ध झाले आहे, त्यांना जो समाजवाद प्रिय आहे तो भारतात लवकरात लवकर यावा यात वाद नाही. गरीबी हटाव या कार्यक्रमाचे भाऊगर्दीत आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात उत्पादकतेवर भर देऊन त्यांनी आपले धोरण सुधारले पाहिजे, प्रत्येक क्षेत्रातील प्रश्नाकडे पूर्वदूषित ग्रहाने न पाहता न्यायाधीशाच्या नजरेतून पाहिले पाहिजे, चारित्र्य व नीतीमत्तेवर आधारीत असा धार्मिक कार्यक्रम आखला पाहिजे व त्याचबरोबर त्यांच्यामधील अत्युच्य भावनेमुळे ते व त्यांचे अनुयायी यांच्यात जे अंतर पडले आहे ते त्यांनी कमी केले पाहिजे असे माझ्या अल्पमतीला वाटते. हा चतुःसूत्री कार्यक्रम त्यांनी जर स्वीकारला तर गरीबी हटून समाजवाद निर्माण होण्यास फारसा विलंब लागणार नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी दादागिरी करणाऱ्या देशांना धडा शिकविण्यासाठी अणु-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

शस्त्रे बनविण्यास सुरवात केली पाहिजे. अमेरिका व रशिया हे अणूबंदूका व अणूतोफा यांच्या साहाय्यानेच परस्पर सहकार्याची भाषा करीत असतात. चीनसारखा दगलबाज शेजारी व पाकिस्तानसारखे आपल्या जिवावर उठून स्वतःची गुजराण करणारे राष्ट्र यांना काबूत ठेवणे फक्त अणुशक्तीच करू शकेल. राजकीय जीवनात लोभी उद्योगपतींना दणके देत असताना दुसरीकडे शेतकऱ्यांच्यामधील सहकाराच्या गोंडस नावाखाली शासनकर्त्यांची मान आवळणाऱ्या सधन शेतकरीवर्गाची त्यांनी दखल घेतली पाहिजे.

स्त्री म्हणजे दौर्बल्य, परावलंबीपणा, हळूवारपणा किंवा अडाणीपणा अशी जी आपली जुनी समजूत होती तिला इंदिराजींनी धक्का दिला आहे. याच्या उलट पुरुषालाहि लाजवेल अशा साहसी वृत्तीने या शूर महिलेने आपल्या देशाला आणीबाणीच्या काळातून पुढे नेण्याचा चंग बांधला आहे. आपल्या कर्तबगारीने त्यांनी स्वतःचा अस्सल घाट शाबीत केला आहे. हे नेतृत्व जुन्या पठडीतले किंवा संस्कृतीतून निर्माण झालेले नसून अगदी स्वतःचे असे आहे. त्यांचा घाट, कस, जात व पोत अगदी स्वतःचे असे आहे. त्यांचे नेतृत्व जसे नैसर्गिक आहे तशीच कार्यपद्धति पण आहे. त्यांचे मन समजणे अशक्यप्राय आहे. त्या बोलतात इतक्या गूढ, गंभीर व अकल्पनीय. त्यामुळे त्यांचे धोरण समजून वागणे कठीण जाते. नेतेपदासाठी लागणारी जिद्द, निग्रह व आक्रमक वृत्ती त्यांच्याजवळ आहे. त्यांच्या तडफदार व एक घाव दोन तुकडे वृत्तीमुळे त्या लोकप्रिय झाल्या आहेत. लौकिकी अर्थाने त्या विद्वान नसल्या तरी त्यांचा मूळ पिंड बौद्धिक असल्याने सर्व प्रश्न त्या कुशलतेने हाताळू शकतात. राजकीय जीवनातील पंडयांना नाराज करण्याची त्यांच्या अंगात धमक आहे व त्यामुळेच आज ना उद्या आपल्या अनुयायांची योग्य पारख करून त्या प्रशासनावरील पक्कड पक्की करतील. सत्ता मिळवून त्यांनी एक दिव्य पार पाडले आहे. या सत्तेचा वापर त्यांना आता समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी करावयाचा आहे. भारतीय जनमानसात व कितीतरी साऱ्या जगात त्यांच्याबद्दलच्या अपेक्षा इतक्या उंचावल्या आहेत की त्यामुळे त्यांच्यावरील जबाबदारीचा बोजा दिवसेंदिवस वाढत आहे. या आव्हानाला तोंड देण्याची शक्ति, बुद्धि व दीर्घायुरारोग्य परमेश्वराने त्यांना द्यावे असेच कोणीहि देशभक्त नागरिक म्हणेल.

9649

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम ५५५८० वि: निबंध
दि. 29/6/68 नों. वि: 39.3.५

भारतरत्न इंदिरा गांधी यांचा जीवनपट

१९ नोव्हेंबर	१९१७	जन्म–आनंद भुवन, अलाहाबाद
	१९२२	गया येथील काँग्रेस अधिवेशनात पहिली उपस्थिती
२० फेब्रुवारी	१९३६	मातोश्री कमला नेहरू यांचे निधन
	१९३८	काँग्रेसचे सभासदत्व मिळाले
	१९४१	युरोपमधील शिक्षणक्रम स्थगित करून मायदेशी राहण्याचा निर्णय घेतला.
	१९४२	फेरोझ गांधी यांच्याशी हिंदु पद्धतीने विवाह
	१९४४	राजीवचा जन्म
	१९४६	संजयचा जन्म
मे व जून	१९५३	जवाहरलालांचे बरोबर युरोप दौरा
जून व जुलै	१९५५	जवाहरलालांचे बरोबर रशिया दौरा
	१९५५	काँग्रेस वर्किंग कमिटीच्या प्रथम सदस्य
	१९५९	काँग्रेसचें अध्यक्षपद
२७ मे	१९६४	पं. नेहरूंचे निधन
	१९६५	भारत सरकारच्या नभोवाणी मंत्री
१८ जानेवारी	१९६६	भारताच्या पंतप्रधान झाल्या
१७ डिसेंबर	१९७१	पाकिस्तानविरुद्ध अपूर्व विजय व इंदिराजींच्या नेतृत्वावर अढळ शिक्कामोर्तब


REFBK-0018452

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वीकृत
अनुक्रम ..... विः निबंध
दिनांक ..... वोः विः .....
30.3.62